# माणूस

शनिवार । २६ फेब्रुवारी १९७७ । पंचाहत्तर पैसे




'बेचाळीस' मध्येही इतके सत्याग्रही तुरुंगात गेलेले नव्हते !

**साप्ताहिक माणूस**

**वर्ष सोळावे – अंक एकोणचाळीसावा**
**२६ फेब्रुवारी १९७७**
**मूल्य पंचाहत्तर पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻

मुक्काम दिल्ली

# काँग्रेसला राजधानीतच जबरदस्त विरोध

दिल्ली ही राजधानी असल्याने काँग्रेसच्या दृष्टीने इथल्या सर्वच जागा प्रतिष्ठेच्या! पण आजची हवा तरी काँग्रेसला अनुकूल आहे, असे म्हणणे कठीण आहे. दिल्ली आणि आसपासच्या भागात नसबंदीबाबत झालेली सक्ती, शहर स्वच्छ करण्याच्या नावाखाली झोपडपट्ट्या उद्ध्वस्त करणे आदी बेबंदशाही-मुळे इथला सर्वसामान्य माणूस आधीच काँग्रेसविरोधी झाला आहे. मध्यमवर्गीय माणसासही प्रत्यक्ष बाजारात जीवनावश्यक वस्तूंच्या भावात झालेली व होत असलेली वाढ दिसत वा समजत नाही असे नाही. आणीबाणीत विनाकारण हजारो लोकांना तुरुंगात डांबल्याबद्दलची नापसंतीही जागो-जाग व्यक्त होत असते. राजकीय परिस्थिती-विषयी जागरूकपणे विचार करणाऱ्या माणसा प्रमाणेच जनता पक्षाचे सर्वसामान्य कार्य-कर्तेही 'इस बार दिल्लीमें काँग्रेसको एक भी सीट मिलनेकी कोई गुंजाईश नहीं है!' असे आत्मविश्वासपूर्वक सांगत आहेत. हा अंदाज अतिव्याप्त आहे असे मान्य केले तरी सावध निरीक्षकांच्या अंदाजानुसार दिल्ली-तल्या पाच जागा नक्कीच जनता पक्षास मिळतील. राजधानीतच अशा रीतीने काँग्रे-सला धडा मिळाला तर इतरत्र जनता पक्षाने आशावादी राहण्यास काहीच हरकत नाही. वातावरण अशा रीतीने आतल्या आत तप्त असले तरी अजून निवडणूक मोहीम तिच्या नेहमीच्या फॉर्मात आलेली नाही.

संजय गांधींच्या नेतृत्वाने 'नवजीवन' प्राप्त झालेली युवक काँग्रेस पुन्हा एकदा प्राणसंकटात सापडली आहे. निवडणुका होणार अशी चाहूल लागताच ३० टक्के जागा युवकांना मिळाल्या पाहिजेत, अशी आरोळी 'संजयसेनेने' ठोकली. पण ती आरोळी तशीच हवेत विरून गेली. आज घडीला 'तेल गेले, तूप गेले' अशीच बिचा-ऱ्यांची अवस्था झाली आहे. ही मुले आपल्या डोक्यावर बसतील, या भीतीने बाप मंडळींनी त्यांना चांगलेच वगळले आहे. युवक काँग्रेसला ३० टक्के सोडाच, ५ टक्केही जागा मिळाल्या नाहीत. अंबिका सोनींनी दिल्लीतून तिकीट मिळावे म्हणून कोण जिवाचा आटापिटा केला. पण शेवटी नाहीच मिळाले तिकीट. परवा, ११ फेब्रुवारीला देशभरचे युवक काँग्रेसी नेते एकत्र जमले होते. त्यांचा खल नक्की काय झाला ते समजले नाही. पण या बैठकीहून परत जाताच गुजराथ, पंजाब, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये युवक काँग्रेस-वाल्यांनी युवकांना प्रतिनिधित्व नसल्याबद्दल खेद, निषेध वगैरे प्रकट केला आहे. गुजराथ-मध्ये तर प्रदेश काँग्रेस कचेरीवर निषेध-मोर्चा गेल्याचे वृत्त आहे. बंगाल युवक काँग्रेस तर अगदी दीनवाणी झाली आहे. निदान पाच जागा तरी आम्हाला द्या, असे त्यांनी कळवळून सांगितले आहे. या अजीजीचा काय उपयोग होतो, ते लवकरच कळेल. युवक काँग्रेस ही मूळ काँग्रेसपेक्षा महत्त्वपूर्ण होत आहे, असे पाहून युवक काँग्रेस ही संघटना स्वतंत्र न ठेवता ती काँग्रेसमध्ये विलीन करावी, असे देवकांत बरूआ, रजनी पटेल आदी सहा लोकांनी पत्र लिहून प्रधानमंत्र्यांना कळविले होते. नंतर काँग्रेसचे सरचिटणीस व्ही. बी. राजू यांनी याचा इन्कार केला असला तरी स्वतः बरूआ किंवा संबंधितांपैकी कोणीही अजून इन्कार केलेला नाही. हे पत्र खरोखरच लिहिले गेलेले असेल तर त्याचे अर्थ दोन : (१) युवा नेत्याचे वाढते प्रस्थ कमी करण्या-साठी त्याचा बेसच काढून टाकण्यासाठी 'बरूआ मित्रमंडळा'ने हा उपाय शोधून काढला असावा. (२) हलवून खुंटा बळकट करण्याच्या उद्दिष्टाने वात्सल्यमूर्तीनेच हा एक फीलर टाकला असावा.

युवक काँग्रेसची ही अवस्था असतानाच काँग्रेसची परिस्थिती विविध राज्यांमध्ये फारशी समाधानकारक आहे, असे नाही. ओरिसामध्ये परवा परवापर्यंत काँग्रेस व राज्य

सरकारच्याही सर्वेसर्वा असलेल्या नंदिनी सत्पथी या आता कांग्रेस फॉर डेमॉक्रसीमध्ये आल्याने कांग्रेसची निवडणूक यंत्रणा दुर्बल झाली आहे. ओरिसा कांग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी तर कांग्रेसमध्ये असलेले नंदिनी पाठिराखे या निवडणुकीत कांग्रेसविरोधी उमेदवारांना मदत करतील, अशी भीती व्यक्त केली आहे. नंदिनी सत्पथी या पूर्वाश्रमीच्या कम्युनिस्ट. त्यामुळे राज्यातले कम्युनिस्ट त्यांच्या विरोधात जाणे कठीण. त्यामुळे कांग्रेसमधील एका गटाचे कम्युनिस्टांशी निवडणूक समझोता करावा, असे म्हणणे आहे. ओरिसात लोकसभेच्या एकूण २१ जागा आहेत. त्यांपैकी आठ जागा आपल्याला मिळाव्यात, अशी कम्युनिस्टांची मागणी. तथापि या दोघांत निवडणूक समझोता होण्याची शक्यता अजून दुरावली नाही. ओरिसा कांग्रेसमधल्या एका गटाचे तर असे म्हणणे आहे की, कम्युनिस्टांना त्यांच्या मागण्यांप्रमाणे जागा देऊन टाकाव्यात आणि बदल्यात उरलेल्या जागांसाठी आपल्याशी सहकार्य करावे. पण राज्यातली युवक कांग्रेस मात्र, कम्युनिस्ट पक्षाचा संजय गांधींच्या पाच कलमी कार्यक्रमास विरोध असल्याने त्या पक्षाशी कोठल्याही प्रकारच्या समझोत्याच्या विरुद्ध आहे. कम्युनिस्ट पक्षास मात्र, अशा तडजोडीचा फायदा कांग्रेसलाच होईल आणि कांग्रेसजन कम्युनिस्ट उमेदवारांना मदत करतील, अशी खात्री नाही असे वाटते. २१ पैकी कांग्रेसचे ११ उमेदवार विसर्जित लोकसभेचे सदस्य होते. युवक कांग्रेसची डाळ येथेही शिजली नाही.

पंजाब कांग्रेसमध्येही अंतर्गत धुसफूस कमी नाही. बराच वेळपर्यंत दडपली गेलेली अंतर्गत दुफळी या निवडणुकांच्या वेळी उफाळून येण्याची शक्यता आहे. पंजाबचे मुख्यमंत्री ग्यानी झैलसिंग आणि राज्य कांग्रेस समितीचे अध्यक्ष मोहिंदरसिंग गिल यांच्यात तीव्र मतभेद आहेत. वरकरणी एकजुटीने काम करण्याचे या दोघांनीही मान्य केले असले तरी प्रत्यक्षात मात्र दोघांचे दोन गट कांग्रेस अंतर्गत आहेत. प्रदेश कांग्रेसच्या अध्यक्षपदावर आरूढ होताच श्री. गिल यांनी 'भ्रष्ट प्रशासना'विरुद्ध मोहीम उघडली होती. या मतभेदांमुळे अंतर्गत यादवी माजून कांग्रेसची मते कमी होण्याचा दाट संभव आहे. कांग्रेस अंतर्गत लाथाळीची पूर्ण कल्पना तिथल्या विरोधी पक्षांना, विशेषतः अकाली दलास असल्याने स्वाभाविकपणेच ते या परिस्थितीचा फायदा उठवतील. अकाली दल–जनता पक्ष युतीचे अतिशय समर्थ आव्हान पंजाबी कांग्रेस उमेदवारांसमोर उभे आहे. कांग्रेस–कम्युनिस्ट समझोता राज्यात होऊ शकला नाही, ही गोष्ट जनता पक्षाच्या पथ्यावर पडणार आहे. किमान नऊ मतदारसंघांमध्ये कम्युनिस्ट पक्षाचा प्रभाव आहे. राज्यातील विसर्जित लोकसभेच्या सर्व कांग्रेस सदस्यांना पुन्हा तिकिटे देण्यात आली आहेत. ज्यांना तिकिटे मिळाली नाहीत ते विरोधकांना मदत करण्याची शक्यताही नाकारता येत नाही. अशा तिकिटे नाकारलेल्या उमेदवारांत काही युवक कांग्रेसचेही कार्यकर्ते आहेत. ते अधिकृत कांग्रेस उमेदवारांविरुद्ध उघडपणे प्रचार / मदत करण्याची फारशी शक्यता नसली तरी या असंतुष्ट आत्म्यांचा काही तरी बंदोबस्त कांग्रेसश्रेष्ठींना करावाच लागेल.

बंगालमध्ये सिद्धार्थ शंकर रे यांच्याविरुद्ध झालेल्या वादळाच्या परिणामी त्यांना गृहखाते सोडावे लागल्याचा इतिहास अगदी नवा आहे. तात्पुरती ही दुही सांधली गेल्यासारखे दिसत असले तरी तेथे सारे आलबेल नाही. कांग्रेसचे दक्षिण कलकत्ता मतदार संघाचे उमेदवार व युवक कांग्रेसचे एकेकाळचे बॉस प्रियरंजनदास मुन्शी हे नुकतेच दिल्लीत येऊन गेले. अर्थातच इथे ते प्रधानमंत्र्यांना भेटले. भेटीनंतर त्यांनी प्रधानमंत्र्यांना एक पत्र लिहून आणीबाणी उठविण्याची आणि नागरी स्वातंत्र्ये पुनर्स्थापित करण्याची विनंती केली आहे. निवडणुकीत लोकांना मते मागताना आणीबाणी चालू ठेवण्याची गरज पटवून देणे अवघड जाईल, असे त्यांनी म्हटले आहे. त्या पत्रात त्यांनी असेही म्हटले आहे की, सर्वसामान्य कांग्रेस सदस्य–कार्यकर्त्यांना जगजीवनराम, बहुगुणा, नंदिनी सत्पथी यांनी कांग्रेसचे राजीनामे का दिले हे समजावून सांगावे लागेल आणि तसे समजावून सांगणे हे अत्यंत कठीण काम आहे. या पत्रास काही खास राजकीय अर्थ आहे, असे समजण्यास जागा आहे. या पार्श्वभूमीवर एका बाजूस जनता पक्ष, कांग्रेस फॉर डेमॉक्रसी व इतर डावे पक्ष/गट, आणि एका बाजूस कांग्रेस-कम्युनिस्ट युती असे मतपेटीच्या लढाईचे बंगालमधले चित्र आहे. या वेळी बंगालमध्ये लोकसभेच्या एकूण ४२ जागा आहेत. गेल्या वेळी ४० होत्या. १९७१ च्या मध्यावधी निवडणुकीत इंदिरा कांग्रेसने ३२ जागा लढविल्या होत्या. त्यांतल्या फक्त १३ जिंकल्या होत्या. मार्क्सवादी कम्युनिस्टांनी सर्व ४० जागा लढवून २० जागा पटकावल्या होत्या. उजव्या कम्युनिस्टांना ३ जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यांनी एकूण १५ जागा लढविल्या होत्या. पैकी ६ जागांसाठी कांग्रेसशी तडजोड केली होती. यावेळच्या बंगालमधील निवडणुकांचे प्रमुख वैशिष्ट्य हे असेल की, तेथे सर्वच्या सर्व ४२ जागांसाठी सरळ लढती होतील. हे साध्य करण्यात विरोधकांना अपेक्षेपेक्षा जास्त यश आल्याने मतदारांवर त्याचा चांगलाच प्रभाव पडला आहे. यावेळच्या ४२ जागांपैकी ८ जागा उजव्या कम्युनिस्टांसाठी सोडून ३४ जागा कांग्रेस लढविणार आहे. कांग्रेस-कम्युनिस्टेतर पक्षांपैकी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष २१ जागा लढविणार आहे. क्रांतिकारी समाजवादी पक्ष आणि फॉर्वर्ड ब्लॉकचे प्रत्येकी ३ उमेदवार मैदानात उतरले आहेत. उरलेल्या १५ जागांसाठी जनता पक्ष आणि कांग्रेस फॉर डेमॉक्रसी यांचे उमेदवार लढतील. १२ उमेदवार जनता पक्षाचे तर ३ कांग्रेस फॉर डेमॉक्रसीचे असतील. या दोन राहुट्यांपैकी लढाईत कोणाची फत्ते होईल ते आज सांगता येणे शक्य नाही. बांगला देशच्या प्रश्नावरून पाकिस्तानशी झालेल्या लढाईत मिळालेल्या विजयाने ७१ सालच्या निवडणुकीत इंदिरा कांग्रेस पारडे जड होते. तरी सुद्धा त्यावेळी त्यांना ४० पैकी फक्त १३ जागा जिंकता आल्या. या वेळी अशा प्रकारचे अन्य कोणतेही अनुकूल वातावरण नसताना तेव्हापेक्षा अधिक (वा तेवढे तरी) यश त्यांना मिळेल का, हा विचार करण्याजोगा प्रश्न आहे. तथापि त्यावेळचा मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आता राहिला नाही. त्यांचे बरेच कार्यकर्ते मधल्या काळात कमी झाले आहेत. जनता पक्ष–कांग्रेस फॉर डेमॉक्रसी युतीस काही परिस्थितिजन्य अनुकूलता आहे, पण त्यांची संघटना नवीन असल्याने त्यांना

आज प्राप्त असलेल्या गुडविलमध्ये ते किती भर घालू शकतात यावर त्यांचे यशापयश अवलंबून आहे.

*

गेल्या आठवड्यातील सर्वांत मोठी राजकीय घटना म्हणजे श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांचा प्रकट व निडर सरकार-विरोध. बाबू जगजीवनराम यांच्या घरी गेल्या सोमवारी त्यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. खरे तर ११ तारखेच्या पत्रकार परिषदेतच ही घोषणा व्हायची, पण राष्ट्रपतींच्या निधनामुळे ती १३ तारखेस केली गेली. श्रीमती पंडित यांचे भारतीय राजकीय-सामाजिक जीवनात स्वतःचे असे एक वेगळे स्थान आहे. यूनोमधील भारताच्या पहिल्या महिला प्रतिनिधीपासून महाराष्ट्राच्या गव्हर्नरपर्यंत अनेक महत्त्वाच्या स्थानांवर त्या होत्या. त्यानंतर त्या लोकसभेच्या सदस्यही होत्या. पण नंतर त्यांनी लोकसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्या सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाल्या. वयाच्या ७६ व्या वर्षी पुन्हा एकदा त्या सार्वजनिक जीवनात येणार त्या कोणत्या भूमिकेने, ते ऐकायला साहजिकच भरपूर पत्रकार उत्सुकतेने जमले होते. एवढे वय झाले तरी बाई अजून ठणठणीत, सरळ आणि नेमके बोलतात. उघडपणाने सरकारच्या धोरणविरोधी अशा त्यांच्या या पवित्र्यामुळे विरोधकांना फार मोठे नैतिक बळ व प्रतिष्ठा मिळाली आहे. त्यांनी प्रथमच स्पष्टपणाने सांगून टाकले की, त्या कोणत्याही पक्षात जाणार नाहीत, तसेच त्या स्वतःही निवडणुकीस उभ्या राहणार नाहीत. पण येत्या निवडणुकीत त्या काँग्रेस-विरोधी उमेदवारांना/पक्षांना सर्व प्रकारची मदत करणार आहेत. देशभर कोठेही/सर्वत्र त्या प्रचारसभांमध्ये बोलतील. आपली भूमिका स्पष्ट करणाऱ्या पत्रकात त्यांनी म्हटले आहे, 'सात वर्षांपूर्वी मी लोकसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्या वेळेपासून सरकार आणि काँग्रेस पक्षात वाढत जाणाऱ्या अनिष्ट प्रवृत्तींमुळे मी त्रासून गेले होते. या प्रवृत्तीविरुद्ध आवाज उठविण्याचा मी प्रयत्न केला. पण त्या वेळी मी जे काही बोलले त्याचा भलताच अर्थ काढला गेला. माझ्या हेतूविषयी शंका व्यक्त केल्या गेल्या. माझी मते विकृत करून मांडली गेली. अशा परिस्थितीत, ज्या देशाची सेवा करण्याचा मी माझ्या परीने जन्मभर प्रयत्न केला त्या देशाबाबत, माझ्या कर्तव्यबुद्धीनुसार योग्य तो निर्णय मी घेतला आणि सत्तेच्या राजकारणापासून अलिप्त राहून एक दूरस्थ निरीक्षक बनण्याचे मी ठरविले. १९६९ साली काँग्रेसमध्ये फूट पडली तेव्हा मध्यस्थी करण्यासाठी माझ्यावर किती तरी दडपणे आली, पण मी त्यापासून अलिप्त राहिले. १९७१ साली बहुमत मिळवून काँग्रेसने सरकार स्थापले. पण निवडणुकीत दिलेले समताधिष्ठित समाजाचे वचन पुरे व्हायची लक्षणे अजूनही दिसत नाहीत. उलटपक्षी, आणीबाणीची घोषणा आणि हजारो लोकांना तुरुंगात डांबण्याच्या रूपाने विरुद्ध टोकाच्या प्रवृत्ती दिसू लागल्या. आणीबाणीच्या रूपाने सर्वाधिकारशाहीची (authoritarian rule) बीजे रोवली जात आहेत असे माझे मत होते व आहे. पण त्यावेळी मी काही न बोलता तेव्हा तटस्थपणे पाहण्याचे ठरविले. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या लोकशाही संस्था उभ्या करण्याचा प्रयत्न आपण केला त्या एकामागून एक नष्ट करण्यात आल्या. कायद्याचे राज्य संपुष्टात आले, न्यायपालिकेचे स्वातंत्र्य संपले, वृत्तपत्रांवर निर्बंध घातले गेले. आणि हे सारे लोकशाहीच्या रक्षणासाठी, देशाच्या अंतर्गत सुरक्षिततेस निर्माण झालेला धोका टाळण्यासाठी केले गेले!

विरोध करण्याचा अधिकार हा लोकशाहीचा गाभा आहे. विरोध करणे म्हणजे देशनिष्ठेचा त्याग नव्हे. वृत्तपत्रांत आक्षेपार्ह मजकूर आला की जवाहरलाल किती अस्वस्थ होत असत, हे मी पाहिले आहे. पण वृत्तपत्र-स्वातंत्र्य हे लोकशाहीचे मूलभूत अंग आहे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. याविषयीची त्यांची मते अगदी स्वच्छ आहेत. सद्यःस्थितीविषयीं असंतोष व्यक्त करणारे आवाज आता ऐकायला मिळत आहेत, ही समाधानाची गोष्ट आहे. बाबू जगजीवनराम यांनी आपल्या अधिकारसत्तेचे सुख आणि सुरक्षितता सोडून काँग्रेसजनांना लोकशाहीसाठी उभे राहण्याचे आवाहन केले आहे, याचा मला आनंद होत आहे. मी त्यांच्या या आवाहनास हार्दिक पाठिंबा देते. सर्व आदर्श मूल्यांचा नाश करणाऱ्या या अधिकारशाही प्रवृत्ती नष्ट करणे हेच आजचे सर्वांत महत्त्वाचे काम आहे. या प्रवृत्ती आज फाजील प्रमाणात वाढल्या आहेत. बराच काळ मी एक निष्क्रिय प्रेक्षक बनून राहिले आहे. पण अशा रीतीने मी स्वस्थ राहू शकत नाही. कारण माझ्या मौनाचा अर्थ, मला प्रिय असणाऱ्या मूल्यांचा नाश करण्यास माझी सम्मती आहे, असा होऊ शकतो. माझी सर्वप्रथम निष्ठा आणि कर्तव्यभावना माझ्या देशाशी आहे, आणि तशीच ती सदैव असली पाहिजे.' 'तुम्ही रायबरेलीत इंदिराजींविरुद्ध प्रचार करायला जाणार का?' या प्रश्नावर त्यांनी– 'नाही. कारण त्यामुळे मुख्य प्रश्न बाजूला पडतील,' असे उत्तर दिले. संजय गांधींच्या विषयीही प्रश्न विचारला गेला. पण त्यावर त्या म्हणाल्या, 'तो सध्या सार्वजनिक जीवनात आहे. तेव्हा लोकांनीच त्याच्याविषयी आपले मत बनवावे– ठरवावे. सार्वजनिक जीवनात तरुणांना प्राधान्य मिळाले पाहिजे, हे तत्त्व आपल्याला मान्य आहे, असे त्या म्हणाल्या. पण एखादी व्यक्ती केवळ माझ्यापेक्षा ५ वर्षांनी किंवा ५० वर्षांनी लहान आहे, एवढ्याच कारणाखातर मी तिचा सार्वजनिक व्यक्ती, पुढारी म्हणून स्वीकार करावा, हे मला मान्य नाही, असे बजावण्यास त्या विसरल्या नाहीत!

श्री. रामानंद तिवारी हे बिहारचे जुने समाजवादी नेते. सं. वि. द. सरकार असतानाचे उपमुख्यमंत्री. सध्या ते अ. भा. पोलीस संघटनेचे अध्यक्ष आहेत. मिसाखाली ते तुरुंगात होते. गेल्या शनिवारी त्यांची अंबाला जेलमधून सुटका झाली. पण ते तुरुंगात आहेत, हे ओम् मेहतांना माहीत नव्हते. बिहारमधल्या एका मतदारसंघातून ते निवडणूक लढविणार आणि अजून तुरुंगात आहेत, म्हणून सुरेंद्र मोहन त्यांना (ओम मेहतांना) भेटायला गेले तेव्हा मंत्रिमहोदयांना जाग आली आणि मग तिवारींची सुटका झाली! परवा श्री तिवारी पत्रकारांशी बोलले. तुरुंगात त्यांना अतिशय हीन दर्जाची वागणूक दिली गेली. २८ जून ७५ ला सत्याग्रह केल्याने त्यांना मिसाखाली भागलपूर (बिहार) तुरुंगात ठेवण्यात आले होते. १७ जानेवारी ७६ ला त्यांना अंबाला जेलमध्ये आणले जात असताना वाटेत पटना स्टेशनवर त्यांची

नातेवाईक मंडळी (बायको, मुलगा, भाचा इ.) त्यांना भेटायला आली. पण त्यांची भेट होऊ दिली नाही भेट होईपर्यंत मी गाडीत बसणार नाही म्हणून त्यांनी प्लॅटफॉर्मवरच बैठक मारली. गर्दी जमा झाली. एका पोलीस शिपायाने त्यांना काय झाले म्हणून विचारले व त्यांची आस्थेने चौकशी केली, तर तिथल्या तिथे त्यालाच बेदम मारले. एवढेच नव्हे तर त्याला नोकरीवरून कमी केले. अजूनही तो निलंबित आहे. इंद्रदेव त्याचे नाव. १५ जानेवारी ते २५ सप्टेंबर ७६ पर्यंत त्यांना तुरुंगात सामान्य कैद्याची वागणूक दिली गेली. राजबंद्यांना दिला जाणारा संडी अलाउन्स दिला गेला नाही. अंबाला जेलमध्ये असतानाच त्यांना मूत्र-विकार जडला. जेलच्या डॉक्टरला त्यांनी तसे सांगितले. पण परवा जेलमधून बाहेर येईपर्यंत त्यांच्या या विकाराची तपासणी केली गेली नाही. त्यावर उपचार करणे दूरच. तिवारीजींच्या म्हणण्याप्रमाणे ब्रिटीश साम्राज्यातील कारावासापेक्षा यावेळचा कारावास वाईट होता. ब्रिटिश अमदानीत ते एक वर्षभर जेलमध्ये होते. त्यावेळी ते पोलीस दलात होते. ब्रिटिश सरकारविरुद्ध बंड करून त्यांनी ब्रिटिश पोलीस ठाण्यावरच गोळीबार केला. परिणामी १ वर्षाचा कारावास त्यांच्या वाट्यास आला. त्यांचा मुलगा शिवानंद तिवारीही तुरुंगात होता. परवाच तो सुटला. त्यांचा पुतण्या विद्यानंद तिवारी हा अजूनही तुरुंगातच आहे. सर्व पक्षांचा मिळून एक मोठा पक्ष होण्याच्या प्रक्रिये-बरोबरच त्यांच्या युवक आघाड्या व अन्य युवक संघटना यांची एक युवक संघटना व्हावी, असा जयप्रकाशजींचा आग्रह होता. आणीबाणीच्या काळात सर्व युवक संघटनांचे अनेक नेते तुरुंगात होते. ते बाहेर आल्यावर एकीकरणाच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. परिणामी लोकतांत्रिक युवा मोर्चा नावाची एक युवक संघटना अ. भा. पातळीवर अस्तित्वात आली आहे. या संघटनेचे तात-डीचे काम ठिकठिकाणी जनता पक्षाच्या उमेदवारांना निवडणुकीत मदत करणे, हे आहे. युवा मोर्चाच्या दिल्ली शाखेने जॉर्ज फर्नांडीस आणि बडोदा डायनामाईट प्रक-रणातील अन्य आरोपींची ताबडतोब सुटका करावी, अशी मागणी केली आहे. जगजीवन-राम यांच्या पक्षास येऊन मिळणाऱ्या कॉंग्रेस-जनांची देशभरची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. परवाच कर्नाटकातले १०-१५ कॉंग्रेस आमदार-खासदार 'कॉंग्रेसचा राजीनामा देऊन त्यांना येऊन मिळाल्याने आजपर्यंत अभेद्य असलेल्या तिथल्या कॉंग्रेस बुरुजासही खिंडार पडले आहे. दिल्लीत आणखी कार्य-कर्ते त्यांना येऊन मिळताहेत. परवाच दिल्ली युवक कॉंग्रेसचे उपाध्यक्ष त्यांना येऊन मिळाले. बाबूजींच्या लोकशाहीवादी कॉंग्रेसचे खरे प्रभावक्षेत्र म्हणजे बिहार, उत्तर प्रदेश, ओरिसा व मध्यप्रदेश. त्यातही बिहार व उत्तर प्रदेश अधिक. उत्तर प्रदेशात २० तर बिहारमध्ये १४ जागा ते लढविणार आहेत. सर्व देशभर मिळून ते ५० जागा लढवितील, असा अंदाज आहे.

आणीबाणीत वृत्तपत्रांवर असलेली बंधने आता उठली आहेत. पण बंधने असताना कोण कसे वागले, याचा हिशोब लोक विसरले नाहीत. इंडियन एक्स्प्रेस व स्टेट्समन ही दिल्लीतली दैनिके 'त्या' वेळीही निर्भयतेने वागली. परिणामी आज दोघांचाही खप वाढला आहे. इंडियन एक्स्प्रेसचा ७० हजारांनी तर स्टेट्समनचा सुमारे तेवढाच. टाइम्स ऑफ इंडियाचा खप मात्र कमी झाला आहे. अर्थातच हा खप वाढणे हे राजधानी-तल्या इंग्रजी जाणणाऱ्या सुशिक्षित मध्यम व उच्च मध्यमवर्गीय लोकांचाच केवळ कल दर्शविणारे चिन्ह आहे हे नक्की. अगदी विदेश मंत्रालयातले कर्मचारी सुद्धा इंडियन एक्स्प्रेस व स्टेट्समन ही पत्रेच घेतात आणि कार्यालयात खुलेपणाने व अभिमानाने ते सांगत असतात !

१६-२-७७ —रत्नाकर

# एकेक चिरा ढासळतो आहे

श्री. ग. मा.

'लंडन टाईम्स'ला दिलेल्या मुलाखतीत इंदिराजींनी एक वेगळाच सूर लावलेला आहे. आणीबाणी कायम राहिली पाहिजे, असे जरी त्या म्हणाल्या असल्या तरी एकूण या मुलाखतीत त्यांचा नेहमीचा आक्रमकपणा—आक्रस्ताळेपणा दिसून येत नाही. निवडणुक-प्रचारातील भाषणात त्या विरोधकांवर कितीही तुटून पडत असतील, पण या मुलाखतीत मात्र विरोधकांबद्दल अगदी ठेवणीतला संयम आणि समजुतदारपणा त्यांनी दाखवलेला आहे. पाश्चिमात्य देशांतील आपली लोकशाही प्रतिमा दुरुस्त करण्याची एकही संधी त्या वाया जाऊ देत नाहीत; त्यामुळे हा समजुतदारपणाचा खालचा सूर त्यांनी योजून ठरवून धरलेला असावा; किंवा खरोखरच विरोधकांना थोडी-फार किंमत दिल्याशिवाय, त्यांच्या वाढत्या ताकदीची दखल घेतल्या-शिवाय यापुढे गत्यंतर नाही, अशी परिस्थिती उत्पन्न झाली असावी. एरवी महिना—दोन महिन्यांपूर्वी जे विरोधक देशद्रोही, परकीय सत्तांचे हस्तक म्हणून संबोधले गेले, त्यांना बरोबर घेऊन देशासमोरील प्रश्न सोडवण्याची भाषा बाईंच्या तोंडी एकदम कशी काय आली ? मुलाख-तीत त्यांनी स्पष्ट म्हटले आहे : 'लोकांचा कौल आम्ही स्वीकारू, निवड-णुकीनंतर—मग सरकार कोणतेही असो—सर्व पक्ष एकत्र येऊन देशा-समोरील समस्या सोडवू शकतील असे मला वाटते.' (म. टाईम्स, १७ फेब्रुआरी अंक) निवडणुकीत नेत्रदीपक यश मिळवण्याचे एकीकडे आटोकाट प्रयत्न चालू ठेवून दुसरीकडे, जुगार उलटलाच, निर्णायक बहुमत लाभले नाहीच तर 'राष्ट्रीय सरकार'चा पर्याय तर बाई डोळ्यासमोर ठेवत नसतील ? 'लंडन टाईम्स'ची वरील मुलाखत खरी मानून चालायचे तर असा एक अर्थ त्यातून नक्कीच निघू शकतो. नाहीतर प्रतिमादुरुस्तीशिवाय मुलाखतीला काही महत्त्वच उरत नाही. हे उघड आहे, की जनता+जगजीवन यांचे आव्हान किती समर्थ आहे, लोकसभेतील किती जागा ही युती बाईंकडून हिसकावून घेऊ शकते, यावर बाईंची पुढची खेळी ठरणार. दोन—अडीचशे जागा या युतीला मिळाल्यातर बाई राष्ट्रीय सरकारला तयारही होतील; यापेक्षा कमी मिळाल्या तर समर्थ विरोधावरच समाधान मानावे लागेल. मतदार काय कौल देतात त्यावर हे सगळे अर्थातच अवलंबून !

हवा तर विरोधकांच्या दृष्टीने फार चांगली आहे. एक राज्य

असे नाही की, ज्यात बाईंच्या पक्षाला भगदाडे पडलेली नाहीत. बिहारवर म्हणे बाईंनी आत्ताच पाणी सोडलेले आहे. ( इती : पुण्याचे एक खासदार संपादक-पूर्ण खाजगीत ! ) पंजाब हा संजयचा लाडला प्रांत. पण तेथे अकालींचा वाढ जोरदार आहे. उत्तर प्रदेशचा बालेकिल्ला तर बहुगुणा-चरणसिंग यांच्यामुळे ढासळतोच आहे. तामीळनाडूबद्दल खात्री नाही. केरळ-बंगाल सुरक्षित नाही. कर्नाटकातही खिंडार पडले आहे......दिल्लीत तर मुळापासून उखडले जाण्याचा धोका. मुंबईत हाय खाल्लेलीच आहे...

उगीच नाही बाईंनी सहकार्याचा हात पुढे करून ठेवला !

कदाचित निवडणुकीपूर्वी बाई विरोधकांच्या मुख्यमुख्य मागण्या अचानक मान्य करूनही घसरत चाललेला डाव सावरण्याचा प्रयत्न करून पाहतील.

आणीबाणी शिथिल झालेलीच आहे. ती कागदोपत्रीही उठवली जाईल.

राजबंद्यांना सोडले जाईल.

विरोधक गोंधळतील, कारण त्यांच्या प्रचारातली सगळी हवाच निघून जाईल.

अशी एकेक पायरी खाली उतरल्याचे दाखवून बाई अखेरच्या क्षणी एखादी झडप घालणार नाहीत, असेही नाही.

एकीकडे सहकार्याचा हात, राष्ट्रीय सरकारचे गाजर; दुसरीकडे ऐनवेळी एखादे ठेवणीतले हत्यार काढून विरोधकांचे पानपत करायची तयारी.

विरोधकांनीही या दोन्ही शक्यता गृहीत धरून आपल्या बाजूची मांडणी करायला हवी. नाही तर पुन्हा पानपतची पुनरावृत्ती. दुपारपर्यंत सदाशिवराव भाऊंचे पारडे यशाकडे झुकलेले. नंतर अचानक प्रतिपक्षाची ताज्या दमाची कुमक. त्यामुळे दाणादाण. आणि शेवटी मराठ्यांचा पराभव !

¤

आता आपल्या भारतव्यापी निवडणूक प्रचार दौऱ्याचा आरंभ करताना पं. बंगालमधील सभातून इंदिराजी काय गरजल्या ते पहा. त्या म्हणाल्या, 'हा गट ( विरोधी पक्ष ) केवळ मला घेरण्यासाठी आणि भोसकण्यासाठी एकत्र आलेला आहे.' (लोकसत्ता दि. २० फेब्रुवारी अंक) 'लंडन टाईम्स' मुलाखतीची शाई वाळते न वाळते तोच एकदम बाईंचे हे 'अबाऊट टर्न-घुम जाव ! 'काय म्हणावे या कमीला ! जर विरोधक ' भोसकण्या 'च्याच वृत्तीने गोळा झालेले असतील तर त्यांचा समूळ नायनाट करणे बाईंना अपरिहार्यच ठरणार! मग 'सगळे मिळून देशासमोरील प्रश्न सोडवू शकतात-' या 'लंडन टाईम्स' मधील आवाहनाचा अर्थ काय ? महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. शंकरराव चव्हाण यांनी वापरलेली गोळ्यांची भाषा काय आणि बाईंनी केलेला हा 'भोसकाभोसकी 'चा आरोप काय, यामागील दृष्टिकोन एकच आहे, तो म्हणजे देशाचे हित फक्त आम्हालाच कळते हा. लोकशाहीचा दृष्टिकोन अगदी वेगळा असतो. लोकशाहीची व्याख्या कोणतीही घ्या. आपल्याप्रमाणेच दुसऱ्याबद्दल, त्याच्या हेतूबद्दल, मताबद्दल आदर, हा सर्व व्याख्यांमधील समान आशय आहे. असहिष्णु वृत्ती लोकशाहीला फार मारक आहे. जुन्या काळी या वृत्तीतून धार्मिक अहंकार पोसले गेले. नव्या काळात या वृत्तीतूनच हुकुमशाहीचा अवतार होतो. मग ती हुकुमशाही डावी असो की उजवी. कोणतीच हुकूमशाही नको असेल तर प्रथम ही असहिष्णुता सोडली पाहिजे. निवडणुका म्हणजे लोकशाही हे समीकरण फार वरवरचे आहे. हिटलर-स्टॅलीन-मुसोलिनी यांनीही निवडणुका घेतलेल्या होत्या. लोकशाही जीवंत ठेवायची असेल तर असहिष्णुता जायला हवी. सर्वसाधारण भारतीयामध्ये परंपरेमुळे सहिष्णु वृत्ती आलेली आहे. त्यामुळेच लोकशाहीचा प्रयोग येथे यशस्वी होण्याची शक्यता आहे. पुस्तकी शिक्षण, आधुनिक ज्ञानविज्ञान यांचा जरी अभाव असला तरी ही परंपरागत सहिष्णूवृत्ती या देशातील लोकशाहीचा आजवर खरा आधार ठरलेला आहे. एरवी इंदिरा गांधींचे चहाते आणि सहकारी असलेले असंख्य लोक आणि लहानमोठे गट आज त्यांच्या विरोधात एकदम उभे राहतात, हे दृश्य दिसले नसते. त्यांच्यातील असहिष्णुता ही भारतीय परंपरेत कुठेतरी न बसणारी-शोभणारी आहे. विनोबांनी अगदी ठिकच शब्दात या परंपरेची आठवण करून दिली. 'निवडणुका या 'खेळल्या' जाव्यात, ' लढल्या जाऊ नयेत.' असे ते म्हणाले. पण यासाठी दोन्ही पक्षांनी खेळाचे नियम पाळले पाहिजेत, खेळाडूपणाची वृत्ती दाखवायला हवी. प्रतिपक्ष गोळ्या घालण्याच्याच लायकीचा आहे, किंवा आपल्याला भोसकण्यासाठीच एकत्र आलेला आहे, ही खेळाडूवृत्ती निश्चितच म्हणता येणार नाही. निदान विनोबांचे सांगणे तरी बाई मानतील का ? का गरज सरो आणि वैद्य मरो म्हणून विनोबांनाही त्यांनी अलिकडे ढकलून दिलेले आहे ? तसे असेल तर त्यांच्या सत्तेचे अधिष्ठान आणखीनच डळमळीत होईल. कारण जनशक्तीप्रमाणेच कुठल्याही सत्तेला सज्जनशक्तीचे पाठबळहीआवश्यकच असते. आणि ही सज्जनशक्ती तरी अलिकडे इंदिरा गांधींपासून हळूहळू दूर सरकू लागलेली आहे. एकेक चिरा ढासळतो आहे, सदसद्विवेकबुद्धीचा एकेक आवाज प्रतिपक्षाच्या आवाजात मिसळत चालला आहे. या आवाजांकडे तरी इंदिराजी, शंकररावजी यांनी लक्ष पुरवायला हवे. का हेही आवाज गोळ्या घालण्याच्या लायकीचे आहेत, भोसकण्यासाठीच एकत्रित आलेले आहेत असे या मंडळींचे 'अशोभनीय' मत आहे ? □

## यापुढील अंकी दिल्ली पुरवणी

# जगजीवनराम यांची खास मुलाखत

## माणूस प्रतिनिधी

# माणूस

## जनविराट विशेषांक

### श्रेय नामावली

दुर्गा भागवत, पु. ल. देशपांडे, ग. दि. माडगुळकर, प्रभाकर पाध्ये, इंदुमती केळकर, राम बापट, रविन्द्र व्होरा, विनय हर्डीकर, प्रकाश जावडेकर, ग. प्र. प्रधान, पन्नालाल सुराणा, सुभाष अवचट, अशोक जैन, छाया दातार, निळू दामले, शि. द. फडणीस, श्याम जोशी, अनिल काळे, अरुणा ढेरे, कुमार सप्तर्षी, ब. ना. जोग.....

### शिवाय

युक्रांद कार्यकर्ते रत्नाकर महाजनकृत खास दिल्ली पुरवणी

एकपक्षनिर्मिती प्रयत्नांचा मागोवा घेणारा यापुढील अंक

**माणूस : जनविराट विशेषांक**

प्रसिद्धी ५ मार्च : किंमत ५ रुपये

# इये मिसाचिये नगरी

## □ काकाऽऽ 'याला' वाचवा !

कै. काकासाहेब गाडगीळ हे थापा मारीत असत असा महाराष्ट्रात एक समज त्यांच्या हयातीत पसरलेला होता. परंतु काकांची प्रतिमा महाराष्ट्रात उजळू लागली आहे. कै. काकासाहेब 'गाडगीळांचे बॅरिस्टर पुत्र विठ्ठलराव गाडगीळ यांनी हे कार्य हाती घेतले, याचा सर्वांना आनंदच झाला. नुकत्याच एका समारंभात याचे प्रत्यंतर आले. कै. गाडगीळांच्या नावे एक प्रतिष्ठान निर्माण केल्याची घोषणा त्यांच्या चिरंजीवांनी या समारंभात केली. पुण्यात टिळक स्मारक मंदिरात झालेल्या या समारंभाला पुण्यातील सर्व बडे काँग्रेस पदाधिकारी आणि काही मंत्रिगण उपस्थित होते. या सर्वांपुढे मुंबई विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. य. दि. फडके यांचे 'काकासाहेब गाडगीळ आणि संयुक्त महाराष्ट्र' या विषयावर सुश्राव्य व्याख्यान झाले.

या व्याख्यानात कै. काकासाहेब गाडगीळांची प्रतिमा उजळण्याचे कार्य करता करता डॉ. य. दि. फडके यांनी इतरही बरीच झाडलोट केली. फारच धुरळा यामुळे उडाला. ही साफसफाई चालू असताना काँग्रेसी देशभक्तांना चेहरे हसरे ठेवण्याचे बिकट कार्य करावे लागले व ते त्यांनी फारच चतुराईने व मख्खपणे केले, याबद्दल त्यांचे कुणीही अभिनंदनच करील. प्रा. य. दि. फडके यांनी 'संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवरच मी प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली आहे ' असा हवाला देऊन सांगितले—

'संयुक्त महाराष्ट्रा'च्या निर्मितीपूर्वी मुंबईत जो गोळीबार झाला व शंभरावर हुतात्मे निर्माण झाले, याबद्दल मोरारजी देसाई यांना दोष दिला जातो. हा गोळीबार झाल्यानंतरही त्यांच्या मंत्रिमंडळातील ना. यशवंतराव चव्हाण यांनी राजीनामा दिलेला नव्हता. याचे एक कारण असे की, मोरारजी यांनी पंतप्रधान नेहरूंशी,गोळीबाराचा निरोप पोलिसांना देण्यापूर्वी फोनवरून संपर्क साधला होता. रस्त्यात हा प्रश्न सुटू द्यायचा का, असा स्पष्ट आदेश मुख्यमंत्र्यांनी मागितला असताना, पंडितजींनी मोरारजीभाईंना फोनवरून—'शूट अ‍ॅन्ड शूट टू किल' (गोळीबार करा ) असा स्पष्ट आदेश दिला होता. मोरारजींनी नेहरूंच्या इच्छेनुसार गोळीबार केला. परंतु जेव्हा प्रकरण काँग्रेसी राजवटीच्या अंगाशी आले व सर्व महाराष्ट्र खवळला, तेव्हा नेहरूंनी परस्पर माझा 'बकरा' केला असे मोरारजींनी आत्मचरित्रात स्पष्ट म्हटलेले आहे आणि ते खरे आहे !'

म्हणजे मुंबईच्या रस्त्यात जे मुडदे पडले ते मुंबई पोलिसांनी पाडले असले व त्यावेळी मोरारजीभाई मुख्यमंत्री व ना. यशवंतराव चव्हाण मंत्री असले, तरी 'गोळीबार करा'हा नेहरूंचा हुकूम होता—आणि इंदिराजी म्हणतात त्यानुसार केंद्र फारच बळकट असल्याने, केंद्राचा हुकूम मुख्यमंत्र्यांनी मानला, असे दिसते ! म्हणजे प्रा. य. दि. फडके यांना काकासाहेब गाडगीळांची संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रतिमा उजळणारे भाषण करण्यासाठी पहिल्या वर्गाचा प्रवास खर्च व मानधन देऊन बॅ. गाडगीळांनी पुण्याला बोलावले आणि त्यांनी प्रतिमा उजळली ती मोरारजींची ! आणि शिवाय फडके यांनी असाही पेचदार प्रश्न विचारला की, 'मोरारजींचा गोळीबार न्याय्य नव्हता मग ना. यशवंतरावांनी तरी राजीनामा का दिला नाही ?' पाहुण्याने जायचा यायचा खर्च घेऊन, यजमानांना असे पेचात टाकणे बरे नाही. निवडणुकीच्या तोंडावर असे करणे तर अगदीच अयोग्य नाही. सहज 'फडके' मारावे, आणि भलतीच साफसफाई व्हावी तसे हे सर्व घडले ! धूळ श्रोत्यांच्या नाकातोंडात गेली.

परंतु बॅरिस्टर विठ्ठलराव गाडगीळ हे तसे लेचेपेचे केंद्रमंत्री नव्हेत, उत्पादन खात्याचे मंत्री असल्याने ते काय वाटेल ते 'उत्पादन' करू शकतात. बारामती येथे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात भाषण करताना नुकतेच ते म्हणाले—

'देशाचे भवितव्य पंतप्रधान इंदिरा गांधींच्या लोकशाहीवादी नेतृत्वाच्या हाती ठेवायचे, की द्विभाषिक वादाच्या वेळी मुडदे पाडणाऱ्या मोरारजी देसाई यांच्या हाती द्यायचे, याचे उत्तर कृतीने द्यायची वेळ आली आहे !'

म्हणजे प्रा. य. दि. फडके यांच्या शेजारच्या खुर्चीवर बसून त्यांनी जे सत्य ऐकले त्यानुसार गाडगीळ बोलले तर—हेच वाक्य कसे झाले असते, याचा विचारही आता सहन होत नाही ! 'शूट' हा पंडित नेहरूंचा निरोपच काय तो मोरारजीभाईंनी मुंबई पोलिसांना कळवला. बळकट केंद्रासाठी, प्रसंगी गोळीबार करा असा आदेश देणाऱ्या पंडित नेहरूंच्या सुकन्या इंदिराजी यांनाच लोकांनी मते द्यायला हवीत, असे स्पष्ट मत नोंदवूनही बॅ. गाडगीळांना फड मारता आला नसता का ? याकरता बॅ. विठ्ठलराव गाडगीळांनी बारामतीकरांना ही थाप का मारली की, मुडदे पाडा, हा हुकूम मोरारजींचा होता ? नेहरूंचे पुण्य नेहरू कुटुंबाला द्यावे, मोरारजींचे पाप मोरारजींना द्यावे.

मोरारजीभाई काही पुनः महाराष्ट्राचे मंत्री होणार नाहीत. पण महाराष्ट्राचे चालू मुख्यमंत्री शंकररावजी चव्हाण, विरोधकांना 'मिसा'खाली डांबण्याच्या सौम्य शिक्षेवर नाराज आहेत. त्यांनीही नुकतीच गर्जना केली आहे, 'दुसऱ्या देशात असे झाले असते तर अशा लोकांना गोळ्या घालून मारले असते !' म्हणजे देशात अराजक माजवले, असा ज्यांच्यावर आरोप केला जातो आहे, ते जयप्रकाश नारायण, मधु लिमये, अटलबिहारी बाजपेयी, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे या सर्वांना मुख्यमंत्री चव्हाण जर इतर कोणत्या देशात मुख्यमंत्री असते तर त्यांनी गोळ्याच घातल्या असत्या असा भावार्थ ! केवळ इंदिराजींचे केंद्र सरकार पुरेसे बळकट नसल्यानेच हा कार्यक्रम आतापर्यंत होऊ शकलेला नाही, हे चालू मुख्यमंत्र्यांचे दुःख आहे. निरपराध्यांना वर्षानुवर्षे तुरुंगात डांबण्यावर मुख्यमंत्र्यांना तूर्त समाधान मानावे लागत आहे, या त्यांच्या दुःखात

पृष्ठ २९ वर

## भयपर्वातील निर्भयता !

# उत्स्फूर्त निषेध, सभा, मोर्चे, सत्याग्रह, संप !

पन्नालाल सुराणा

**२५–२६** जून १९७५ च्या रात्री आणीबाणी पुकारून जे. पी. व विरोधी पक्षनेत्यांची धरपकड झाली आणि वृत्तपत्रांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली. ही बातमी दुसऱ्या दिवशी फारच थोड्या लोकांना कळली. वर्तमानपत्रे व राजकीय पक्षांची कार्यालये यांच्यामार्फत राजकीय बातम्या जनतेला समजायच्या. पण आता त्यांची पूर्ण नाकेबंदी करण्यात आली. तरीही शहरी विभागात बऱ्याच ठिकाणी आणीबाणीविरुद्ध निषेध प्रकट झाला. बिहारमध्ये मुजफरपूर, गया व आरा, राज्यस्थान–कोटा आणि महाराष्ट्रात मुंबई, पुणे, धुळे, जळगाव, पाचोरा, भुसावळ इत्यादी शहरांत मोर्चे निघाले आणि दुसऱ्या दिवशी हरताळ पाळण्याचे आदेश देण्यात आले. पंजाब, केरळ, कर्नाटक, गुजरात या राज्यांतही फार मोठी निदर्शने झाली. २६ जून १९७५ ला अलाहाबाद उच्च न्यायालय वकील संघाने आणीबाणीचा निषेध केला. मुंबईतील सर्व वकिलांनी आणीबाणीचा निषेध करून कोर्टाच्या कामकाजावर एक दिवस बहिष्कार टाकला.

२६ जुलै ७५ रोजी मद्रासच्या मरीन बीचवर सुमारे सहा लाख नागरिकांची सभा झाली. श्री. करुणानिधींच्या भाषणानंतर सर्व श्रोत्यांनी उभे राहून लोकशाहीचे संरक्षण करण्याची प्रतिज्ञा घेतली. भारत सरकारचे सॉलिसिटर जनरल श्री. एस्. व्ही. गुप्ते आणि ॲडिशनल ॲडव्होकेट जनरल श्री. नरीमन यांनी आणीबाणीच्या निषेधार्थ आपले राजिनामे दिले. मध्यप्रदेशचे ॲडव्होकेट जनरल श्री. वामनराव धर्माधिकारी यांनी राजीनामा दिला. प्रा. एम्. एल्. दातवाला यांनी रिझर्व बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा दिला. आणीबाणीनंतर झालेल्या एका समारंभात मुख्यमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांच्या उपस्थितीत परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉ. दत्ताजीराव साळुंके यांनी म्हटले की, "ज्ञानाची वाढ व जोपासना स्वतंत्र वातावरणातच होऊ शकते, तर बंधनात अडकल्याने विद्या कुजते.' त्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला व ते परदेशात गेले.

सर्वोच्च न्यायालयासमोर इंदिराबाईंच्या वतीने निवडणूक अपील चालविणारे मुंबईचे सुप्रसिद्ध कायदेपंडित एन्. ए. पालखीवाला यांनी आणीबाणीच्या निषेधार्थ त्या कामातून आपले अंग काढून घेतले.

आणीबाणीनंतर दोनतीन दिवस दिल्ली शहरात इंदिराशाही विरोधी पोस्टर्स लागली व भित्तीपत्रके वाटली गेली. अमृतसर येथे सत्याग्रह सुरु झाला. दिल्ली विद्यापीठ व जवाहरलाल नेहरू विद्यापीठ यांतील विद्यार्थी व प्राध्यापकांनी आणीबाणीच्या निषेधार्थ पत्रके वाटली. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणावर धरपकड झाली.

पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे २९ जून १९७५ रोजी दिल्लीच्या चांदणी चौकात श्रीमती विजयाराजे शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह झाला. पुढे चार दिवस सतत सत्याग्रह होत राहिला.

देशात अनेक ठिकाणी लाखो गुप्तपत्रके छापून वाटण्यात आली. तसेच मराठीतील, 'साधना', 'जनवाणी', 'माणूस' ही साप्ताहिके व 'मराठवाडा' व 'प्रभात' ही दैनिके सेन्सॉरशिपची बंधने न मानता आपली प्रकाशनाची कामे चालवीत राहिले. इंग्रजीतील जनता, ओपिनियन, हिम्मत व गुजराथीतील साधना व भूमिपत्र यांनीही सेन्सॉरशिपची बंधने मानली नाहीत.

१३ ते १९ जुलै १९७५ पर्यंत विविध शहरांत विरोधी निदर्शने झाली. सुमारे पंधराशे लोकांना भारत संरक्षण कायद्याखाली अटक करण्यात आली. १६ ते १९ जुलै १९७५ मुंबई शहरातही वैयक्तिक सत्याग्रह झाले. बिहारमध्ये आरा येथील टेलिफोन एक्स्चेंजजवळ मोर्चा गेला असता त्यावर गोळीबार झाल्याने ११ माणसे मरण पावली. चिडलेल्या जमावाने टेलिफोन एक्स्चेंजला आग लावली. उत्तर प्रदेशात बलिया, मेरठ आणि मुरादाबाद या जिल्ह्यांतील अनेक पोलीस स्टेशनांना घेराव करण्यात आला.

२६ जुलै १९७५ ला गुजराथेतील सर्व शहरांत हरताळ पाळण्यात आला. अहमदाबादेत फार मोठी सभा झाली. मुख्यमंत्री श्री. बाबूभाई पटेल यांनी आणीबाणीच्या निषेधार्थ भाषण केले.

मुंबई विद्यापीठ व मुंबईतील महाविद्यालये यांच्यातील सुमारे ४०० प्राध्यापकांनी 'आणीबाणी तात्काळ मागे घ्यावी' अशा अर्थाचे निवेदन राष्ट्रपतींना पाठविले. पुणे व मराठवाडा विद्यापीठातूनही अशा प्रकारची निवेदने पाठविण्यात आली. १ ऑगस्ट, ९ ऑगस्ट, १५ ऑगस्ट १९७५ ला देशात अनेक ठिकाणी सत्याग्रह झाले. मराठवाड्यात २५० सत्याग्रहींना शिक्षा झाल्या. बिहारमध्ये अनेक ठिकाणी सत्याग्रहींना पोलिसांनी अटक केलीच नाही. १६ सप्टेंबर १९७५ रोजी केरळ राज्य नागरी हक्क परिषद भरविण्याचा प्रयत्न झाला. पण त्यापूर्वी सरकारने श्री. इ. एम्. एस्. नंबुद्रीपाद, ए. के. गोपालन, श्री. विश्वंभरम् आदी नेत्यांना अटक केली. २३ सप्टेंबर १९७५ ला कर्नाटकातील विद्यार्थ्यांनी हरताळ पाळला.

२ ऑक्टोबर १९७५ रोजी दिल्ली येथे राजघाटावर इंदिराबाई प्रार्थना संपवून परत जाताना ११ तरुणांनी निदर्शने केली. त्यांना बरेच दिवस तुरुंगवास भोगावा लागला. त्याच दिवशी संध्याकाळी

राजघाटावर प्रवचनाचा कार्यक्रम झाला. आचार्य कृपलानी, एच्. व्ही. कामथ, सुशीला नायर आदींची भाषणे झाली. त्या लोकांना पकडण्यात आले. त्यापैकी एच्. व्ही. कामथ व ९ जणांवर भारत संरक्षण कायद्याखाली खटला भरण्यात आला. ५ महिन्यांनंतर न्यायालयाने त्यांची निर्दोष म्हणून मुक्तता केली.

२ ऑक्टोबर १९७५ रोजी महाराष्ट्रात अनेक शहरांत सुमारे ४ लाख विद्यार्थी, कामगार व अन्य नागरिकांनी 'निर्भय बनो' हा गांधीजींचा संदेश असणारे बिल्ले लावले. त्यासाठी सुमारे १२५ लोकांना अटक करण्यात आली.

'पेन' ह्या साहित्यिकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या भारतीय शाखेने सेन्सॉरशिप विरुद्ध ठराव संमत केला. त्या ठरावात म्हटले होते की, पेनच्या भारतीय शाखेची स्थापना करताना कुठल्याही स्वरूपाची सेन्सॉरशिप सहन केली जाणार नाही असे एक कलम जाहिरनाम्यात घातले होते, व त्यावर पंडित जवाहरलाल नेहरू व डॉ. राधाकृष्णन यांनी सह्या केल्या होत्या.

श्री. गौरकिशोर हे बंगालीतील नामवंत लेखक आहेत. त्यांनी आणीबाणीच्या निषेधार्थ मुंडन केले. 'कालिकात' ह्या नियतकालिकात आपल्या मुलाला उद्देशून एक अनावृत्त पत्र त्यांनी प्रसिद्ध केले. त्यानंतर ६ ऑक्टोबर रोजी त्यांनी अटक करण्यात आली. कोर्टाने त्यांना निर्दोष सोडले. पण पोलीसांनी त्यांना 'मिसा'खाली पकडून कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी तुरुंगात ठेवले.

देशांतील अनेक साहित्यिक व विचारवंतांनी आकाशवाणी व दूरचित्रवाणी यांचे कार्यक्रम स्वीकारायचे नाहीत, असा निर्णय घेतला.

मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा श्रीमती दुर्गा भागवत यांनी आणीबाणीचा निषेध करून लेखकांचे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित असले पाहिजे, असे मत अनेक सभांतून मांडले. डिसेंबर १९७५ मध्ये कऱ्हाड येथे झालेल्या साहित्य संमेलनात श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, पु. ल. देशपांडे, वि. स. खांडेकर व दुर्गाबाई यांनी देशातील राजकीय परिस्थितीबद्दल चिंता व्यक्त करून अभिव्यक्तीवरील बंधने मागे घेण्याची विनंती सरकारला केली. तसेच जे. पीं. ना प्रकृतिस्वास्थ्य लाभावे, यासाठी सर्वांनी म्हणजे उपस्थित साहित्यिक व दहा हजार श्रोत्यांनी उभे राहून प्रार्थना केली. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून उपस्थित असलेले परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण हेही या प्रार्थनेच्या कार्यक्रमात सहभागी झाले.

गुजराथ साहित्य संमेलनानेही आणीबाणीच्या निषेधाचा ठराव मंजूर केला. सुप्रसिद्ध कन्नड साहित्यिक श्री. शिवरामन कारन्थ यांनी पद्मभूषण हा किताब परत केला.

गुजराथमधील वकिलांच्या दोन परिषदा होऊन त्यांनी आणीबाणीच्या निषेधाचे ठराव केले. तसेच 'सिटिझन्स फॉर डेमॉक्रसी' या संस्थेच्या वतीने १२ ऑक्टोबर १९७५ रोजी अहमदाबाद येथे नागरी स्वातंत्र्य परिषद घेण्यात आली. भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश श्री. जे. सी. शहा हे परिषदेचे अध्यक्ष होते. व श्री. एम. सी. छगला यांनी परिषदेचे उद्घाटन केले. त्या परिषदेने केलेल्या ठरावान्वये आणीबाणी मागे घ्यावी, राजकीय स्थानबद्धांना सोडावे; वृत्तपत्रांवरील निर्बंध मागे घेण्यात यावे, घटनेच्या कलम २२६ अन्वये असलेले उच्च न्यायालयाचे अधिकार काढणाऱ्या घटना दुरुस्त्या करू नयेत, आणि खुल्या वातावरणात लवकर निवडणुका घ्याव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या.

आणीबाणी जाहीर झाल्यानंतर कामगार संघनांवरील दडपशाहीही वाढलेली होती. काही काळ सगळीकडे सन्नाटा पसल्यासारखे झाले. या परिस्थितीचा फायदा घेऊन मालक–वर्ग बेगुमानपणे वागू लागला होता. काही ठिकाणी कामगारांनी मर्यादित प्रतिकार केला. निदर्शने व संप झाले. सप्टेंबरात केंद्र सरकारने बोनस कायद्यात बदल करणारा वटहुकूम काढला. त्यामुळे कामगारांत नाराजी पसरली. कलकत्ता, नागपूर, अहमदाबाद, मुंबई वगैरे शहरांत कामगारांत मोठ्या प्रमाणात पत्रके वाटण्यात आली. हैद्राबाद येथील आय. डी. पी. एल. ह्या औषधांच्या सरकारी कारखान्यात काम संपल्यावर कामगार बसून राहिले. दुसऱ्या दिवशीही त्यांनी आपला बैठा संप चालूच ठेवला. त्यांना हुसकून काढण्यासाठी सी. आर. पी. चे पोलीस कारखान्यात घुसले. त्यांनी गोळीबार केला. त्यात ५ कामगार ठार झाले. २४ ऑक्टोबर रोजी तामीळनाडूत बोनसच्या प्रश्नावर एक दिवसाचा लाक्षणिक संप करण्यात आला. मुंबईत कमी दराने दिला जाणारा बोनस स्वीकारू नये, अशी मोहीम काही कामगारांनी चालविली. तिला सुमारे ५,००० कामगारांनी प्रतिसाद दिला.

महाराष्ट्रातील प्राध्यापकांच्या नव्या वेतनश्रेणीचा प्रश्न भिजत पडला होता. ऑगस्टमध्ये प्राध्यापक संघाच्या कार्यकारिणीने त्याविषयावर ठराव केला. त्याबरोबर त्या संघटनेचे नेते डॉ. केणे व प्रा. दत्त यांना मिसाखाली स्थानबद्ध करण्यात आले. त्याच्या निषेधार्थ राज्यभरच्या प्राध्यापकांनी छातीवर काळ्या फिती लावल्या.

## संघटित मोहीम

७ नोव्हेंबरला इंदिराबाईंच्या निवडणूक अपिलाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या बाजूने दिला. त्यामुळे इंदिराबाई आणीबाणी उठवतील अशी अनेकांची अपेक्षा होती. आचार्य कृपलानींनी त्यांना व्यक्तिशः व जाहीर पत्र पाठवून तशी विनंतीही केली. पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

दि. २४ जून १९७५ रोजी दिल्ली येथे झालेल्या जनसंघ, संघटना कांग्रेस, भारतीय लोकदल व समाजवादी यांच्या संयुक्त बैठकीत लोकसंघर्ष समितीची स्थापना करण्यात आली होती. पण दुसऱ्याच दिवशी आणीबाणीचे दमनचक्र सुरू झाल्याने लोकसंघर्ष समितीचे कामकाज सुरू होऊ शकले नव्हते. एकदोन दिवसात अंदाज आल्यानंतर अनेक कार्यकर्त्यांनी सावधपणे कामाला सुरुवात केली. आणीबाणी उठवा, राजबंद्यांची मुक्तता करा, वृत्तपत्रांवरील बंधने मागे घ्या, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आदी संघटनांवरील बंदी उठवा, शेतमालाला योग्य भाव द्या, कामगारांना पूर्वीप्रमाणे ८% बोनस मिळेल अशी व्यवस्था करा आदी मागण्यांसाठी १४ नोव्हेंबरपासून देशभर सत्याग्रहाची मोहीम सुरू करण्याचे ठरले. अनेक भितीपत्रके लावून, घोषणा रस्त्यावर लिहून आणि लाखो पत्रके घरोघर वाटून मागण्यांचा प्रचार करण्यात आला. आणि सत्याग्रहाला सुरवात झाली. सुमारे २ महिने ही मोहीम चालली. सबंध देशात सुमारे १ लाख २० हजार व्यक्तींनी सत्याग्रह केला. त्यात काहीजणांना १ दिवसाची

तर काहींना ३ वर्षांच्या शिक्षा झाल्या. या मोहिमेत राष्ट्रीय स्वयं-सेवक संघाच्या व्यक्तींनी फार मोठ्या संख्येने भाग घेतला. विद्यार्थी व युवक यांचीही संख्या लक्षणीय होती. केवळ मोठ्या शहरातच नव्हे तर जव्हार (जि. ठाणे), चिमूर व वरोरा (जि. चंद्रपूर), चिखली (जि. बुलढाणा) अशा छोट्या छोट्या गावीसुद्धा स्त्रीयांनी सत्याग्रह केला. काही शहरांत कामगारांनीही सत्याग्रहात भाग घेतला.

२६ जून १९७६ रोजी बिहारच्या अनेक शहरांत विद्यार्थ्यांनी मशाल-मिरवणूका काढल्या. केरळमध्ये जिल्हा व तालुका कचेऱ्यांवर ५०-५० च्या जथ्याने मोर्चे नेण्यात आले. आणीबाणी उठवा, अशा अर्थाचे सुमारे ५ लाख लोकांनी सह्या केलेले निवेदन गृह-मंत्र्यांना सादर करण्यात आले. अनेक सार्वजनिक ठिकाणी काळे झेंडे लावण्यात आले. सुमारे २५,००० लोकांना भारत संरक्षण कायद्या-खाली शिक्षा झाल्या. महाराष्ट्रातून सुमारे १०,००० लोकांनी एक दिवसाचे उपोषण केले. व ५०,००० लोकांनी जिवंत ठेवा असे बिल्ले लावले. त्याबद्दल नऊ जणांना शिक्षा झाली. दिल्लीमध्ये फार मोठ्याप्रमाणावर भितीपत्रके लावण्यात आली. पंजाबात सत्याग्रह झाला.

जून ते ऑक्टोबरपर्यंत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, जनतंत्र समाज, लोकसंघर्ष समिती इत्यादी संघटनांच्या मार्फत घटनादुरुस्तीच्या प्रश्नावर जनजागृती मोहीम चालविण्यात आली.

भारतात आणीबाणी जाहीर झाल्यानंतर अमेरिकेतील व युरोप-मधील अनेक वृत्तपत्रांनी टीकात्मक मतप्रदर्शन केले. सोशॅलिस्ट इंटर नॅशनल ह्या संघटनेने राजबंद्यांची मुक्तता करावी व वृत्तपत्रांवरील निर्बंध मागे घ्यावेत, अशी मागणी केली. इंग्लंडमध्ये 'जे. पी. बचाव' (Save J. P.) कमिटी स्थापन झाली. १५ ऑगस्ट १९७५ रोजी ह्या कमिटीच्या वतीने जे. पी. व इतर राजबंद्यांची मुक्तता करावी, अशा आशयाचे पत्रक प्रसिद्ध झाले. त्यावर ७५ ब्रिटिश संसदसदस्य व २०० अन्य ब्रिटिश नामवंत, प्रमुख नागरिकांच्या सह्या होत्या. इंग्लंड, फ्रान्स, प. जर्मन, कॅनडा आदी देशांत जे भारतीय नागरिक राहत आहेत, त्यांनी 'इंडियन्स फॉर डेमॉक्रॉसी' या नावाने समित्या स्थापन केल्या. १६ जानेवारी व २६ जून १९७६ या दिवशी त्या देशातील भारत सरकारच्या कचेऱ्यांसमोर या भारतीय नागरिकांनी निदर्शने करून भारतातील दडपशाहीचा निषेध केला. जनसंघाचे खासदार सुब्रह्मण्यम स्वामी, मुंबईचे विख्यात कायदेपंडित श्री. राम जेठमलानी, समाजवादी कार्यकर्त्या लैला फर्नांडीस यांनी भारतातील दडपशाहीची माहिती जगभर लोकांना देण्याचे काम परदेशांत हिंडून केले. या सगळ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर इंटर नॅशनल लीग फॉर ह्युमन राइटस (मानवी हक्कांसाठी आंतरराष्ट्रीय संघ) या संघटनेने संयुक्त राष्ट्र-संघाकडे एक निवेदन देऊन भारतात मानवी हक्कांची पायमल्ली झाल्याच्या तक्रारींची चौकशी करण्यासाठी एक प्रतिनिधी मंडळ पाठवावे, अशी विनंती केली. त्यावर भारत सरकारने संयुक्त राष्ट्र-संघाला कळविले की, तसे करणे म्हणजे भारताच्या अंतर्गत कार-भारात हस्तक्षेप करणे ठरेल.

श्री. जॉर्ज फर्नांडीस यांना अटक झाल्यानंतर श्री. हॅरॉल्ड विल्सन (इंग्लंडचे माजी पंतप्रधान), श्री. विली ब्रॅन्ट (प. जर्मनीचे माजी पंतप्रधान) यांनी इंदिराबाईंना पत्र पाठवून फर्नांडिसांचा छळ करू नये, अशी विनंती केली. तसेच फर्नांडिसांचा छळ झाल्यास भारतीय जहाजावर आम्ही बहिष्कार टाकू, असे पत्रक अनेक देशांतील गोदी कामगारांच्या संघटनांनी व रेल्वे आणि वाहतूक कामगारांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेने काढले.

२६ जुलै १९७६ रोजी अहमदाबाद येथे जनता मोर्चाच्या वतीने प्रचंड सभा झाली आणि मोर्चा काढण्यात आला. त्यात भाग घेतल्या-बद्दल गुजरातचे माजी मुख्यमंत्री बाबूभाई पटेल व इतर २० आम-दारांना अटक करण्यात आली व रात्री सोडून देण्यात आले. १ ते ९ ऑगस्टच्या दरम्यान तामिळनाडू व गुजरातेत मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह झाले. सं. कांग्रेस व सर्वोदय कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणावर स्थानबद्ध करण्यात आले. श्रीमती मणिबेन पटेल यांच्या नेतृत्वाखाली दांडीपर्यंतचा मोर्चा संघटित करण्यात आला.

## पीपल्स फॉर सिव्हिल लिबर्टीज्ची स्थापना

ता. १६-१७ ऑक्टोबर १९७६ रोजी नवी दिल्ली येथे श्री. व्ही. एम. तारकुंडे यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद होऊन उपरोक्त संस्थेची स्थापना करण्यात आली. श्री. जयप्रकाश नारायण, अध्यक्ष, व्ही. एम. तारकुंडे, कार्यकारी अध्यक्ष व खा. कृष्णकांत हे निमंत्रक असून, संघटना कांग्रेस, जनसंघ, भालोद, समाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, क्रांतिकारी समाजवादी पक्ष, द्र. मु. क. यांचे नाम-वंत नेते कार्यकारी मंडळावर आहेत. प. बंगाल, बिहार, महाराष्ट्र, केरळ, आंध्र या राज्यांत या संघटनेच्या शाखा स्थापन झाल्या आहेत.

महात्मा गांधींपासून प्रेरणा घेऊन खेड्यांत गेल्या ३५ वर्षांपासून राहणारे ६५ वर्षांचे सर्वोदयी कार्यकर्ते व चित्रकार श्री. प्रभाकर शर्मा यांनी १४ ऑक्टोबर रोजी आणीबाणीच्या निषेधार्थ पवनार-पासून २ किलोमीटर अंतरावरील सुरगाव येथे आत्मदहन केले. तशी पत्रे त्यांनी विनोबा व पंतप्रधानांना पाठवली होती.

आणीबाणी उठवा, राजबंद्यांना सोडा व वृत्तपत्रांवरील निर्बंध मागे घ्या, या मागण्यांसाठी सर्वोदयी कार्यकर्ते श्री. वसंतराव नारगोलकर यांनी २५ डिसेंबर १९७६ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे.

सरकारने 'मिसा' व डी. आय. आर. खाली सुमारे ८० हजार राजकीय व सर्वोदयी कार्यकर्त्यांना पकडून विनाचौकशी तुरुंगात डांबले होते. त्यांची व सत्याग्रहींची संख्या मिळून २ लाखांच्या घरात गेली. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत एका वेळी जास्तीत जास्त ९० हजार लोक तुरुंगात होते. स्वातंत्र्य चळवळीची तयारी १८८५ सालापासून सुरू झाली होती. परकियांना या देशातून घालवून देण्याची मागणी सर्व भारतीयांच्या हृदयाला हात घालणारी होती. स्थानबद्धतेचा वापर इतक्या बेछूटपणे होत नव्हता आणि मुख्य म्हणजे वृत्तपत्रांवर सेन्सॉरशिप नव्हती. चळवळींच्या बातम्या व निवेदने वृत्तपत्रांतून येऊ शकत होती. यापेक्षा किती तरी प्रतिकूल परिस्थिती आणीबाणीनंतर निर्माण झाली असताना देखील सुमारे

२ लाख लोकांनी तुरुंगवास पत्करला व त्यांच्या कुटुंबियांनी विनतक्रार हाल व कष्ट उपसले. पकडून ठेवलेल्या कार्यकर्त्यांबद्दल त्यांच्या त्यांच्या भागात आपुलकीची भावना टिकून राहिली. 'हे सगळे देशद्रोही आहेत,' असे इंदिराबाईंनी म्हटले तरी लोकांनी मात्र त्यांना देशसेवकच मानले. राजकीय पक्षांशी पूर्वी संबंध नसलेले अनेक पत्रकार, साहित्यिक, विचारवंत, कायदेपंडित यांनी परिणामांची पर्वा न करता हुकूमशाहीविरुद्ध आपला निषेध प्रकट केला. एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, आचार्य कृपलानी, एच. व्ही. कामथ, एम. सी. छागला, व्ही. एम. तारकुंडे आदी वयोवृद्ध नेते सतत हिंडत राहिले. छोट्या छोट्या सभा–बैठकांतून हुकूमशाही राजवटीचे स्वरूप समजावून सांगून जनतेला ते निर्भय बनवत राहिले. गंभीर आजारपणामुळे जे. पीं. ची ११ नोव्हेंबर १९७५ रोजी तुरुंगातून सुटका झाली. तरी त्यांचा लोकशाहीसाठी व संपूर्ण क्रांतीसाठी लढण्याचा निर्धार कायम राहिला. रुग्णशय्येवरून ते चळवळीला मार्गदर्शन करू लागले. अनेक छोटे–मोठे कार्यकर्ते चळवळ संघटित करण्यासाठी भूमिगत राहून कार्य करू लागले. सरकारच्या दृष्टीने बेकायदेशीर असणारी अनेक पत्रके सतत निघत राहिली. ही पत्रके छापल्याबद्दल किंवा जवळ बाळगल्याबद्दल ७ हजार लोकांना अटक झाली, असे सरकारने संसदेत सांगितले. हे सर्व पाहता इंदिराबाईंच्या हुकूमशाहीमुळे भारतातील लोकशाहीवादी शक्ती दबल्या तर नाहीच, उलट त्यांनी प्रतिकार मोहीम चांगल्या प्रकारे चालू ठेवली, असेच दिसून येते.

संघटित राजकीय पक्षांपैकी इंदिराबाईंच्या दडपशाहीला घाबरून कुणी आपली भूमिका बदलली असेही झाले नाही. बिहार आंदोलन ऐन भरात असताना कांग्रेस व उजवा कम्युनिस्ट पक्ष त्याविरुद्ध आग पाखडत होताच. आणीबाणीला त्या दोन पक्षांनी पाठिंबा देणे स्वाभाविक होते. शिवसेना, मुस्लीम लीग, हिंदू महासभा या पक्षांनी जे. पीं. च्या चळवळीला हातचे राखून पाठिंबा दिला होता. आणीबाणीनंतर या तीन पक्षांनी बाजू बदलून इंदिराबाईंना पाठिंबा दिला. जे. पीं. च्या चळवळीला पाठिंबा देणारे जनसंघ, संघटना कांग्रेस भारतीय लोकदल, समाजवादी पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष फॉरवर्ड ब्लॉक, अकाली दल, शेतकरी कामगार पक्ष, द्रविड मुन्नेत्र कळघम, रिपब्लिकन पक्ष (खोब्रागडे) यांनी दडपशाहीला न जुमानता आणीबाणीचा निषेध केला. सर्वोदय कार्यकर्त्यांपैकी बरेच जण आणीबाणीपूर्वीही जे. पीं. च्या बाजूचे होते. पण त्यावेळी विरोधात असलेले आर. के. पाटील यांनी आणीबाणीनंतर उत्तर प्रदेश सरकारच्या जमीन सुधारणा कमिशनरपदाचा राजीनामा दिला व आणीबाणीचा निषेध केला. विनोबांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल त्यांचे निकटवर्ती सहकारी नाराज झाले. श्री. वसंतराव नारगोळकर यांनी २५ डिसेंबर १९७५ पासून २५ दिवसांचे उपोषण केले.

ज्या कामगार संघटना कांग्रेस व उजव्या कम्युनिस्ट पक्षांशी संबंधित आहेत त्यांनी आणीबाणीचे स्वागत केले. पण सीटू, हिंद मजदूर पंचायत; भारतीय मजदूर संघ; हिंद मजदूर सभेच्या अनेक शाखा व अनेक स्वतंत्र कामगार संघटना यांनी आणीबाणीचा निषेध केला. या संघटनांनी एकत्र येऊन देशातील परिस्थितीचा विचार केला व १९७६ च्या मे महिन्यांत देशातील कामगार वर्गाला उद्देशून एक संयुक्त पत्रक काढले. त्यात म्हटले आहे, 'आणीबाणीमुळे कामगारांच्या हक्कांवर व संघटना–स्वातंत्र्यावर जबरदस्त आघात झाला आहे. सरकारने स्वीकारलेले आर्थिक धोरण धनिकधार्जिणे व कामगारविरोधी आहे. अशा स्थितीत ज्या कामगार संघटना आणीबाणीला पाठिंबा देत आहेत, त्या कामगार वर्गाचा विश्वासघात करीत आहेत. आपल्या ट्रेड युनियन हक्कांसाठी आणि सर्व जनतेच्या लोकशाही हक्कांसाठी कामगारवर्गाने आपली एकजूट वाढवून लोकशाहीच्या व्यापक लढयात सर्वसामान्य नागरिकांच्या खांद्याला खांदा लावून उतरले पाहिजे.' आणीबाणीनंतर कांग्रेस व उजव्या कम्युनिस्टांनी इतरांच्या कामगार संघटना ताब्यात घेण्याचा जबरदस्तीने प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही.

आणीबाणीला भांडवलदार व धनिक वर्गाने उत्साहाने पाठिंबा दिला. इंदिराबाईंच्या दडपशाही धोरणामुळे त्यांना हवी असलेली औद्योगिक शांतता लाभत असून कामगार व गिऱ्हाईक या दोघांचीही मनमुराद पिळवणूक करता येऊ लागली. उच्च–मध्यमवर्गातील अनेकांना मोर्चे, संप, घेराव यांमुळे आपल्या जीवनाची लय बिघडते, असे वाटत होते. आणीबाणीमुळे ते सर्व थांबल्याने तेही खूप झाले. पण जसजसा काळ जात चालला तसतसे त्यांच्यातलेही काहीजण अस्वस्थ होऊ लागलेले आहेत.

मध्यम व कनिष्ठ मध्यमवर्ग हा पहिल्यापासूनच आणीबाणीवर नाराज होता. त्यांच्यातले काहीजण स्वार्थासाठी भाटगिरी करू लागले तरी एकंदरीने हे दोन्ही वर्ग उदारमतवादी परंपरा चालविणारे आहेत. वकील, प्राध्यापक, शिक्षक या वर्गांत नागरिकस्वातंत्र्यावर आलेल्या बंधनामुळे चीड वाढली आहे. त्यातच त्यांचे व्यावसायिक व दैनंदिन प्रश्न बिकट होऊ लागल्याने असंतोष धुमसतो आहे.

कामगार वर्गात सुरुवातीला दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. शिवाय अन्नधान्य स्वस्त झाल्याने त्यांचे जीवन थोडे सुसह्य झाले होते. पण बोनस कपात वटहुकमामुळे त्यांच्यात नाराजी पसरली. आपल्यावर झालेल्या अन्यायाचा प्रतिकार करणे आणीबाणीमुळे अवघड झाले आहे, असाही अनुभव त्यांना येऊ लागला. हळूहळू ते आपल्या प्रश्नांवर लढू लागले. त्यांच्या संपाच्या व निदर्शनाच्या बातम्या वर्तमानपत्रांत येऊ शकत नसल्या तरी संप बरेच होत आहेत, हे सरकारला कबूल करावे लागेल. १९७६ च्या सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यांत तर बोनसच्या प्रश्नावर प. बंगाल व महाराष्ट्र या राज्यांत कामगारांनी स्वयंस्फूर्तपणे चळवळी केल्या. मुंबईच्या कापड गिरण्यांत १ ते ३ दिवसांचे संप झाले. □

पुणे वार्ता

संघर्षबिंदू हरवून बसलेले

# अभिरूप न्यायालय

## एक लक्षणीय प्रयोग

संजीव मंगरूळकर

स. प. महाविद्यालयाच्या हीरकमहोत्सवाप्रीत्यर्थ, त्यांच्या काही आजी आणि माजी विद्यार्थ्यांनी 'अभिरूप न्यायालया'चा एक अभिनव प्रयोग सादर केला. काही चळवळ्या प्रयोगशील युवकांनी केलेला एक नावीन्यपूर्ण प्रयोग म्हणून पुण्यातील वृत्तपत्रांनी आपल्या 'युवक–विश्व'सारख्या सदरातून त्यांचा गौरवही केला. परंतु केवळ युवकांनी केलेला एक प्रयोग म्हणून त्यांचे असे 'युवकविश्व' छाप कौतुक करण्यापेक्षा, काही प्रयोगशील युवक कलाकारांच्या या आविष्काराचे अधिक सखोल (आणि म्हणूनच परखडही!) मूल्यमापन केले जाणे आवश्यक आहे असे वाटते.

अभिरूप न्यायालयाचा विषय होता: बुवाबाजी आणि समाज. आणि यात सजनीश, असत्य घाईबाबा आणि माताजी या तीन आरोपींवर (बुवांवर) समाजाच्या श्रद्धेचा गैरफायदा घेणे, दैवी चमत्कारांच्या नावाखाली हातचलाखी करणे, भक्तांवर नजरबंदीचे प्रयोग करणे यांसारखे आरोप ठेवण्यात आले होते. सर्व साक्षी-पुराव्यांनंतर अर्थातच बुवांना दोषी ठरवण्यात येऊन त्यांना काही सौम्य आणि विडंबनात्मक शिक्षाही ठोठावण्यात आल्या.

हा सर्व या प्रयोगाच्या 'कथानका'चा आराखडा झाला. मात्र तांत्रिक दृष्टीने विचार केल्यास, हा प्रयोग हा वक्तृत्वाचा, वादविवादाचा प्रयोग होता की नाटकाचा? कारण या प्रयोगाची संहिता पूर्णपणे बांधलेली होती, अभिनयाला त्यात दुय्यम स्थान होते, मात्र सेट, ड्रेपरी यांतून नाटकाचा आभासही होत होता. त्यामुळे प्रयोगाचे स्वरूप निश्चित होऊ शकले नाही. अर्थात हा मुद्दा प्रयोगाच्या दृष्टीने बराच गौण आहे. मात्र प्रयोगातील अभिनयाचे, त्यातील कथानकाचे, संघर्षाचे आणि संवादाचे महत्त्व निश्चित होण्याच्या दृष्टीने त्यावर अधिक विचार होणे अगत्याचे वाटते.

प्रयोगाच्या स्क्रिप्टमध्ये मात्र मला काही महत्त्वाचे दोष वाटतात. एक म्हणजे त्यातील सर्व कथानकाचा ओघ बराच पूर्वग्रहदूषित आहे. बुवाबाजी हा प्रकार निंद्य आणि आक्षेपार्ह आहेच, असे गृहीत धरून केवळ तेच सिद्ध करण्यासाठी सगळ्या साक्षी रचल्या आहेत. परिणामी आरोपींची बाजू फारच कच्ची राहिली आहे. न्यायालयाच्या या निर्णयाला कोणाचाच विरोध असण्याचे कारण नाही. परंतु हा निर्णय गृहीत धरूनच, त्यासाठी आरोपींची बाजू दुबळी ठेवणे बरोबर नाही; कारण यामुळे कथानकातला महत्त्वपूर्ण संघर्षबिंदू नष्ट होतो. कुठल्याही साक्षीत त्यामुळे अपेक्षित असलेल्या 'चकमकी' झडत नाहीत. खटकेबाज संवादही आढळत नाहीत. किंबहुना आरोपींचे बहुतेक सगळेच साक्षीदार गर्भितार्थाने आरोपींच्या विरुद्धच साक्षी देतात! एकाही साक्षीदाराने आरोपींची बाजू खऱ्या अर्थाने उचलल्याचे दिसत नाही. तत्त्वज्ञानाच्या प्राध्यापिका अरगडे (अरुणा ढेरे) यांना वस्तुतः आरोपींचे बरेच समर्थन करता येणे शक्य होते. परंतु आपल्या 'शब्दबंबाळ' आणि 'रटाळ' वक्तव्यामुळे त्यांनी एक अनाहूत विनोद निर्माण केला आणि त्यातून नाटयाचा संघर्ष ढासळला. इतका की, अरगडेबाईंचे हे पात्र घातलेच नसते तरच बरे वाटले असते, अशी परिस्थिती निर्माण झाली! चित्रपट अभिनेत्री सिथ्रूसिंग हेही पात्र असेच. सिथ्रूसिंगच्या 'चमचा'ने उगीचच फार गोंधळ माजवला. त्या पसाऱ्यात आणि सिथ्रूसिंगच्या तथाकथित ग्लॅमरमध्ये मूळ साक्ष पूर्णपणे बाजूलाच राहिली. याउलट स्वामीजींना मध्येच 'डार्लिंग' म्हणून बाईंनी गोंधळात आणखी भरच घातली. शेठ रसिकलालनी सुद्धा 'बाबां'चा रेससाठी, पैशासाठी होणारा उपयोग सांगून आणि त्यांना आपला फॅमिली गुरू बनवून स्वामींची अब्रू घेतली! सौ. शारंगपाणी यांनीही आपण स्वामींच्या 'डिस्कोर्स'मध्ये स्वेटर विणून वेळ काढीत असल्याचे शुभवर्तमान ऐकवले! या सर्व साक्षींमधील विडंबनाचा भाग स्तुत्य म्हणून एक वेळ गृहीत धरला तरीसुद्धा याच्या अतिरेकामुळे कथानकाचा तोल ढासळतो, यात शंका नाही. त्या दृष्टीने डॉ. मेघा तळाशीलकर यांची साक्ष बरीच परिणामकारक वाटते. फक्त त्यांनीच 'बुवाबाजी'-विषयी थोडा वेगळा आणि स्तुत्य विचार मांडला आहे.

या दृष्टीने तीनही आरोपींची साक्षसुद्धा पुरेशी प्रभावी वाटत नाही. असत्य घाईबाबांची साक्ष काहीशी परिणामकारक आहे. श्रद्धेचे आणि 'साफ नजरेचे' महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले. मात्र माताजी तर चक्क आपल्या 'डान्सिंग स्कूल' चाही कबुलीजबाब देतात आणि सजनीश केवळ आपल्या सर्वव्यापित्वाचीच साक्ष देतात. सजनीशांच्या दांभिकतेचे त्यांच्या साक्षीतून घडणारे दर्शन काही वेळा परिणामकारक वाटते. मात्र ते फारच ढोबळ आणि अतिरंजित वाटते. आणि त्यांची साक्ष केवळ एवढ्या एकाच मुद्याच्या प्रतिपादनात खर्ची पडलेली दिसते. अशा रीतीने संयोजकांच्या पूर्वग्रहामुळे कथानक फारच एकांगी बनलेले आहे. बुवाबाजीच्या समर्थनासाठी नव्हे, तरी किमान संघर्षनिर्मितीसाठी आरोपींची बाजू अधिक प्रभावी ठेवणे जरूरीचे होते.

याखेरीज बऱ्याच साक्षींमध्ये बरेच विषयांतरही झाले. मात्र हा दोष म्हणता येणार नाही. या विषयांतराच्या मिषाने समाजातील अंधश्रद्धेवर, दांभिकतेवर आणि बिनडोकपणावर हल्ला चढविण्यात आला आहे. यामुळे कथानकाला वेगळेच परिमाण लाभलेले आहेत. मात्र या विडंबनाच्या निमित्ताने येणारे खूपच विनोद पुनरावृत्त वाटतात. प्रयोगाच्या एकूण परिणामाला बाध आणणारी आणखी एक गोष्ट म्हणजे प्रयोगाची लांबी. सर्वच साक्षी अपेक्षेपेक्षा थोड्या जास्त लांबल्यासारख्या वाटतात. कु. शारदा अरगडे, मंदाकिनी शारंगपाणी, लांडगे यांसारखी काही पात्रे गाळली असती तरीही प्रयोगास अधिक उठाव आला असता. सीथ्रूसिंगच्या 'चमच्या'ने केलेला अतिरेकी पोरकटपणा हाही एक टाळता येण्यासारखा भाग.

या खटल्यात आरोपींवर ठेवण्यात आलेले सर्व आरोपही खूपच अस्पष्ट, धूसर

(Vague) वाटतात. कुठलाच आरोप आरोपींशी वस्तुनिष्ठ दृष्टीने संबंधित नाही. सर्वच साक्षीदारही आपल्या मोघम साक्षींमधून आरोपींचे गुन्हे गैरवाजवी 'सूचकतेने' सुचवतात. लांडगे, वाघमारे यांच्या अशा साक्षींऐवजी बुवाबाजीच्या शिकार बनलेल्या आणि आपल्यावर बुवाबाजीमुळे ओढवलेल्या आपत्तीचे पोटतिडकीने निवेदन करणाऱ्या काही व्यक्ती जर साक्षीदार केल्या असत्या, तर संघर्षाला अधिक तीव्र आणि गतिमान स्वरूप आले असते. कोर्टातील साक्षीदाराने व्यक्तिगत भूमिकेतून आरोप करणे अधिक आवाहनात्मक (appealing) वाटते. या न्यायालयातील बऱ्याच साक्षीदारांनी समाजसुधारक समाजधुरीणांच्या भूमिकेतून फारच व्यापक (!) साक्षी दिल्या. याच गोष्टीचा उल्लेख न्यायमूर्तींनीही आपल्या निकालपत्रात केलेला आहे. फिर्यादी पक्षातील हे वैगुण्य लक्षात येऊनही ते दूर का केले जाऊ नये, याचे कारण समजत नाही. या साक्षीदारांच्या साक्षी अधिक व्यक्तिनिष्ठ करण्याच्या दृष्टीने त्यांना काही पूर्वेतिहास देता येणे शक्य आहे. पूर्वेतिहासाच्या कथनातून आरोपींवर बरेच वस्तुनिष्ठ आरोप करता येतील. आणि साक्षीदारांनी स्वानुभवातून दिलेल्या या खळबळजनक साक्षीतून बुवाबाजीचे बुरखे अधिक प्रभावीपणे फाडता येतील! हा परिणाम साधण्यासाठी सर्वच साक्षीदारांना काही विशिष्ट पूर्वेतिहास आणि भूमिका देणे अगत्याचे वाटते.

कथानकातील काही जाणवलेल्या मुद्यांचा धावता आढावा वर घेतला आहे. अर्थात यातील बऱ्याच भागांवर आक्षेप घेतलेले असले तरी ते केवळ इतरत्र होणाऱ्या स्तुतीची पुनरावृत्ती टाळून अधिक सखोल विचारासाठीच घेतले आहेत. मंजिरी परांजपे यांचे दिग्दर्शन उल्लेखनीय वाटले. सर्वच कलाकारांनी प्रयोगासाठी घेतलेली मेहनतही प्रशंसनीय वाटते. शिरीष सहस्त्रबुद्धे यांनी अॅड. अभ्यंकरांची भूमिका नेटकेपणाने सादर केली. मात्र मंजिरी परांजपे स्वतः त्यांच्या अॅड. गुप्त्यांच्या भूमिकेत जरा जास्तच नाटकी वाटल्या! श्रीधर दीक्षित, माया टोणपी, बीना ढवळीकर, प्रा. कारेकर, प्रा. साने यांच्याही भूमिका विशेष चांगल्या वठल्या. अभिनेत्री सीथ्रलिंग हीसुद्धा अशीच बऱ्याच प्रेक्षकांनी दाद देऊन गौरवलेली भूमिका. मला मात्र ती खूपच सामान्य वाटली.

तर अशा रीतीने स. प. च्या दरवर्षीच्या परंपरेत भर घालणारे हे 'अभिरूप न्यायालय' प्रेक्षकांच्या भरघोस मनपसंतीस उतरलेले दिसते. बुवाबाजीसारख्या जिव्हाळ्याच्या आणि 'करंट' विषयाला हात घालून या न्यायालयाने एका वादग्रस्त विषयावर आपला निर्वाळा साफ जाहीर करून टाकला आहे आणि हल्लीच्या पुढाऱ्यांपेक्षा बुवाबाजीचा हा गुन्हा सौम्यच ठरवून त्यांना शिक्षाही ठोठावल्या आहेत! या सगळ्याच प्रयोगामागची समयसूचकता आणि औचित्य दाद देण्यासारखे आहे आणि भरपूर गर्दी करून पुणेकर रसिकांनी ती दिलेलीही आहे. फक्त या प्रयोगामागचे परिश्रम लक्षात घेता, त्याचे केवळ वरवर कौतुक करून 'सब आलबेल' म्हणण्यामुळे त्यातील कलाकारांवरही अन्याय होतो. त्यासाठीच या प्रयोगाची अधिक गंभीरपणे दखल घेतली जावी, एवढीच माफक अपेक्षा! □


*Gram* : 'Satyajayte' 'Satyaraj' *Phones* : 323599-338598 *Resi.* : 368429-358829

*Telex* : 011-4573 Satyaraj *Show Room* : 535491 *Extn.* : 332

**Prabhudas Hirji & Co.**

Merchants – Commission Agents

**Satyajit Boutique**

Show Room : International Transit Lounge, Bombay Air Port, Bombay – 400 054

**Satyaraj Exporters** ● **Rajeshkumar Company**

Exporters-Importers — Auto Parts Division

*Regd. Office* : 223, Samuel Street, Bombay – 400 003 (India).

*With Best Compliments From* :

**Patel wood works & Timber Mart,**

108, ReayRoad,
Bombay 400 033

*Telephone No.* : 376638

*Telegraphic Addres* : Patel wood

*Telex No.* : PATWOOD-011-4876

**Timber Merchants & Exporters**

*Branchers* : **Perandoor Road,**

**KALOOR – Cochin 17**

**and**

**NAUPADA – THANE**

# सोलकढी

## □ रिद्वान हॅरिस विरुद्ध मृणाल गोरे

निवडणुका आता होणार हे नक्की. काही मंडळी तर या निवडणुकांत कोणत्या पक्षाला किती जागा मिळतील आणि त्यानंतर काय काय होईल, हेसुद्धा अचूकनक्की सांगू लागले आहेत. इतके दूरचे पाहायला गेले की जवळचे अस्पष्टअंधुक दिसते, असा अनंतरावांचा अनुभव आहे. आणि या निवडणुकीत जवळचे इतके काही सुरस आणि चमत्कारिक आहे की ते सगळे पाहू पाहणाऱ्या डोळ्यांबद्दल सहानुभूती वाटावी.

'निवडणुकीच्या मोसमात मुंबईला एक नवी नशा चढते. उकाडा, रेशन, गाड्यांचा गोंधळ, वेतनश्रेणी, चित्रपट हे विषय मागे पडतात. मतदार, मतदारसंघ, दुरंगीतिरंगी लढत, घोषणा, प्रचार, उमेदवार, सभा, निवडणूकचिन्हे, मतपेट्या, शाई इत्यादी विषय चवीने चघळले जातात. या मोसमात शिवसेना बोबडी बोलते आहे. बाकी गोष्टी समान असत्या तर शिवसेनेच्या बोबडेपणामुळे वातावरणातला रंग उणावला असता. पण या वेळच्या निवडणुकीत तसे काही होणार नाही. परिस्थितीच अशी नामी उद्‌भवली आहे की, रंगाची आतषबाजी होण्यावाचून गत्यंतर नाही.

सगळ्या सहा मतदारसंघात ती होईल. पण त्यातल्यात्यात गोरेगाव–पालघर या मतदारसंघात ती विशेष होईल, असा निरीक्षकांचा (म्हणजे खरोखर कोणाचा, कोणास ठाऊक ?) अंदाज आहे. या मतदारसंघात जनता पक्षातर्फे साक्षात मृणाल गोरे निवडणुकीला उभ्या आहेत. मुंबईकराला एकवेळ चौपाटी ठाऊक नसेल; पण मृणाल गोरे फार चांगल्या ठाऊक आहेत. आणीबाणीपूर्वी दोनतीन वर्षे बाईंनी (म्हणजे मृणालताईंनी बरे) मुंबईत तकतक धूमधूम उडवून दिली होती. सामान्य बाईबाप्याला राजकारणाची गुटिका पिलवून दिली होती. तो आणि ती अडचणीचे प्रश्न, शासनकर्त्यांना अडवून, विचारायला लागले होते. मंत्रिमंडळाला आपला कडक आणि सफेत आब राखणे मुष्किल झाले होते. विधानसभेवर ताई निवडून आल्या त्याच माधवराव परांजप्यांसारख्या प्रतिस्पर्ध्यावर शर्थीने मात करून. पुढच्या काळात त्यांनी विरोधी पक्षाला एक वचकदार अस्मिता प्राप्त करून दिली. इतकी की आणीबाणी जारी होता होताच मुंबईच्या पोलिसांनी वास्तविक ताईंना अटक केली असली तरी पोलिसांना गुंगारा देऊन भूमिगत होऊन त्या चळवळ बांधत आहेत, अशीच अनेकांची पक्की समजूत होऊन राहिली होती. मग अफवा : कोणी सांगायचे, ताई दक्षिण अमेरिकेत जाऊन आणीबाणीविरोधी जनमत तयार करत आहेत; कोणी सांगायचे, महाराष्ट्र–सरकारच्या काही मंत्र्यांनीच ताईंना आश्रय दिला आहे; कोणी सांगायचे, ताईंनी म्हातारींची बेमालुम वेशभूषा केली असून त्या निर्भय मोकळेपणाने चाहेल तेथे हिंडताहेत. असे कोणी काही, कोणी काही, कोणी काहीबाही, कोणी नाही नाही ते सांगायचे. अफवांवर विश्वास टाकू नका, असा सरकारी आदेश असला तरी माझा आपला, म्हशीवर बगळा बसावा तसा, सगळ्यांवर विश्वास बसायचा. मग मित्रमंडळी माझी हवी तशी चेष्टा करायची. परंतु जारी असलेल्या आणिबाणीची दहशत घातली की, मित्रमंडळी निपचित व्हायची. असो.

गरिबी हटाव मोहिमेसारखी आणिबाणी अखंड चालूच राहील असे वाटू लागले असतानाच ती शिथिल झाली, आणि निवडणूक जाहीर झाली. पाठोपाठ, भरलेले तुरुंग रिकामे झाले. तुरुंगात एका छपराखाली एकत्र राहिलेले विरोधी पक्ष तुरुंगाबाहेरसुद्धा एका निशाणाखाली एकत्र आले. त्यांनी जनता पक्ष निर्माण करून निवडणुकीचे आव्हान स्वीकारले. काही औपचारिक यंत्रणा निर्माण होऊन ती मार्गाला लागण्याआधीच, गोरेगाव–पालघर मतदारसंघातून जनता पक्षातर्फे मृणाल गोरे उभ्या राहतील असे ठरून गेले.

काँग्रेसमध्ये तिकीट मागणारे इच्छूक मुबलक होते. सगळे लायकही होते. सगळ्यांनी देश बलवान करायला हातभार लावला होता. पण त्यातल्या एकालाही गोरेगाव–पालघर मतदारसंघ नको होता. जनता पक्षाला वाटले, मृणाल गोरेंना काँग्रेसवाले, भ्याले रे भ्याले. तसे अर्थातच काही नव्हते. सच्चा काँग्रेसवाला निर्भय असतो, हे त्यांना कसे कळणार ? हरी गोविंद वर्तकांचेच उदाहरण घेऊ. जुन्या महाराष्ट्र–मंत्रिमंडळात वर्तक पुरवठामंत्री होते. गोरे बाई आणि त्यांच्या काळचा बायका यांनी वर्तकांना पुष्कळ छळले. पण वर्तकांचे धैर्य गळले नाही अथवा त्यांच्या त्या खानदानी बोक्याची मिशी उतरली नाही. खरे म्हणजे मृणालताईंविरुद्ध गोरेगाव-पालघर मतदारसंघातून हा वर्तकी बोका जरी उभा राहिला असता तरी सहज निव-



डून आला असता, असे आम्हाला वाटते. परंतु मागच्या त्या घेरावप्रकरणामुळे तो बोका सात्त्विक बिथरला आहे. मृणालताई त्याला निवडणूक लढवण्याच्या योग्यतेच्या वाटत नाहीत. त्याला नाही; म्हणून वर्तकांना नाही; म्हणून त्यांनी नकार दिला. मग माजी मुंबई काँग्रेस समितीचे अध्यक्ष व्यास यांचे नाव पुढे आले; पण त्यांना अख्ख्या मुंबईकडे पाहायचे असल्यामुळे कोपऱ्यातल्या एखाद्याच मतदारसंघात निवडणूक लढवण्यात स्वारस्य नव्हते. त्यानंतर प्रभाकर कुंटे यांच्या नावाने बांग आली. आता प्रभाकर कुंटे म्हणजे केवढा ढाण्या माणूस. महाराष्ट्र–मंत्रिमंडळातल्या साखरफुटाण्याएवढ्या मंत्र्यामधला जणू बत्तासाच. त्यांना भीती वाटण्याचा काही प्रश्नच नव्हता. परंतु त्यांना एवढ्यात दिल्लीला जायचे नाही. येथेच राहून आणखी काही वर्षे त्यांना आपल्या प्रिय महाराष्ट्रभूची सेवा करायची आहे. म्हणून त्यांनी आपली नाकामयाबी सांगितली. मध्यंतरी संजय गांधींचे नाव विचाराधीन होते. परंतु संजय गांधींसारख्या राजकारणातल्या (जन्मसिद्ध) सीनियर व्यक्तीने मृणाल गोरेंसारख्या एकातद्दन ज्यूनियर व्यक्तीच्या विरोधात उभे राहावे, (आणि त्या व्यक्तीला सीनियर करावे.) हे अयोग्य, अनुचित, अस्वाभाविक होय, हे सर्वांना पटले. अखेर विद्वान हॅरिस यांचे नाव निश्चित झाले आहे.

विद्वान हॅरिस यांना मी दीर्घायुरारोग्य चिंतितो. ☐

## ☐ प्राणिसंग्रहालयात इंजिनगाडी

'दिल्ली बहोत दूर आहे' या मराठीतल्या एका हिंदी वाक्यप्रयोगात महाराष्ट्राच्या राजकारणाचे सार सांगता येत, ही गोष्ट अनंतरावांशिवाय कोणाच्याही लक्षात आली असेल असे वाटत नाही. महाराष्ट्राचे राजकारण, त्या एका दिल्लीपर्यंत पोचण्यासाठी धडपडत असते; आणि एकदा तेथपर्यंत पोचले की आपण बहोत दूर आलो अशा समजुतीने पाय चेपत समाधानाच्या मिटक्या मारत राहते. असो. दिल्लीची आठवण निघाली म्हणून, सहज जाता जाता, दिल्ली आणि महाराष्ट्र यांच्या परस्परसंबंधाबाबतचे एक जळजळीत विचारमौक्तिक तुमच्यापुढे ठेवले. निवडणुकीच्या मोसमात असा मोक्तिकचारा सारखाच तुमच्यापुढे ठेवला जाईल. त्यातला टाकायचा कुठला, चावायचा कुठला, गिळायचा कुठला, रवंथायचा कुठला ते तुमचे तुम्ही बघा.

आता, दिल्लीची आठवण कशी निघाली ते सांगतो.

दिल्लीला एक प्राणिसंग्रहालय आहे. ('सोलकढी'तल्या बहुतेक वाक्यांना असतो तसा याही वाक्याला एकच अर्थ आहे, हे माझ्या प्रिय वाचकांना सांगायला नकोच.) दिल्लीच्या या प्राणिसंग्रहालयाने देशोदेशींचे चित्रविचित्र पशुपक्षी एकत्र जमा केले आहेत. त्यांना पाहायला लोक येतात. आलेल्या लोकांचा संतोष हेच प्राणिसंग्रहालयाच्या संचालकांचे ध्येय असावे. त्यामुळे लोकांना संतोषवण्यासाठी आणखी आणखी काय काय करता येईल, याचा विचार ते सतत करत असतात. असा विचार करता करता त्यांना सुचले: प्राणिसंग्रहालयाच्या विस्तृत आवारात चक्कर मारवून आणणारी इंजिनगाडी इथे असावी. संचालकांचे विचार सरळ रूळावरून चालणारे होते. त्यांनी या गाडीसाठी आवश्यक ती सगळी कारवाई केली आणि दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयात ही इंजिनगाडी झुकझुक लागली. लोक संतोषले. पशुपक्षी पाहायचे; आणि गाडीतून फेरफटकायचे. म्हणजे स्वयंपाक झकास करणारी आणि वर मुलांना नवे गणित शिकवू शकणारी बायको असावी, तसा डब्बल संतोष !

लोक संतोषले पण पशुपक्षी बेचैन झाले. गाडीच्या धडधडाटाने आणि झुकझुकाटाने ते भयाळून गेले. प्राणिसंग्रहालयातल्या प्राण्यांच्या प्रजननावरसुद्धा त्याचा परिणाम झाला असावा. त्यामुळे गाडी बंद करावी अशी प्राणिमित्रांनी विनंती केली. डब्बल संतोषवाल्यांनी गाडी चालूच ठेवावी, असा आग्रह धरला. थोडेसे तडमधडम झाले. एकदा रूजू झालेली अशी गोष्ट आपल्याकडे सहसा रद्द होत नाही, असा अनुभव असल्यामुळे ती गाडी, उद्या प्राणिसंग्रहालय बंद पडले तरी, चालूच राहील, असा अनेकांचा अंदाज होता. पण तो खरा झाला नाही. गाडी बंद करण्यात आली; आणि आणिबाणी शिथिल झाल्यामुळे आपल्याला जेवढा आनंद झाला नसेल तेवढा गाडी बंद पडल्यामुळे दिल्लीच्या प्राणिसंग्रहालयातल्या पशुपक्ष्यांना झाला, यात काय ते समजा. हत्ती, सिंहपुच्छ माकड, जिराफ, साळिंदर, मगर, काकाकुवा यांचे एक शिष्टमंडळ मला भेटून गेले आणि गाडी बंद झाल्याबद्दल त्यांनी माझ्यापाशी समाधान व्यक्त केले. ही गाडी चालू राहिली असती तर सर्व देशभरच्या प्राणिसंग्रहालयातून गाड्या सुरू झाल्या असत्या. हे भय टळल्यामुळे त्यांना विशेष खुशाल वाटले.

आता त्यांनी इंदिरा गांधींना संपूर्ण पाठिंबा देणारे आणि बाबू जगजीवनरामांच्या देशद्रोही वर्तनाचा तीव्र निषेध करणारे एक संयुक्त पत्रक काढले आहे. हे पत्रक त्यांनी इंदिरा गांधींच्या निवासस्थानी जाऊन समक्ष सादर केले. त्या प्रसंगी केलेल्या भाषणात इंदिरा गांधींनी त्यांना देशाची एकूण परिस्थिती समजावून सांगितली, आणि गायवासराला आपण आणि आपला पक्ष कदापीही विसरणार नाही, असे आश्वासन दिले.

—अनंतराव



लेखांक तिसरा

### जनमतावरील स्थिर सरकारचा पगडा हे काँग्रेसच्या यशाचे प्रमुख कारण मानावे लागेल

# मतपेटीचे शस्त्र

## पक्षबळ कसे बदलले ?

**वा. दा. रानडे**

लोकसभेच्या पाच निवडणुकांत राजकीय पक्षांचे बळ कसे बदलत गेले, त्यांच्या धोरणात, कार्यक्रमात काय फरक झाले आणि देशाच्या लोकशाहीवर त्याचा काय परिणाम झाला, याचा येत्या निवडणुकीच्या संदर्भात विचार आता करावयाचा आहे.

या निवडणुकांचे विश्लेषण करताना प्रथम जाणवणारी गोष्ट म्हणजे केंद्रातील काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी पंचवीस वर्षे अखंड टिकून राहिली. काँग्रेसला ४८ टक्क्यांपेक्षा अधिक मते कधीच मिळाली नाहीत. पण प्रत्येक निवडणुकीत बहुसंख्य जागा तिने मिळविल्या. पहिल्या तीन निवडणुकांत म्हणजे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरूंच्या कारकीर्दीत काँग्रेसला नेहमी ७३ ते ७५ टक्के जागा मिळालेल्या आहेत.

काँग्रेसमध्ये उपपक्षांना बंदी करण्यात आल्याने काँग्रेस समाजवाद्यांनी १९५० साली काँग्रेसबाहेर पडून समाजवादी पक्ष स्थापन केला. गांधीवाद्यांचा एक गट काँग्रेसमधून बाहेर पडला आणि आचार्य कृपलानींच्या नेतृत्वाखाली त्यांनी किसान मजदूर प्रजा पक्ष स्थापन केला. पण १९५२ च्या निवडणुकात या दोन्ही पक्षांचा फार मोठा पराभव झाला. काँग्रेसला प्रभावी पर्यायी पक्ष ते स्थापू शकले नाहीत. पुढे हे दोन्ही पक्ष एकत्र येऊन प्रजासमाजवादी पक्ष स्थापन झाला. पण त्यामुळेही परिस्थितीत फरक पडला नाही. काँग्रेसच्या प्रभुत्वाला हा पक्ष शह देऊ शकला नाही.

### राज्यपातळीवर तडे : १. तामिळनाडू

काँग्रेसचा केंद्रामधील सत्तेचा गड अभेद राहिला तरी राज्यपातळीवर त्याला तडे पडू लागल्याचे १९५२ च्या पहिल्या विधानसभा निवडणुकांनीच दाखवून दिले. मद्रास राज्यात काँग्रेसला हुकमी बहुमत मिळाले नाही तरी राजाजींना केंद्रातून मद्रासला मुद्दाम पाठवून मुख्यमंत्री करण्यात आले. काँग्रेसने एकदा मंत्रिमंडळ बनविल्यावर मग एकेक संधिसाधू अपक्ष सभासद आणि इतर पक्षांतले काही सभासद काँग्रेसला मिळून तिचे स्थिर बहुमत झाले. विरोधी पक्ष संघटित असते, त्यांनी संयुक्त आघाडी केली असती तर काँग्रेस मंत्रिमंडळ बनवू शकली नसती आणि बनविले असते तरी ते फार काळ टिकले नसते. विधानसभेच्या एकूण ३७५ जागांपैकी काँग्रेसने फक्त १५१ म्हणजे ४०·२७ टक्के जागा जिंकल्या होत्या. निर्विवाद बहुमतासाठी तिला १८८ म्हणजे आणखी ३७ जागा मिळविणे आवश्यक होते. पण केवळ ३८ च काय, त्यापेक्षाही अधिक सभासद विरोधी पक्ष आणि अपक्ष सभासदांमधून आपल्या बाजूला वळविण्यात काँग्रेस नेत्यांना यश आले. फोडाफोडीचा खेळ राज्यपातळीवर काँग्रेस याप्रमाणे १९५२ च्या निवडणुकीपासूनच खेळत आलेली आहे. या संधिसाधू पक्षांतराला आळा घालण्यासाठी वास्तविक त्या वेळेपासूनच उपाय योजायला हवे होते. पक्षांतर केलेल्या सभासदांनी आपल्या जागेचा राजीनामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे. हा संकेत त्याचवेळी रद्द करायला हवा होता. पण काँग्रेसला त्यावेळी ते गैरसोयीचे होते. १९५२ च्या निवडणुकांच्या वेळी मद्रास राज्यात आंध्र समाविष्ट होता. त्याचे वेगळे राज्य झाल्यावर बाकीच्या मद्रास राज्यात काँग्रेसचे आसन सुस्थिर असल्याचे १९५७ च्या विधानसभा निवडणुकांनी दाखवून दिले. विधानसभेत त्यावेळी काँग्रेसला २०५ पैकी १५१ म्हणजे ७३·६६ टक्के जागा मिळाल्या. १९६२ च्या निवडणुकांतही काँग्रेसचे आसन स्थिर होते. तिने त्यावेळी २०५ पैकी १३९ जागा मिळविल्या. लोकसभा निवडणुकांच्या दृष्टीनेही परिस्थिती सुधारली. १९५७ आणि १९६२ या दोन्ही निवडणुकांत काँग्रेसने या राज्यात ३१ जागा जिंकल्या.

### १९६७ चा हादरा

काँग्रेसला मद्रासमध्ये म्हणजेच आताच्या तामिळनाडू राज्यात मोठा हादरा १९६७ च्या निवडणुकांनी दिला. विधानसभेत २३४ पैकी फक्त ४९ आणि लोकसभेत ३९ पैकी फक्त ३ जागा काँग्रेसने मिळविल्या. १९७१ मध्ये ही घसरगुंडी कायम राहिली. लोकसभेत आपणास निर्णायक बहुमत मिळेल की नाही, याची त्यावेळी काँग्रेसला चिंता वाटत होती, म्हणून द्रवीड मुन्नेत्र कळघम पक्षाशी युती करून तिने ९ जागा पदरात पाडून घेतल्या. पण त्यासाठी विधानसभेच्या सर्व जागांवर पाणी सोडण्याची जबर किंमत तिला द्यावी लागली. द्र. मु. क. शी झालेल्या करारानुसार विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने भागच घेतला नाही. ही नामुष्कीची अट मान्य करण्यात काँग्रेसची चूक झाली, अशी कबुली नंतर पंतप्रधान श्रीमती गांधींनीही दिलेली आहे. द्र. मु. क. पक्षातील फूट आणि संघटना काँग्रेस पक्षातील फूट यामुळे १९७७ च्या निवडणुकांचे वेळी काँग्रेसची परिस्थिती थोडी सुधारली आहे. पण स्वतःच्या बळावर तर नव्हेच, पण अण्णा द्र. मु. क. व कम्युनिस्ट आणि मुस्लीम लीग यांच्या-

बरोबर आघाडी करूनसुद्धा विधानसभेत निर्णायक बहुमत मिळविण्याची खात्री काँग्रेसला वाटत नाही, म्हणूनच तामिळनाडूमध्ये लोकसभेबरोबर विधानसभेच्या निवडणुका सरकारने घेतल्या नाहीत. लोकसभेतसुद्धा १९७१ च्या ९ जागांपेक्षा अधिक जागा काँग्रेस कितपत मिळवू शकेल, याची शंका आहे. १९७१ च्या निवडणुकीत काँग्रेसला फक्त १२·५१ टक्के मते मिळाली होती. दोन निवडणुकांतील एक फरक लक्षात येण्यासारखा आहे. १९६७ मध्ये काँग्रेसला फक्त ३ जागा व ४१·६९ टक्के मिळाली होती. १९७१ मध्ये काँग्रेसने जागांची संख्या ९ पर्यंत वाढविली. पण मतांचे प्रमाण १२·५१ टक्क्यांपर्यंत घसरले. विरोधी पक्षांची संघटित आघाडी असेल तर काँग्रेसचा पराभव करता येतो, हे १९६७ च्या निवडणुकीने तामिळनाडूत दाखवून दिले. काँग्रेसला १९७१ मध्ये मते कमी मिळण्याचे मुख्य कारण १९६९ मध्ये पक्षात फूट पडल्यानंतर मोठा गट संघटना काँग्रेसला मिळाला. मते कमी असूनही जागा १९६७ पेक्षा अधिक मिळाल्या, याचे कारण काँग्रेस पक्ष द्र. मु. क. च्या आघाडीत सामील झाला.

गेल्या चार वर्षांत काँग्रेसने तामिळनाडूत आपले बळ वाढविण्याचे प्रयत्न केले. दोन्ही काँग्रेसचे तामिळनाडूपुरते तरी एकीकरण व्हावे, हा त्या प्रयत्नाचाच एक भाग होता. पाँडिचरी विधानसभेच्या निवडणुका, पाँडिचरी लोकसभेची पोटनिवडणूक, तसेच त्याच सुमारास तामिळनाडूमध्ये लोकसभेसाठी झालेली एक पोटनिवडणूक दोन्ही काँग्रेस पक्षांनी संयुक्त आघाडी करून लढविली. पंतप्रधान श्रीमती गांधी आणि कामराज यांनी एका व्यासपीठावरून प्रचारभाषणे केली. पण पाँडिचरी विधानसभा निवडणुकीत दोन्ही काँग्रेस पक्षांच्या या संयुक्त आघाडीस बहुमत मिळू शकले नाही. पाँडिचरीत बहुमत मिळाले तर तामिळनाडूमध्येही आगामी निवडणुकांत बहुमत मिळवता येईल आणि या राज्यात काँग्रेसचे गेलेले वजन व प्रतिष्ठा पुनः मिळवता येईल, असा काँग्रेस नेत्यांचा आडाखा होता. आघाडीला पाँडिचरी विधानसभेत बहुमत मिळाले असते तर दोन्ही पक्षांचे एकीकरण लौकर घडून येण्याची शक्यता होती. पण हा उद्देश साध्य न झाल्याने एकीकरणाबद्दलचा काँग्रेस नेत्यांचा उत्साह ओसरला. कामराजांच्या निधनानंतर एकीकरणाचा पुनः एक प्रयत्न झाला. पण संघटना काँग्रेसमध्ये या प्रश्नावर फूट पडली. एक गट काँग्रेसला मिळाला. दुसरा दूरच राहिला. या दोन गटांपैकी कोणता गट अधिक प्रबळ आहे, याची कल्पना येत्या निवडणुकीच्या निकालावरून येईल. तामिळनाडू हा काँग्रेसच्या दृष्टीने अजूनही कच्चा दुवाच आहे.

प्रतिपक्षाचे बळ कमी करणे, हा स्वतःचे बळ वाढविण्याच्या प्रयत्नांचा दुसरा भाग. सत्तारूढ द्र. मु. क. आघाडीतून काँग्रेस व कम्युनिस्ट बाहेर पडले. द्र. मु. क. पक्षात फूट पडून अण्णा द्र. मु. क. हा नवा पक्ष रामचंद्रन यांनी स्थापन केला. द्र. मु. क. आघाडी यामुळे थोडी कमकुवत झाली तरी विधानसभेतील तिच्या बहुमताला त्यामुळे धोका निर्माण झाला नाही. तेव्हा केरळमध्ये पहिल्या नंबूद्रिपाद मंत्रिमंडळाविरुद्ध ज्या प्रकारचे आरोप करण्यात आले होते, त्याचप्रकारचे आरोप करुणानिधी मंत्रिमंडळाविरुद्ध करण्यात आले. राष्ट्रपतींकडे याबाबतीत निवेदने पाठविण्यात आली. आणीबाणी पुकारल्यानंतर तर कोणत्याही राज्यात काँग्रेसला विरोधी सरकारे राहू द्यावयाची नाहीत, असे धोरण अनुसरण्यात आले : विधानसभेच्या निवडणुका अवघ्या काही आठवड्यांवर आल्या असता, तामिळनाडूत राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली आणि मंत्रिमंडळात वरील आरोपांची चौकशी करण्यासाठी सरकारिया कमिशन नेमण्यात आले. वास्तविक निवडणुका जवळ आल्या असता, सरकारच्या कारभाराबद्दल जनतेलाच कौल देण्यास सांगणे योग्य झाले असते किंवा निवडणुका घ्यावयाच्या नव्हत्या तर कमिशन प्रथम नेमून त्याने आपल्या अहवालात मंत्रिमंडळास दोषी ठरविले असते तर राष्ट्रपतींची राजवट आणणे योग्य ठरले असते. द्र. मु. क. सरकार निर्दोष होते, त्याचे काहीच चुकले नाही, असे येथे म्हणावयाचे नाही. पण त्या सरकारविरुद्ध ज्या प्रकारचे आरोप करण्यात आले तशाच प्रकारचे आरोप निरनिराळ्या राज्यांतील काँग्रेस सरकारांविरुद्धही करण्यात आले आहेत; मग त्यांची चौकशी का नको? हरियानाचे माजी मुख्यमंत्री बन्सीलाल यांच्याविरुद्ध आरोपांचे निवेदन राष्ट्रपतींना सादर करण्यात आले होते, पण केंद्रीय मंत्रिमंडळाच्या समितीने त्यांना निर्दोषी ठरविले. आरोपी आणि न्यायाधीश दोन्ही एकाच पक्षाचे, अशा परिस्थितीत ही चौकशी व तिचे निष्कर्ष निःपक्षपाती कसे म्हणता येतील? संशयाला थोडीही जागा राहू नये, यासाठी अशा आरोपांच्या चौकशीस निःपक्षपाती न्यायमंडळच नेमायला हवे. पण हरियानात ते नेमले नाही, तामिळनाडूमध्ये मात्र नेमले. कमिशनपुढील साक्षीपुराव्यांचे सविस्तर वृत्तान्त प्रसिद्ध झाले म्हणजे द्र. मु. क. सरकार जनतेत अप्रिय होईल. दरम्यान राष्ट्रपती–राजवटीत जनहिताचे काही कार्यक्रम धडाक्याने अंमलात आणून लोकमत अनुकूल करून घ्यावयाचे, असा काँग्रेस नेत्यांचा मनसुबा असावा. पण एवढे करूनही लोकमत आपणास पुरेसे अनुकूल झाले आहे, असे काँग्रेसला वाटत नाही. निवडणुकांत आपण बहुमत मिळवू, अशी खात्री नाही. म्हणून तामिळनाडूमध्ये लोकसभेच्या बरोबर विधानसभा निवडणुका न घेता राष्ट्रपतींची राजवट चालू ठेवण्यात आली. द्र. मु. क. सरकार ज्या पद्धतीने अधिकारावरून दूर करण्यात आले, त्याबद्दल जनतेत असंतोष आहे. त्यामुळे काँग्रेसला १९७१ एवढ्या तरी जागा मिळतील की नाही, याबद्दल शंका व्यक्त केली जाते.

## २. केरळ

केरळ हा काँग्रेसचा दुसरा मोठा कच्चा दुवा असल्याचे १९५२ च्या निवडणुकीपासूनच दिसून आले. या पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला त्रावणकोर–कोचीनमध्ये (त्यावेळी केरळ राज्य स्थापन झाले नव्हते.) हुकमी बहुमत मिळाले नाही. पण त्रावणकोर–तामिळनाडू काँग्रेसच्या बारा सभासदांच्या पाठिंब्याने काँग्रेसचे सरकार अधिकारावर आले. दोन वर्षांनी या गटाने काँग्रेसला दिलेला पाठिंबा काढून घेतला तेव्हा काँग्रेस मंत्रिमंडळ गडगडले. १९५४ मध्ये मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या. त्यातही काँग्रेस हुकमी बहुमत मिळवू शकली नाही. पण कम्युनिस्टांच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून काँग्रेसने प्रजासमाजवाद्यांशी युती केली. त्या पक्षाचे नेते पट्टम थाणू पिले यांना मुख्यमंत्रिपद देऊ केले व त्यांच्या नेतृत्वाखाली या दोन पक्षांचे संयुक्त मंत्रिमंडळ तेथे अधिकारावर आले. पण हा

प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही आणि जनतेलाही पसंत पडला नाही, हे १९५७ च्या विधानसभा निवडणुकात कम्युनिस्टांना बहुमताने निवडून देऊन व त्यांच्या हाती सत्ता सोपवून मतदारांनी दाखवून दिले. राज्यपातळीवरील काँग्रेसच्या सत्तेच्या मक्तेदारीस पहिला सुरुंग केरळने लावला.

कम्युनिस्टांना सत्तेवरून दूर कसे करावयाचे ? मंत्रिमंडळ पाडण्यासाठी फोडाफोडीचा डाव खेळला जातो. आमिषे दाखवून सभासद फोडले जातात. कम्युनिस्टपुरस्कृत पाच अपक्ष सभासदांना फोडण्याचे प्रयत्न झाले, पण त्यात यश आले नाही. कम्युनिस्ट पक्षापैकी किंवा त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाच अपक्ष सभासदांपैकी एकही फुटला नाही. मग दुसरे तंत्र अवलंबण्यात आले. कम्युनिस्ट मंत्रिमंडळ सत्तेचा वापर जनहितासाठी न करता पक्षाच्या हितासाठी करीत आहे, कामगार संप करतात, हिंसाचार करतात, शेतमजूर बेकायदा जमिनी बळकावतात, त्यांच्या विरुद्ध पोलीस काही कारवाई करीत नाहीत, सरकारनेच त्यांना तसे आदेश दिले आहेत, त्यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही, अशा आरोपांची निवेदने राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आली. एवढ्यावरच न थांबता काँग्रेस, प्रजासमाजवादी पक्ष आणि मुस्लीम लीग यांनी संयुक्त आघाडी करून या प्रश्नावर जनआंदोलन उभारले. पंतप्रधान श्रीमती गांधी त्यावेळी काँग्रेसच्या अध्यक्ष होत्या आणि त्यांच्या पुढाकारानेच हे आंदोलन उभारण्यात आले होते. निवडणुकीत रीतसर बहुमत मिळवून प्रस्थापित झालेल्या सरकारला त्याचे बहुमत कायम असेल तर विधानसभेची मुदत संपेपर्यंत कारभार करण्याचा अधिकार आहे. आंदोलनाच्या मार्गाने त्याला अधिकारावरून दूर करणे हा अनिष्ट पायंडा असून लोकशाही मूल्यांची ती पायमल्ली आहे, असा इशारा सी. डी देशमुख, न. वि. गाडगीळ वगैरे नेत्यांनी त्यावेळी दिला होता. पण काँग्रेसने तो मानला नाही. कारण हा सल्ला काँग्रेसला सोयीचा नव्हता. लोकशाही मूल्यांपेक्षा सत्तेचे मूल्यच काँग्रेस अधिक महत्त्वाचे मानते, हे यावेळी दिसून आले. पुढे गुजराथ व बिहारमध्ये तेथील सरकारविरुद्ध जनआंदोलने उभी राहिली तेव्हा मात्र अशी आंदोलने लोकशाहीविरोधी असल्याची आठवण काँग्रेस नेत्यांना झाली.

## मुस्लीम लीगशी युती

केरळमध्ये १९६० मध्ये विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका झाल्या. त्यात काँग्रेस, प्रजासमाजवादी आणि मुस्लीम लीग यांच्या संयुक्त आघाडीने बहुसंख्य जागा मिळविल्या आणि केरळमध्ये आघाडीचे सरकार अधिकारावर आले. पण काँग्रेस एकट्याच्या बळावर निर्णायक बहुमत मिळवू शकली नाही. मुस्लीम लीगसारख्या जातीयवादी पक्षाशी आघाडी करून काँग्रेस व प्रजासमाजवाद्यांनी लीगचे वजन वाढविण्यास आणि मुस्लीम जातीयवाद पोसण्यास मदतच केली. केरळची मुस्लीम लीग इतर ठिकाणच्या लीगपेक्षा निराळी आहे, जातीय नाही, असे लीगशी आघाडीचे समर्थन काँग्रेस–नेत्यांनी केले. अजूनही केले जाते. पण लीगचा जाहीरनामा पाहण्याचीसुद्धा दक्षता काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांनी घेतली नाही. या जाहीरनाम्यात मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघाचा पुरस्कार केला होता. केरळ लीगच्या जातीयवादाचा आणखी कोणता पुरावा काँग्रेस नेत्यांना हवा होता ? सत्ता मिळविण्यासाठी केलेली ही तत्त्वशून्य युती होती हे १९६० च्या निवडणुकीनंतर काही महिन्यातच स्पष्ट झाले. निवडणुका लढविताना काँग्रेसने लीगची मदत घेतली, पण निवडणुकीनंतर मंत्रिमंडळात मात्र लीगला प्रतिनिधित्व दिले नाही. कारण लीगच्या पाठिंब्याची गरज सरलेली होती. लीगच्या पाठिंब्याशिवाय काँग्रेस आणि प्रजासमाजवादी यांना विधानसभेत निर्णायक बहुमत होते. काँग्रेसच्या या धोरणाच्या निषेधार्थ लीग आघाडीतून बाहेर पडली. काही महिन्यांनी प्रजासमाजवादी पक्षही बाहेर पडला. काँग्रेसला निर्णायक बहुमत नव्हतेच. सर्व विरोधी पक्ष एकत्र आल्यावर आणि काँग्रेसमधून बाकी गट फुटल्यावर सरकारचा पराभव झाला आणि केरळमध्ये पुन्हा राष्ट्रपतींची राजवट आली.

निवडणुका जिंकण्याच्या राजकारणापुढे तत्त्वनिष्ठेचा बळी पडला. जातीयवादी मुस्लीम लीगशी आघाडी १९५७ च्या निवडणुकात प्रथम प्रजासमाजवादी पक्षाने केली. त्यावेळी त्या पक्षावर काँग्रेस आणि डाव्या गटांनी टीकेची केवढी झोड उठविली. पण १९६० च्या निवडणुकीत कम्युनिस्टांचा पाडाव करण्यासाठी काँग्रेसनेही लीगला जवळ केले. लीगचा कम्युनिस्टविरोध संधिसाधूपणाचा होता, हे पुढच्या दोन निवडणुकांत दिसून आले. या निवडणुकात लीग कम्युनिस्टांच्या आघाडीत सामील झाली. जातीयवादी मुस्लीम लीगशी आम्ही सहकार्य करणार नाही, या तात्त्विक भूमिकेवर उजव्या कम्युनिस्टांनी १९६५ च्या निवडणुकीत लीगशी सहकार्य करण्याचे नाकारले. पण १९६७ च्या निवडणुकीत त्यांचा हा तात्त्विक विरोध मावळला. त्यानंतर १९७० मध्ये व आता १९७७ च्या निवडणुकांत काँग्रेस व कम्युनिस्टांनी लीगशी आघाडी चालू ठेवली आहे.

केरळमधील १९५७ पासूनच्या पाच निवडणुकांत मुस्लीम लीगला पुढील प्रमाणे जागा मिळाल्या.

**केरळ विधानसभा निवडणुका**

| वर्ष | मुस्लीम लीगच्या जागा |
|---|---|
| १९५७ | ८ |
| १९६० | ११ |
| १९६५ | ११ |
| १९६७ | १५ |
| १९७० | १२ |

१९६७ च्या तुलनेने लीगला १९७० मध्ये तीन जागा कमी मिळाल्या असल्या तरी केरळच्या राजकारणात त्या पक्षाला निर्णायक महत्त्व आलेले आहे. कारण लीगचा पाठिंबा ज्या बाजूला त्या बाजूचे सरकार बनते. केरळमध्ये मुस्लीम लीगच्या रूपाने मुस्लीम जातीयवाद पोसण्यास याप्रमाणे उजव्या व डाव्या दोन्ही बाजूंच्या पक्षांनी हातभार लावला आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात मुस्लीम लीगचे मुस्लीम समाजात फारसे वजन नसताही महात्मा गांधी व पंडित नेहरूंनी जिनांशी तडजोडीचे धोरण स्वीकारून लीगला व तिच्या जातीय राजकारणाला नसलेली प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. लीगशी युती

करणारे पक्ष तीच चूक करीत आहेत.

काँग्रेसचे बळ वाढण्याऐवजी घटतच गेले. १९६५ मध्ये झालेल्या विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुकात तिला बहुमत तर मिळाले नाहीच, पण पहिल्या क्रमांकाचा पक्ष हे आपले स्थानही तिने गमावले मार्क्सवाद्यांनी ते स्थान मिळविले. मार्क्सवाद्यांचे अनेक कार्यकर्ते तुरुंगात होते. तुरुंगातून त्यांनी निवडणूक लढविली होती. पण निवडणुकीत विजय मिळविलेल्या स्थानबद्धांची मुक्तता करण्याचे त्यावेळचे गृहमंत्री नंदा यांनी नाकारले. मार्क्सवादी पक्षाला निर्णायक बहुमत मिळालें नव्हते हे खरे, पण इतर पक्ष आणि काही अपक्ष आमदार यांच्या पाठिंब्याने सरकार बनवू शकला असता. सर्वांत मोठा पक्ष या नात्याने त्याला तशी संधी द्यायला हवी होती. थोडी चाकोरीबाहेरची पद्धत अवलंबून मुख्यमंत्री निवडण्याचा निर्णय विधानसभेवरच सोपविता आला असता. पण नवे पायंडे पाडण्याची केंद्र सरकारची तयारी नव्हती. निवडणुका झाल्या, आमदार निवडून आले, पण नव्या विधानसभेची एक दिवसही बैठक न भरता तिचे विसर्जन करण्यात आले आणि केरळमध्ये पुनः राष्ट्रपतींची राजवट जारी करण्यात आली.

काँग्रेसची घसरगुंडी वाढतच गेली आणि १९६७ च्या विधानसभा निवडणुकात त्या पक्षाने १३३ पैकी अवघ्या ९ जागा मिळविल्या. १९५१ पासूनच्या निवडणुकात काँग्रेसने मिळविलेल्या जागांचे तुलनात्मक आकडे पाहिले म्हणजे ही घसरगुंडी अधिकच डोळ्यात भरते.

केरळ विधानसभा निवडणुका

| वर्ष | एकूण जागा | काँग्रेस | शेकडा जागा |
|---|---|---|---|
| १९५१ | १०८ | ४४ | ४०·७४ |
| १९५४ | ११७ | ४५ | ३८·४६ |
| १९५७ | १२६ | ४३ | ३४·१३ |
| १९६० | १२६ | ६० | ४७·६२ |
| १९६५ | १३३ | ३६ | २७·०० |
| १९६७ | १३३ | ९ | ६·७७ |

पण या दणदणीत पराभवाची वस्तुनिष्ठ छाननी करण्याची काँग्रेस नेत्यांची तयारी नव्हती; निकालांबद्दल आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना पंतप्रधान श्रीमती गांधी म्हणाल्या, "केरळमध्ये काँग्रेसचा धुव्वा उडाला हे मला मान्य नाही. काँग्रेसला दुसऱ्या कोणत्याही राजकीय पक्षापेक्षा जास्त टक्के मते मिळाली असून १९६५ पेक्षा ती जास्त आहेत." (१९६५ मध्ये काँग्रेसला ३३·०३ टक्के मते मिळाली होती. १९६७ मध्ये ३५·४३ टक्के मिळाली. म्हणजे फक्त दोन टक्क्यांनी वाढ झाली.) मतांची थोडी टक्केवारी वाढली. पण काँग्रेसला अवघ्या ९ जागा मिळाल्या असता तो काँग्रेसचा धुव्वा नाही, असे कसे म्हणता येईल ?

केरळमध्ये डाव्यांच्या संयुक्त आघाडीचे सरकार अधिकारावर आले. पण पुढे दोन्ही कम्युनिस्ट पक्षातील भांडणे वाढून आघाडी फुटली आणि अल्पमतात आली. त्यामुळे केरळमध्ये पुनः एकदा राष्ट्रपतींची राजवट आली. १९७० साली तेथे विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षास किंवा आघाडीस निर्णायक बहुमत मिळाले नाही. पण उजव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडीस काँग्रेसने पाठिंबा दिला व त्यांचे सरकार अधिकारावर आले. या निवडणुकीत काँग्रेसने ३२ जागा मिळविल्या. १९६७ पेक्षा काँग्रेसचे बळ वाढले असले तरीही १९६५ पेक्षा या जागा कमीच होत्या. काँग्रेसला यावेळी १९·७ टक्के मते मिळाली म्हणजे मतांच्या दृष्टीने सर्वांत कमी मते यावेळी मिळाली. कम्युनिस्टांच्या आघाडीशी निवडणूक समझोता केल्यानेच काँग्रेसला १९६७ पेक्षा अधिक जागा मिळू शकल्या.

यावेळी लोकसभेबरोबर केरळ विधानसभेच्याही निवडणुका व्हावयाच्या आहेत. कम्युनिस्ट–काँग्रेस आघाडीचे सरकार सहा वर्षे अधिकारावर राहिले. यापूर्वी एकही सरकार विधानसभेची पाच वर्षांची मुदत संपेपर्यंत अधिकारावर राहिले नव्हते. केरळला स्थिर सरकार दिले; हे सत्तारूढ आघाडीचे सर्वांत मोठे कार्य असे सांगण्यात येते.

## केरळ काँग्रेसशी संधान

काँग्रेस–कम्युनिस्ट आघाडीने केरळला स्थिरता दिली हे खरे, पण येत्या निवडणुकांत आपण निर्णायक बहुमत मिळवू अशी खात्री आघाडीच्या नेत्यांना वाटत नाही. या आघाडीत काँग्रेस आणि कम्युनिस्ट यांच्याशिवाय क्रांतिकारी समाजवादी पक्ष, प्रजासमाजवादी, मुस्लीम लीग हे पक्ष आहेत पण मुस्लीम लीगमध्ये फूट पडली. क्रांतिकारी समाजवादी पक्षाने आघाडीतून बाहेर पडावे, असा आदेश त्यांच्या अखिल भारतीय पक्षाने दिला. पण राज्य शाखेने तो मानला नाही. तरी या प्रश्नावर त्या पक्षातही फूट पडण्याचा संभव होता. अशा स्थितीत आगामी निवडणुकीत हुकमी बहुमत मिळविण्याच्या दृष्टीने आपली बाजू बळकट करण्याकरता आणखी कोणत्या गटाचा पाठिंबा मिळविता येईल, या दृष्टीने काँग्रेसने त्यांचे प्रयत्न सुरू झाले. केरळ काँग्रेसला आघाडीत सामील करून घेण्यात आले. केरळ काँग्रेस हा काँग्रेसमधल्याच बंडखोरांचा गट. या गटाने बंडखोरी केल्यामुळेच १९६० च्या निवडणुकीनंतर स्थापन झालेले काँग्रेस मंत्रिमंडळ गडगडले. काँग्रेसच्या हाती सत्ता नाही आली तरी चालेल, पण या बंडखोरांशी मिळते घ्यावयाचे नाही, अशी खंबीर भूमिका या बंडखोरांबाबत त्यावेळचे काँग्रेसचे अध्यक्ष कामराज यांनी घेतली होती. १९६५ च्या विधानसभा निवडणुकीत केरळ काँग्रेसला २३ जागा मिळाल्या होत्या. १९६७ मध्ये मात्र फक्त ५ जागा मिळाल्या व १९७० च्या निवडणुकीत १३ मिळाल्या. या बंडखोर गटाला जवळ करण्याचे इंदिरा गांधींनी ठरविले. त्याला सत्तारूढ आघाडीत सामील करून मंत्रिपद देण्यात आले. शिस्तीपेक्षा सत्ता टिकविणे महत्त्वाचे असल्याने काँग्रेसने संधिसाधूंशी सोयरीक केली. काँग्रेसला असे समझोते करावे लागतात, याचाच अर्थ केरळमध्ये तिचे वजन वाढलेले नाही.

केरळमधील यंदाच्या विधानसभा निवडणुकांत मार्क्सवादी आघाडीला बहुमत मिळण्याची कितपत शक्यता आहे ? दोन्ही कम्युनिस्ट

पक्षांनी पुन: एकत्र यावे, असा मार्क्सवाद्यांचा प्रयत्न होता. पण उजव्या कम्युनिस्ट पक्षाने काँग्रेसबरोबरची आघाडी चालू ठेवण्याचे ठरविल्याने त्यांच्याशी सहकार्याचा प्रश्नच राहिला नाही. दोन्ही कम्युनिस्ट पक्ष एकत्र असले तर केरळमध्ये ते केवढे यश मिळवू शकतात, हे १९६७ च्या निवडणुकांनी दाखवून दिले होते. त्यांच्या सात पक्षांच्या संयुक्त आघाडीने एकूण १३३ जागांपैकी ११७ जिंकल्या होत्या. ही आघाडी दुभंगली. उजव्या कम्युनिस्टांनी काँग्रेसला जवळ केले आणि काँग्रेसला सत्तेवर येण्याची संधी मिळाली.

मार्क्सवादी कम्युनिस्टांच्या दृष्टीने काही गोष्टी अनुकूल आहेत. मुस्लीम लीग आणि केरळ काँग्रेसमध्ये फूट पडली असून, दोन्ही पक्षांतील एकेक गट मार्क्सवाद्यांशी सहकार्यास तयार आहे. दुसरी अनुकूल गोष्ट काँग्रेसमधून फुटून जगजीवनराम यांनी काढलेल्या लोकशाहीवादी काँग्रेस या पक्षाचे कम्युनिस्टांनी स्वागत केलेले असून त्यांच्या मागण्यांना पाठिंबा दर्शविला आहे. एकीकडे जगजीवनराव-बाबूंच्या पक्षाचे कधी स्वागत करता आणि दुसरीकडे केरळमध्ये सत्तारूढ काँग्रेसशी सहकार्य करता या विसंगतीचे स्पष्टीकरण सामान्य मतदारांपुढे करणे कम्युनिटांना जड जाईल. कम्युनिस्टांच्या या दुटप्पी धोरणाचा वीट येऊन मतदार मार्क्सवाद्यांकडे झुकण्याची शक्यता आहे. तेव्हा केरळ विधानसभेत आपले निर्णायक बहुमत टिकविणे काँग्रेस–कम्युनिस्ट आघाडीस वाटते तितके सोपे नाही.

केरळ विधानसभा निकालावरून दिसणाऱ्या चित्रापेक्षा तेथील लोकसभा निवडणुकांचे चित्र फारसे निराळे नाही.

केरळ लोकसभा निवडणुका

| वर्ष | एकूण जागा | काँग्रेस | शे. मत |
|---|---|---|---|
| १९५१ | १२ | ६ | ३५·१ |
| १९५७ | १८ | ६ | ३७·८७ |
| १९६२ | १८ | ६ | ३४·२८ |
| १९६७ | १९ | १ | ३६·१५ |
| १९७१ | १९ | ६ | १९·७५ |

यावरून केरळमध्ये लोकसभेच्या एकूण जागांपैकी निम्म्या जागा काँग्रेसने फक्त १९५१ च्या निवडणुकीत मिळविल्या. १९६७ मध्ये तर काँग्रेसला एकूण १९ जागांपैकी फक्त एक जागा मिळाली. बाकीच्या निवडणुकांत एक तृतीयांशापेक्षा अधिक जागा काँग्रेसने कधीच मिळविल्या नाहीत. यावेळी लोकसभेच्या एकूण जागा वीस आहेत. काँग्रेसला एक दोन जागा कमी–जास्त मिळण्यापलीकडे काँग्रेसच्या बळात १९७१ पेक्षा फारसा फरक होण्याची शक्यता नाही. आणीबाणी रद्द करणे आणि नागरी स्वातंत्र्य प्रस्थापित करणे या एकाच मुद्द्यावर सर्व विरोधी पक्षांना एकत्र आणण्याचा नंबुद्रिपाद यांचा प्रयत्न आहे. मतदारांना हा प्रश्न किती महत्त्वाचा वाटतो आणि त्यांना तो पटविण्यात विरोधी पक्षांना किती यश येते, यावर निवडणुकीतील त्यांचे यश अवलंबून आहे.

## ३. ओरिसा

ओरिसा हा काँग्रेसचा तिसरा कच्चा दुवा. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीपासूनच तेथे काँग्रेसचे आसन डळमळीत होते. या पहिल्या निवडणुकीत काँग्रेसला १४० पैकी ६७ म्हणजे बहुमता-पेक्षा तीन जागा कमीच मिळाल्या. पण काही अपक्ष सभासदांच्या पाठिंब्याने काँग्रेसने सरकार बनविले. १९५७ च्या निवडणुकीत काँग्रेसला ५६ म्हणजे १९५२ पेक्षा ११ जागा कमी मिळाल्या. गणतंत्र परिषदेला काँग्रेसच्या खालोखाल ५१ जागा मिळाल्या. काही अपक्ष सभासदांचा पाठिंबा घेऊनसुद्धा यावेळी काँग्रेस पक्षाला सरकार बनविणे शक्य नव्हते. तेव्हा गणतंत्र परिषदेचे सहकार्य घेऊन काँग्रेसने संमिश्र मंत्रिमंडळ बनविले. संमिश्र सरकारच्या काळात काँग्रेसने गणतंत्र परिषदेचे सभासद फोडून आपले बळ वाढविले आणि तिच्या सहकार्याची आता गरज नाही, असे दिसताच संमिश्र सरकार मोडले.

सत्तासंपादनासाठी आपल्या तात्त्विक भूमिकेचा बळी देण्याची काँग्रेस पक्षाची वृत्ती ओरिसातील या संमिश्र मंत्रिमंडळाच्या प्रयोगात दिसून आली. पहिला प्रश्न म्हणजे समाजवादी धोरणाच्या काँग्रेसने समाजवादी विचाराच्या पक्षांचे सहकार्य घेऊन मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न का केला नाही? पक्षबल लक्षात घेता ते अशक्य होते, असे म्हणता येणार नाही? काँग्रेसचे धोरण त्या वेळी कम्युनिस्टविरोधी असल्याने कम्युनिस्टांशी सहकार्य शक्यच नव्हते. संयुक्त समाजवादी पक्षाचे धोरण कट्टर काँग्रेसविरोधी असल्याने त्यांच्याशी सहकार्य शक्य नव्हते. प्रजासमाजवादी पक्षास ११ जागा मिळाल्या होत्या. आणखी काही अपक्ष सभासदांचा पाठिंबा मिळवून काँग्रेसला संमिश्र मंत्रिमंडळ बनविता आले असते. पण प्रजासमाजवाद्यांपेक्षा गणतंत्र परिषद काँग्रेसला अधिक जवळची वाटली. वास्तविक केरळमध्ये काँग्रेस नेत्यांनी प्रजासमाजवाद्यांशी आघाडी केली होती तर ओरिसात तसेच धोरण त्यांनी स्वीकारायला हरकत काय होती? काँग्रेसने तसे केले नाही, याचे कारण संमिश्र मंत्रिमंडळ तिला थोड्या काळा-पुरतेच हवे होते. या काळात दुसऱ्या पक्षाचे सभासद फोडून आपल्या पक्षात घ्यावयाचे व पुढे केवळ आपल्या पक्षाचेच मंत्रिमंडळ बनवा-वयाचे, असा उद्देश त्यामागे होता. त्या दृष्टीने गणतंत्र परिषद हा पक्ष पोखरायला सोपा होता. प्रजासमाजवादी पक्ष त्या वेळी तरी अधिक शिस्तबद्ध होता व तो फोडणे सोपे नव्हते.

गणतंत्र परिषदेस पोखरल्याचा फायदा काँग्रेसला १९६१ च्या निवडणुकीत मिळाला. विधानसभेच्या सहा निवडणुकांत काँग्रेसला सर्वांत मोठे यश १९६१ मध्ये मिळाले. एकूण १४० जागांपैकी ८२ जागा तिने जिंकल्या. निवडणूक मोहिमेची सूत्रे बिजू पटनाईक यांच्याकडे होती. काँग्रेसला त्या वेळी प्रचंड बहुमत मिळवून दिल्या-बद्दल संघटना कुशल नेता म्हणून त्यांचा गौरव झाला. त्यांच्या संघटना कौशल्याप्रमाणेच निवडणूक मोहिमेवर काँग्रेसने केलेल्या प्रचंड खर्चाने तिला हे यश मिळाले, हे विसरून चालणार नाही. निवडणूक निकालाचे विश्लेषण करताना त्या वेळी लिहिलेल्या एका लेखात श्री. अशोक मेहता म्हणतात, "'काँग्रेसने निवडणुकीवर चाळीस लाख रुपये खर्च केला, म्हणजे प्रत्येक मतदारसंघामागे सरा-सरी तीस हजार रुपये एवढे प्रमाण पडले.' विरोधी पक्षांजवळ एवढा पैसा नव्हता. प्रजासमाजवादी पक्ष एका मतदारसंघामागे चार हजार रुपयेसुद्धा खर्च करू शकला नाही. (स्टेटस्मन, १४ जून १९६१) आता तर काँग्रेसचा निवडणूक खर्च किती तरी अधिक प्रमाणात वाढला आहे.

१९६७ च्या निवडणूक मोहिमेची सूत्रेही पटनाईक यांच्याकडेच होती. निवडणुकीवर यावेळीही कॉंग्रेसने काही कमी खर्च केला नाही. पण केवळ पैशाच्या जोरावर निवडणुका जिंकता येत नाहीत, हे १९६७ च्या निवडणुकीने दाखवून दिले. पटनाईक आणि त्यांच्या-मागून मुख्यमंत्री झालेले श्री. बिरेन मित्र यांच्या एकेक प्रकरणांनी कॉंग्रेस राजवट अत्यंत अप्रिय झाली होती. पक्षात गटबाजी होतीच. शिवाय हरेकृष्ण मेहताब यांच्या नेतृत्वाखाली एक मोठा गट फुटून त्याने जनकॉंग्रेस या नवीन पक्षाची स्थापना केली होती. कॉंग्रेसच्या अपयशाला ही कारणे आहेत. पण या कारणांच्या जोडीला स्वतंत्र पक्ष आणि जनकॉंग्रेस यांची युती झाल्यामुळेच कॉंग्रेसचा एवढा दणदणीत पराभव झाला. तिला १४० पैकी अवघ्या ३० जागा मिळाल्या.

त्यानंतर १९७१ व १९७४ च्या विधानसभा निवडणुकांत कॉंग्रेसने आपले बळ वाढविले असले तरी निर्णायक बहुमत मिळवून दुसऱ्या कोणाच्या मदतीशिवाय सरकार स्थापण्याइतके ते वाढलेले नाही. १९७१ मध्ये कॉंग्रेसने ५१ जागा मिळविल्या. अधिक जागा मिळविण्यासाठी फोडाफोडीचे तंत्र अवलंबिले. १९६७ च्या निवडणुकीनंतर ओरिसात जनकॉंग्रेस आणि स्वतंत्र पक्ष यांचे संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन झाले होते. त्यातून १९७१ च्या निवडणुकांपूर्वीच जनकॉंग्रेसच्या मेहताब गटास कॉंग्रेसने फोडले. या गटाचा पाठिंबा मिळाल्यानेच १९७१ च्या निवडणुकीत कॉंग्रेसचे बळ ३० वरून ५१ पर्यंत वाढले, पण तिच्या हाती सत्ता आली नाही. स्वतंत्र पक्ष आणि उत्कल कॉंग्रेस यांनी संयुक्त मंत्रिमंडळ स्थापन केले, तेव्हा सत्ता मिळविण्यासाठी सत्तारूढ आघाडीतून उत्कल कॉंग्रेसला फोडण्याच्या हालचाली कॉंग्रेसने सुरू केल्या. उत्कल कॉंग्रेसने पाठिंबा काढून घेताच सरकार गडगडले. श्री. बिजू पटनाईक यांनी उत्कल कॉंग्रेसचे विसर्जन करून कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यानंतर श्रीमती नंदिनी सत्पथी यांनी कॉंग्रेस मंत्रिमंडळ बनविले. श्रीमती सत्पथी यांना मुख्यमंत्रिपद स्वीकारण्यासाठी केंद्रातून ओरिसात पाठविण्यात आले. पंतप्रधानांच्या संमतीचीच ही निवड होती. उत्कल कॉंग्रेस कॉंग्रेसला मिळाली खरी; पण आपल्या गटाच्या लोकांना मंत्रिपदे आणि अधिकारपदे देण्याबाबत कॉंग्रेस नेत्यांनी दिलेली आश्वासने पाळली नाहीत, म्हणून पाच महिन्यांतच बिजू पटनाईक यांनी सत्पथी सरकारचा पाठिंबा काढून घेतला आणि कॉंग्रेसबाहेर पडून उत्कल कॉंग्रेसची पुन: स्थापना केली. सत्पथी मंत्रिमंडळ गडगडले. ओरिसात राष्ट्रपतींची राजवट आली. दरम्यान मेहताब यांचा गटही कॉंग्रेस-मधून पुन: बाहेर पडला.

१९७४ च्या निवडणुकात कॉंग्रेसने आपले बळ ६९ पर्यंत वाढविले. तिला हुकमी बहुमत मिळाले नाही, पण अखेर कम्युनिस्टांच्या पाठिंब्याने सत्पथींच्याच नेतृत्वाखाली कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आले. या निवडणुकीत कॉंग्रेसचे बळ ६९ पर्यंत वाढण्याचे कारण कॉंग्रेसने कम्युनिस्टांशी युती केली होती आणि प्रजासमाजवादी पक्षाचे विसर्जन होऊन, तो कॉंग्रेसमध्ये सामील झाला होता. तरीही कॉंग्रेस हुकमी बहुमत मिळवू शकली नाही, याचे कारण बहुसंख्य लोकमत कॉंग्रेसविरोधीच होते.

या निवडणुकीत बिजू पटनाईक यांनी उत्कल कॉंग्रेस, स्वतंत्र पक्ष आणि मेहताब यांचा गट यांना एकत्र आणून कॉंग्रेसला संघटित आव्हान देण्यासाठी प्रगती पक्ष स्थापन केला होता. पण हुकमी बहुमत तर नाहीच, पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळविण्याइतकीसुद्धा प्रगती हा प्रगती पक्ष करू शकला नाही. कारण नाव प्रगती असले तरी त्याची रचना, कार्यक्रम यातून हा पक्ष कॉंग्रेसपेक्षा पुरोगामी असल्याची प्रतिमा ठसली नाही. एक तर संस्थानिक व जमीनदारांचा भरणा असलेला स्वतंत्र पक्ष हा या पक्षाचा महत्त्वाचा घटक. जमीन सुधारणांना त्याने विरोध दर्शविला होता व आम्ही हे कायदे बदलून टाकू, असे आश्वासन पक्षाच्या जाहीरनाम्यात दिले होते. जमीन सुधारणांना केलेल्या या विरोधामुळे हा पक्ष आदिवासी, हरिजन आणि भूमिहीन शेतमजुरांचा पाठिंबा गमावून बसला. ध्येयनिष्ठ नव्हे तर सत्तेसाठी सोयीप्रमाणे पक्ष बदलणारे नेते अशी या पक्षाच्या प्रमुख नेत्यांबद्दल जनमानसात प्रतिमा निर्माण झाली होती. कॉंग्रेस पक्षातील फुटीनंतर सत्तारूढ कॉंग्रेस किंवा संघटना कॉंग्रेस यांपैकी कोणत्याच पक्षास न मिळता उत्कल कॉंग्रेस या नावाने स्वत:चा सवतासुभा बिजू पटनाईक यांनी काढला होता. त्यामागे ठाम तात्त्विक भूमिका नव्हती, तर काही काळ वाट पाहून जिकडे फायदा तिकडे मिळू या, असा सरळ संधिसाधू हिशेब होता. १९७१ च्या निवडणुकांनंतर त्यांनी प्रथम स्वतंत्र पक्षाशी आघाडी केली. दोन्ही पक्षांचे सरकार अधिकारावर आले, पण काही महिन्यांतच आघाडी मोडून आणि उत्कल कॉंग्रेसचे विसर्जन करून ते कॉंग्रेसला मिळाले. कॉंग्रेसप्रवेशाने मनासारखे काही मिळाले नाही तेव्हा त्यांनी कॉंग्रेसमधून बाहेर पडून पुन्हा उत्कल कॉंग्रेसचे पुनरुज्जीवन केले. दुसरे नेते हरेकृष्ण मेहताब यांनी १९६७ च्या निवडणुकांचे वेळी कॉंग्रेसमधून बाहेर पडून जनकॉंग्रेस पक्ष काढला. १९७१ च्या निवडणुकांच्या वेळी त्यांनी पुन: कॉंग्रेसप्रवेश केला. १९७४ च्या निवडणुकांचे वेळी ते कॉंग्रेस सोडून प्रगती पक्षात सामील झाले आणि आता १९७७ च्या निवडणुकांचे वेळी ते पुन्हा कॉंग्रेसला पाठिंबा देत आहेत. पक्ष बदलणाऱ्या अशा नेत्यांबद्दल जनतेने विश्वास बाळगायचा कसा? प्रगती पक्षाच्या अपयशाचे तेही एक महत्त्वाचे कारण होते.

येत्या निवडणुकांच्या वेळी प्रगती पक्ष जनता पक्षात विलीन झाला आहे. बिजू पटनाईक जनता पक्षाशी तरी एकनिष्ठ राहणार आहेत का? असा त्यांचा पूर्वेतिहास पाहता जनतेच्या मनात शंका आली तर ती चुकीची म्हणता येणार नाही. विरोधी पक्ष प्रभावी व्हायचा असेल तर त्याचे नेतृत्वही निष्ठावंत असायला हवे.

ओरिसातील लोकसभा निवडणुकांत विधानसभा निवडणुकांपेक्षा निराळे चित्र दिसते का, हे आता पाहावयाचे. पाच लोकसभा निवडणुकांचा तुलनात्मक विचार केला तर असे दिसते की, कॉंग्रेसच्या यशाचा आलेख स्थिर, चढता किंवा उतरता न राहता वर-खाली होत गेलेला आहे. पाच निवडणुकांत कॉंग्रेसला पुढीलप्रमाणे जागा मिळाल्या.

**लोकसभा निवडणुका : ओरिसा**
**कॉंग्रेसला मिळालेल्या जागा**

| वर्ष | एकूण जागा | कॉंग्रेस |
|---|---|---|
| १९५२ | २० | ११ |
| १९५७ | २० | ७ |
| १९६२ | २० | १४ |
| १९६७ | २० | ६ |
| १९७१ | २० | १५ |

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांतील मतांचा कल सारखाच आहे असे म्हणता येणार नाही. १९५२ मध्ये कॉंग्रेसला विधानसभेत निम्म्यापेक्षा कमी जागा मिळाल्या. १९५७ मध्ये याच दोन्ही ठिकाणी कॉंग्रेसच्या जागांत घट झाली. (१९५७ साली ओरिसात विधानसभेच्या निवडणुका झाल्या नव्हत्या. येथे तुलनेसाठी १९५५ च्या विधानसभा निवडणुका विचारात घेतल्या आहेत. १९६२ मध्येही विधानसभेच्या निवडणुका नव्हत्या. पण ओरिसातील १९६१ च्या विधानसभा निवडणुका आणि लोकसभेच्या १९६२ च्या

निवडणुका यांची तुलना करता दोन्ही ठिकाणी काँग्रेसने चांगले यश मिळविले. त्यानंतर १९६७ मध्ये दोन्ही ठिकाणी काँग्रेसला कमी जागा मिळाल्या तर १९७१ मध्ये विधानसभेत ३६ टक्के पण लोकसभेत ७५ टक्के जागा मिळाल्या.

यावेळच्या निवडणुकांत मतदारांचा कल काय राहील? माजी मुख्यमंत्री नंदिनी सत्पथी यांचा गट काँग्रेसमधून फुटून जगजीवन-बाबूंच्या नव्या पक्षास मिळाला आहे. त्यांची मते काँग्रेसविरुद्ध जातील. त्याशिवाय आणीबाणी आणि वाढत्या हुकूमशाही प्रवृत्ती-बद्दल मतदारांनी नापसंती दर्शविल्यास काँग्रेसला गेल्या वेळेएवढ्या तर जागा मिळणार नाहीतच, पण साधे बहुमत मिळणेही कठीण जाईल.

१९६७ च्या निवडणुकात राज्यपातळीवर काँग्रेसच्या कच्च्या दुव्यांची संख्या वाढतच गेली. पंजाब, हरियाना, उत्तरप्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, ओरिसा अशा उत्तरेकडील सहा राज्यांतल्या सलग पट्ट्यात, मध्यप्रदेशात आणि दक्षिणेकडे केरळ व तामिळनाडू राज्यात काँग्रेसने सत्ता गमावली. यांपैकी तामिळनाडू, केरळ, ओरिसा यांचा स्वतंत्रपणे विचार वर केला आहे. आता बाकीच्या राज्यांचा विचार करावयाचा आहे.

### ४. पंजाब

१९६७ च्या निवडणुकांपूर्वी पंजाबची पुनर्घटना होऊन पंजाब आणि हरियाना अशी दोन राज्ये अस्तित्वात आली होती. पंजाबच्या १९६७ च्या निवडणुकांची तुलना पूर्वीच्या निवडणुकांशी करता येणार नाही. कारण पूर्वीच्या पंजाबात हरियाना समाविष्ट होता. काँग्रेसेतर पक्षांच्या संयुक्त आघाडीने पंजाबात बहुमत मिळविले. काँग्रेसला एकूण १०८ जागांपैकी फक्त ४७ म्हणजे ४३·५ टक्के जागा आणि मते ३६·५६ टक्के मिळाली. संयुक्त आघाडीचे सरकार आपसातील भांडणामुळे फार काळ अधि-कारावर राहिले नाही. काँग्रेसेच्या फोडाफोडीच्या डावालाही यश आले. पंजाबमध्ये १९६९ मध्ये विधानसभेच्या मुदतपूर्व निवडणुका घेण्यात आल्या. त्यात काँग्रेसने १९६७ पेक्षा फक्त एक जागा अधिक मिळविली. १९७१ च्या निवडणुकात मात्र काँग्रेसने ६४ जागा जिंकून आपली बाजू चांगलीच मजबूत केली आणि तेथील अस्थिर राजवटीचा काळ संपुष्टात आणला.

पंजाबमध्ये विधानसभा निवडणुकांचेच चित्र लोकसभेत दिसते काय, या दृष्टीने आता विचार करायचा आहे. १९६७ मध्ये पंजाबात काँग्रेसने हुकमी बहुमत गमावले होते. पण लोकसभेत मात्र १३ पैकी ९ जागा तिने जिंकल्या. १९७१ मध्ये लोकसभा निवडणुकात एक जागा अधिक मिळवून आणि १९७२ च्या विधानसभा निवडणुकात १०८ पैकी ६४ जागा जिंकून काँग्रेसने आपले स्थान चांगलेच मजबूत केले. विधानसभेत काँग्रेस एकवेळ बहुमताने निवडून आणले नाही तरी लोकसभेत मोठ्या बहुमताने निवडून आणायचे, असा मतदारांचा कल दिसतो.

जागांप्रमाणे मतदानाच्याही दृष्टीने काँग्रेसने पंजाबात लोकसभा निवडणुकीत आपली परिस्थिती सुधारली. १९६७ मध्ये तिला फक्त ३७·३१ टक्के मते मिळाली. १९७१ मध्ये ती ४५·९६ टक्क्यांपर्यंत वाढली. तरीही ५० टक्क्यांपेक्षा ती कमीच आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. काँग्रेसविरुद्ध विरोधी पक्षाची संघटित आघाडी उभी राहिली आणि सरळ सामने झाले तर काँग्रेसला बहुसंख्य जागा जिंकणे कठीण जाईल. तशी शक्यता यावेळी दिसत आहे. १९६७ मध्ये काँग्रेसने ९ जागा जिंकल्या. त्यातील ८ जागा ५० टक्क्यांपेक्षा कमी मतांनी जिंकल्या होत्या, हे या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे. १९७१ च्या निवडणुकात मात्र फक्त एका मतदारसंघात विजयी काँग्रेस उमेदवारास पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मते होती. काँग्रेसचे बळ वाढल्याचेच हे निदर्शक होते. अकाली दलाने काँग्रेसशी समझोता केला नव्हता तसाच विरोधी पक्षांशीही केला नव्हता. अकाली दलातले फत्तेसिंग गट आणि तारासिंग गट मात्र एकत्र आले होते. सर्वत्र सामने अनेकरंगी झाले. विरोधी पक्षांच्या अपयशाचे हे एक मोठे कारण होते.

यावेळची परिस्थिती निराळी आहे. अकाली दल आणि जनता पक्ष यांच्यात समझोता झाला आहे. त्यामुळे विरोधी पक्षांना यावेळी पूर्वीपेक्षा अधिक जागा मिळण्याचा संभव आहे.

### ५. हरियाना

आयाराम–गयारामांचे राज्य अशी हरियानाची ख्याती १९६७ च्या निवडणुकीनंतर झाली. काँग्रेसला निवडणुकीत बहुमत मिळाले. एकूण ८१ जागांपैकी ४८ जागा तिने मिळविल्या. काँग्रेसचे सरकारही अधिकारावर आले. पण थोड्या दिवसांतच एक गट फुटून विरोधी पक्षास मिळाला. काँग्रेस सरकार गडगडले आणि विरोधी पक्षांच्या संयुक्त आघाडीने मंत्रिमंडळ बनविले. पण आया-राम–गयारामांची साथ फैलावली आणि सरकारला स्थिरता लाभली नाही. काँग्रेसमधून फुटलेल्या गटाच्या नेत्याला मुख्यमंत्रिपद द्यावयाचे, हे तंत्र विरोधी पक्षांनी हरियानापासूनच अवलंबले. फोडाफोडीचा आणि पाडापाडीचा डाव काँग्रेस तर खेळतेच, पण विरोधी पक्षही संधी मिळेल तेव्हा खेळतात. हे १९६७ नंतर निरनिराळ्या राज्यांत मंत्रिमंडळांची पाडापाड ज्या पद्धतीने झाली त्यावरून दिसून आले. काँग्रेस हा डाव खेळली तेव्हा विरोधी पक्षांच्या नेत्यांनी त्यावर कडक टीका केली. पण विरोधी पक्ष हाच डाव खेळले तेव्हा मात्र त्यांच्यातल्या एकाही प्रमुख नेत्याने त्याबद्दल नापसंती व्यक्त केली नाही. आमच्या हाती सत्ता आली नाही तरी चालेल, पण संधिसाधू पक्षांतराला आम्ही थारा देणार नाही, पक्षांतर करणाऱ्या सभासदाने विधानसभेतील किंवा लोकसभेतील आपल्या सभासदत्वाचा राजी-नामा देऊन नव्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आले पाहिजे, तरच त्याला नव्या पक्षात घेण्यात येईल. हा संकेत वास्तविक सर्वच पक्षांनी मान्य करायला हवा. पण काँग्रेस तो मान्य करीत नसला तरी आमच्यापुरता आम्ही मानू, असा आदर्श विरोधी पक्षांनी देशापुढे ठेवायला हवा होता. पण त्यांनी तसे केले नाही. त्यामुळे काँग्रेस व विरोधी पक्ष सारखेच, सत्तेसाठी साऱ्या भल्याबुऱ्या मार्गांचा अवलंब करावयाचा हेच दोघांचेही तंत्र, अशी सामान्य माणसाची प्रतिक्रिया झाली. आपल्या हाती सत्ता आली नाही तर आपल्या वागणुकीने जनमानसात आपली प्रतिमा उंचावण्याची संधी विरोधी पक्षांनी घालविली. १९६७ च्या मानाने १९७१ च्या निवडणुकांत विरोधकांना जे अपयश आले, त्याचे हे एक महत्त्वाचे कारण आहे.

आयाराम-गयारामची साथ म्हणजे लोकशाहीस लागलेली कीड आहे. हरियानामध्ये हिरानंद आर्य या आमदाराने पाच वेळा तर रूपलाल मेहता यांनी चार वेळा पक्ष बदलला. शिस्तभंगाबद्दल पक्षा-तून सहा वर्षे बडतर्फ केलेले हरपालसिंग यांची बडतर्फीची मुदत एक वर्ष करून त्यांना पक्षात पुन: घेण्यात आले. १९६७ च्या निवड-

णुकांनंतर हरपालसिंग काँग्रेसमधून फुटून संयुक्त आघाडीच्या सरकारमध्ये मंत्री बनले होते. त्यांना, तसेच शिस्तभंगाची कारवाई केलेल्या आणखी तीन आमदारांनाही कारवाईची मुदत कमी करून पुन: पक्षात घेण्यात आले. काँग्रेसने घडवून आणलेल्या या पक्षांतरात पैशाचा वाटा मोठा आहे, असा आरोप आमदार रामधारी गौर यांनी केला. 'एका आमदाराची किंमत सध्या पंचवीस हजार रुपये आहे,' असे त्यांनी सांगितले. १९६८ च्या विधानसभा निवडणुकात २६ आयाराम-गयारामांचा मतदारांनीच पराभव केला. या साथीला आता तरी आळा बसेल असे वाटले होते, पण तिने पुन: डोके वर काढले. काँग्रेसच्या पंधरा आमदारांचा गट फुटून संयुक्त आघाडीला मिळाला. बन्सीलाल मंत्रिमंडळाचे बहुमत संपुष्टात आले. विधानसभेची बैठक लागलीच भरली असती तर मंत्रिमंडळ गडगडले असते, पण बन्सीलाल यांनी बैठक लौकर बोलावली नाही. दरम्यानच्या काळात फुटलेल्या सभासदांपैकी निम्म्या जणांना त्यांनी पक्षात पुन: आणले व आपले आसन स्थिर केले.

काँग्रेसमधून फुटलेल्या सभासदास नुसतेच पक्षात घ्यावयाचे नाही तर त्याला मंत्रिपद द्यावयाचे, ही प्रथा संयुक्त आघाडीचे मुख्यमंत्री राव बिरेंद्रसिंग यांनी सुरू केली. पक्षांतराला त्यामुळे अधिकच खतपाणी मिळाले. याही प्रथेबद्दल विरोधी पक्षांच्या कोणत्याही प्रमुख नेत्याने नापसंती व्यक्त केली नाही.

पक्षांतराची ही साथ हरियानाप्रमाणेच इतर राज्यांतही पसरली. १९६७ च्या निवडणुकीनंतर राज्य व केंद्र प्रदेश विधिमंडळांच्या ३५०० सभासदांपैकी ५०० जणांनी म्हणजे दर सात आमदारांमागे एकाने पक्ष बदलला, असा सेंटर ऑफ अप्लाइड पॉलिटिक्स या संस्थेने केलेल्या अभ्यासाचा निष्कर्ष आहे.

कोणत्याही एका पक्षास स्थिर बहुमत मिळाले नाही की आयाराम-गयारामांना संधी मिळते. १९७१ च्या लोकसभा निवडणुका व १९७२ च्या विधानसभा निवडणुकांत काँग्रेसने मोठे बहुमत मिळविल्याने ही साथ ओसरली होती. पण आता १९७७ च्या लोकसभा निवडणुकात काँग्रेसला किंवा जनता पक्षाला अल्पबहुमत मिळाले तर पक्षांतराची साथ पुन: डोके वर काढण्याचा संभव आहे. पक्षांतराला आळा घालण्यासाठी लोकसभेत बिल मांडण्यात आले, त्याला दोन वर्षे होऊन गेली, पण ते लौकर पास करून घेण्याबाबत कोणालाच विशेष आस्था दिसत नाही. वास्तविक आणीबाणीत कितीतरी बिले धडाक्याने पास झाली. सरकारच्या मनात असते तर हे बिलही लौकर पास करून घेणे अशक्य नव्हते. पण पक्षांतरे आपल्या फायद्याची होत असतील तर एवढ्यात हे बिल पास करून घेण्याची घाई कशाला, असा विचार सत्तारूढ पक्षाने केला असावा असे दिसते.

हरियाना विधानसभेच्या १९६७, १९६८ आणि १९७२ या निवडणुकांचा एकत्र विचार केल्यास असे दिसते की, काँग्रेसला १९६७ एवढ्याच ४८ जागा १९६८ मध्ये मिळाल्या. १९७२ मध्ये मात्र चार जागा अधिक मिळाल्या. शेकडा मते १९६७ मध्ये ४१·३३, १९६८ मध्ये ४३·८३ व १९७२ मध्ये ४६·९० टक्के मिळाली. तिन्ही निवडणुकांत काँग्रेसने मतदारांचा पाठिंबा अधिक प्रमाणात मिळविला असला तरी इंदिरा-लाटेच्या काळातसुद्धा ४७ टक्क्यांपेक्षा अधिक मते काँग्रेस मिळवू शकली नाही.

विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांत हरियानात काही फरक आढळतो का? पहिला जाणवणारा फरक म्हणजे जागांच्या दृष्टीने विधानसभेपेक्षा लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने अधिक यश मिळविले आहे. १९६७ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ८१ पैकी ४८ म्हणजे ५९·२५ टक्के जागा मिळविल्या तर लोकसभा निवडणुकीत ९ पैकी ७ म्हणजे ७७·७७ टक्के जागा मिळविल्या. १९७२च्या विधानसभा निवडणुकीत ८१ पैकी ५२ म्हणजे शेकडा ६४ टक्के, असे काँग्रेसचे जागांचे प्रमाण होते. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसने जागांचे प्रमाण १९६७ चेच टिकविले. त्यानंतर वर्षाने झालेल्या १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने ४ जागा अधिक मिळविल्या तरी जागांच्या प्रमाणाचे दृष्टीने लोकसभा निवडणुकीएवढे यश मिळविले नाही.

मतदानाच्या दृष्टीने पाहिले तर लोकसभेच्या १९६७ च्या निवडणुकीत काँग्रेसला ४४·०६ टक्के म्हणजे विधानसभा निवडणुकीपेक्षा तीन टक्के मते जास्त मिळाली तर १९७१ मध्ये लोकसभा निवडणुकीत ५२·०७ टक्के मते मिळाली. त्यानंतर एक वर्षाने झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मात्र काँग्रेसच्या मतांचे प्रमाण ४६·९० टक्के होते. १९६७ आणि १९७१ या दोन्ही लोकसभा निवडणुकांत काँग्रेसला विधानसभा निवडणुकांपेक्षा जागा अधिक प्रमाणात मिळाल्या, त्याप्रमाणे मतेही अधिक प्रमाणात मिळाली. याचा अर्थ राज्यात कोणालाही मत दिले तरी केंद्रात काँग्रेसच हवी असा मतदारांचा कल दिसतो. स्थैर्याच्या विचाराचा पगडा मतदारांवर आहे.

आता १९७७ च्या निवडणुकांत या परिस्थितीत कितपत फरक होण्याचा संभव आहे? दोन निवडणुकांच्या दरम्यान होणाऱ्या पोटनिवडणुकांच्या निकालावरून वारा कोणत्या दिशेने वाहत आहे, याची काहीशी कल्पना येऊ शकते. हरियानामध्ये या काळात लोकसभेची पोटनिवडणूक झाली नाही, पण विधानसभेच्या तीन पोटनिवडणुका झाल्या. त्यांपैकी एक जागा काँग्रेसला मिळाली व दोन अपक्ष उमेदवारांनी जिंकल्या. पूर्वीच्या निवडणुकांतही या तीन जागांपैकी एक काँग्रेसने जिंकली होती. तेव्हा या पोटनिवडणुकांनी काँग्रेसचे पक्षबळ घटले नाही, तसेच वाढलेही नाही. पण तिन्ही जागा जिंकण्यासाठी काँग्रेसने जे शिकस्तीचे प्रयत्न केले ते लक्षात घेता तिला फक्त एकच जागा मिळणे हा तिचा पराभवच म्हटले पाहिजे. विरोधी पक्षांच्या एकजुटीमुळेच त्यांचा विजय झाला. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन काँग्रेसविरोधी एकच उमेदवार उभा करावा, असे आवाहन जयप्रकाश नारायण यांनी केले होते. त्यानुसार या पोटनिवडणुका लढविल्या गेल्या होत्या. विरोधी पक्ष एकत्र आले तर ते काँग्रेसचा पराभव करू शकतात, हे या निकालांनी पुन: एकदा दाखवून दिले. काँग्रेसच्या प्रचारातील लोकशाहीविरोधी प्रवृत्तीही तिच्या अंगलट आली. रोटी मतदार संघात अपक्ष उमेदवार देवीलाल काँग्रेस उमेदवाराचा सोळा हजारांवर मतांनी पराभव करून निवडून आले. मुख्यमंत्री बन्सीलाल एका प्रचारसभेत म्हणाले होते, 'देवीलाल यांना मी विधानसभेत प्रवेश करू देणार नाही. त्यांचा विजय तर होणार नाहीच, पण जरी ते निवडून आले तर हरद्वारीलाल यांच्याप्रमाणे त्यांना विधानसभेतून बडतर्फ करण्यात येईल.' पण बन्सीलाल यांच्या या धमकीला भीक न घालता मतदारांनी देवीलाल यांना निवडून आणले. मेहम मतदारसंघातही काँग्रेसचा पराभव झाला. 'तुम्ही विरोधी उमेदवार निवडलात तरी पुढे तो काँग्रेसलाच मिळणार आहे. मग सरळ काँग्रेसलाच का विजयी करीत नाही?' असा प्रचार काँग्रेस नेत्यांनी केला होता. पक्षाचे बळ वाढविण्यासाठी संधिसाधू पक्षांतरे घडवून आणण्याचा विचार काँग्रेसनेत्यांनी अजून सोडलेला नाही, हेच या प्रचारावरून दिसून आले.

काँग्रेसची ही चाल बदललेली नाही, हे १९७७ च्या निवडणुकीतही दिसून येत आहे. काँग्रेसमधून फुटून निघून आयाराम-गयारामांची साथ हरियानात ज्यांनी प्रथम सुरू केली ते राव बिरेंद्रसिंग यावेळी अपक्ष म्हणून उभे असून काँग्रेसने त्यांना पाठिंबा जाहीर केला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी काँग्रेसने या पक्षद्रोह्याला पुन: जवळ केले आहे. अशी ही काँग्रेसची निवडणूकनीती आहे. बन्सीलाल आता केंद्रीय मंत्री झाले असले तरी हरियानाचा कारभार त्यांनी ज्या पद्धतीने केला, त्याबद्दल जनतेत असंतोष आहे. शिवाय विरोधी पक्षाची एकजूट यावेळी आहे. या गोष्टी लक्षात घेता हरियानात काँग्रेसला आता पूर्वीसारखे मोठे यश मिळणे कठीण आहे. □

ठाणे पुरवणी (भाग दोन)

# ठाणेकरांची नवी ओळख

## ठाणे शहराचे औद्योगिक स्वरूप

रा. ल. कुलकर्णी

संपूर्ण महाराष्ट्र राज्याचा विचार करता ठाणे शहर औद्योगिकदृष्ट्या आज सर्वांत गजबजलेले शहर दिसते. गेल्या १०–१५ वर्षांच्या काळात ठाणे शहर स्वतः होऊनच विकास पावत गेले आणि मुंबईच्याच तोडीचे, ते आज प्रमुख औद्योगिक केंद्र बनले आहे. आज साडेतीन लाख कामगार ठाणे आणि आसपासच्या परिसरात रोजगार मिळवीत आहेत.

हे अनपेक्षित परिवर्तन कसे होऊ लागले, याचा विचार करण्यापूर्वी ठाणे शहरातील लहान–मोठ्या उद्योगांची स्थापना कशी झाली आणि ते कसे विकसित होत गेले हे पाहणे योग्य ठरेल. ठाणे शहरातील उद्योग पाच वेगवेगळ्या विभागांत एकवटलेले आहेत.

मुलुंड चेक नाका सोडला की, महाराष्ट्रातील सर्वात विस्तृत आणि विशाल अशी वागळे औद्योगिक वसाहत सुरू होते. ही वसाहत ठाणे नगरपालिकेच्या हद्दीत येते. खुद्द ठाणे शहरात बरेचसे उद्योग एकवटलेले आहेत. ठाणे शहराच्या पश्चिमेकडून जाणारा मुंबई-आग्रा महामार्ग ओलांडला की पोखरणकडे जाणारे दोन समांतर रस्ते, खुद्द महामार्गावर तसेच या दोन छोट्या मार्गांवर महाराष्ट्रातील मोठमोठ्या उद्योगांची जणू काही गर्दीच उसळलेली दिसते. त्याच्या पलीकडे समांतर रेषेतच घोडबंदर रोड आणि कोलशेत रोड या ठिकाणीही बरेचसे उद्योग एकवटले आहेत. त्याशिवाय ठाणे खाडीच्या पलीकडे ठाणे–बेलापूर पट्ट्यात नव्याने अनेक लहान मोठे उद्योग स्थापन होत आहेत. हे क्षेत्र खरे तर नव्या मुंबईच्या हद्दीत जायचे, परंतु अद्याप तरी ठाण्यापासून बराच दूर असलेला हा भाग ठाणे परिसरातच गणला जातो. या सर्व परिसरात दखल घेण्यायोग्य ७०० मोठे, मध्यम आणि लघुउद्योग आहेत. रासायनिक उद्योगांपुढे दुषित पाणी कोठे सोडायचे ही मोठी समस्या असे. त्यामुळे असे उद्योग कोणत्या भागात स्थापन करावयाचे हा प्रश्न शासनापुढे दीर्घकाळ होता. शेवटी दूषित पाण्यासाठी ठाणे खाडीचा वापर करावयाचा ठरवून ठाणे–बेलापूर पट्ट्यात रासायनिक उद्योगांचा विकास करण्याचे ठरविण्यात आले आहे. आज ठाण्याच्या परिसरातील ७५ रासायनिक उद्योगांपैकी ५० या पट्ट्यातच वसलेले आहेत.

परंतु ठाणे शहर खऱ्या अर्थाने प्रसिद्ध आहे ते इंजिनियरींग उद्योगासाठी. अत्याधुनिक इंजिनियरींग माल तयार करणाऱ्या उद्योगापासून ते अगदी लहान लहान जॉबवर्कस् करणाऱ्या उद्योगापर्यंत विविध प्रकारचे इंजिनियरींग साहित्य तयार करणारे उद्योग या भागात आहेत. वागळे औद्योगिक वसाहतीला तर या उद्योगाचे आगरच समजले पाहिजे. त्या लहानशा पट्ट्यात लहान-मोठ्या इमारतींतून २०५ इंजिनियरींग उद्योगांनीं आपले बिऱ्हाड मांडले आहे.

मुंबई शहर खऱ्या अर्थाने गजबजले कापड उद्योगामुळे. परंतु हे उद्योग प्रामुख्याने सुती कापड उद्योगाच्या वर्गात मोडतात. वुलन, सिल्क, आर्ट सिल्क, रेयॉन, नायलॉन वगैरे उच्च प्रतीचे आणि कृत्रिम स्वरूपाच्या धाग्यापासून वस्त्रे तयार करणारे उद्योग मात्र ठाणे परिसरात उभारले गेले आहेत. अशा प्रकारच्या ६० गिरण्या या ठिकाणी आहेत.

उत्पादन-विविधतेचा विचार करता ठाणे शहराने खूपच आघाडी मारलेली दिसते. वर नमूद केलेल्या उद्योगांखेरीज पॅकिंग साहित्य व कंटेनर्स, ब्रश उद्योग, इमारतींसाठी लागणाऱ्या सामानाचे उद्योग, सौंदर्य–प्रसाधने तयार करणारे उद्योग, सजावटीचे साहित्य करणारे, फर्निचर तयार करणारे, काच व काचेचे साहित्य तयार करणारे, स्टेशनरी साहित्य तयार करणारे, टाइल्स तयार करणारे, फायबर ग्लासच्या वस्तु तयार करणारे व खाद्यपदार्थ तयार करणारे असंख्य उद्योग या परिसरात आहेत.

वागळे वसाहतीतील ॲरॉन स्टील, चावला स्टीलसारख्या रोलिंग मिल्स तसेच काही री-रोलिंग मिल्स, इतर उद्योगांसाठी यंत्रसामग्री तयार करणारे ए. पी. आय. इक्विपमेंट, चेम्रीडा इंडिया, आर. एच. विंडसर तसेच मोजमाप उपकरणे तयार करणारे ब्रॅडमा ऑफ इंडिया, सिग्मा टूल्स ॲण्ड एक्सेसरीज, नवगिरे ॲण्ड कं., वाहनांचे सुटे भाग तयार करणारे प्रमुख ३६ उद्योग, ऑटोमॅटिक इलेक्ट्रिकल, एशियन इलेक्ट्रॉनिक्स, एमको ट्रान्सफार्मर्स, बुश रेडियो वगैरे उच्च क्षमता असलेले उद्योग आहेत. घोडबंदर रोड आणि कोलशेत रोडवर कलरकेम, रॉश, चेसब्राइट, ए. पी. आय., रॅमन ॲण्ड डॅम, बॉम्बे केमिकल, ब्लंडल कोल, गुडलॉस नेरेलॅक, हायकेम, बायर इंडिया, कॉम्प्रहान्स, सॅण्डोज, डिस्मेट, बाटा वगैरे नावेच येथे वसलेल्या उद्योगांचे महत्व स्पष्ट करतात.

दोन्ही पोखरण मार्गांवर मर्फी, कॅडबरी फ्राय, जे. के. केमिकल, टाटा मर्लीन व गेरीन, रेमंड वूलन मिल, इंडियन स्मेल्टिंग, कोटस इंडिया, गोल्डन डाइज, लेव्हिनो कपूर, ड्यूरो मेटाकेम, व्ही. पामलेज, वेमन गार्डन,

एक्सेल्लो, ग्लॅक्सो, ब्ल्यू स्टार, एशियन केबल व पेपर प्रॉडक्टस या उद्योगांनी आपले संसार थाटले आहेत.

ठाणे परिसरातील या साडेसातशे उद्योगांपैकी बरेच उद्योग १९५५ नंतर स्थापन झालेले आहेत. १९६१ ते १९७० या दशकात ठाण्याच्या चेहऱ्यात आमूलाग्र बदल झाला. १९७० नंतरच्या सहा वर्षांत तर उद्योगांचे जणू भरघोस पीकच आले. ही घोडदौड चालूच आहे. सध्या देखील या शहराच्या परिसरात नवीन नवीन कारखान्यांची बांधकामे चाललेली दिसतात. अनेकांनी कारखान्यांसाठी प्लॉट्स घेऊन ठेवले आहेत व उद्योगउभारणीच्या इतर प्रक्रिया पूर्ण करण्यात ते गुंतलेले दिसतात. अशा प्रकारे ठाण्याचा औद्योगिक वृक्ष दिसामाजी विस्तारत आहे.

ठाणे परिसराचे भाग्य लवकरच उजळेल, या दूरदृष्टीच्या विचाराने अनेक उद्योगांनी या भागात कारखान्यांसाठी जागा घेऊन ठेवल्या व त्यामुळेच एकाच कालखंडात या विभागाची झपाट्याने वाढ झाली, हे खरे असले तरी या परिसरात उद्योगांची वाढ होण्यायोग्य अनुकूल वातावरण निर्माण करण्यात महाराष्ट्र शासनाचा फार मोठा वाटा आहे.

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यशासनाने 'औद्योगिक विकेंद्रीकरणाचे व औद्योगिक विस्तारा'चे धोरण जाहीर करून बृहन्मुंबईबाहेरील विभागात उद्योग स्थापन करणारांना विविध सोयी–सवलती जाहीर केल्यानंतर सर्वप्रथम उद्योगपतींना कोणी आकर्षित केले असेल तर ते ठाणे परिसराने. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एम. आय. डी. सी.) या विभागाचा पद्धतशीर विकास करण्याच्या हेतूने ठाणे–बेलापूर पट्ट्यात विस्तृत औद्योगिक क्षेत्र विकसित केले. ठाणे व मुलुंड दरम्यान सुसज्ज अशी 'वागळे औद्योगिक वसाहत' स्थापन केली तर महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने या भागात वीजपुरवठ्याची उत्कृष्ट सोय केली. त्यामुळेच या भागात भराभर सुसज्ज कारखाने उभे राहू शकले. प्रारंभीच्या काळात (१९६० च्या सुमारास) या भागातील विकसित जमीन रु. ३ ते रु. ८ चौरस मीटर भावाने एम. आय. डी. सी.-तर्फे विकली जात असे. आज त्याच जमिनीची किंमत दर चौरस मीटरला रु. ४० हून अधिक आहे.

इथले सारे उद्योग मुंबईशी पूर्णपणे निगडीत आहेत. ठाण्यातील सातशे उद्योगांपैकी सुमारे १२५ उद्योगांची कार्यालये मुंबई शहरातच आहेत. बृहन्मुंबईतून दररोज सुमारे दीड लाख कामगार ठाण्यातील विविध उद्योगांत रोजगारासाठी येतात. कल्याण–डोंबिवली परिसरातून येणारांची संख्याही बरीच आहे. ठाण्यातील काही लोक खुद्द ठाणे परिसरातील कारखान्यांत काम करीत असले तरी बहुसंख्य लोकांना दररोज रोजगारासाठी मुंबईलाच जावे लागते.

ठाणे परिसरातील उद्योगात काम करणाऱ्या व्यवस्थापकांपैकी व वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी ९० टक्के किंवा त्याहूनही अधिक लोक मुंबईत राहतात. बृहन्मुंबईतून येणाऱ्या कामगारांचे प्रमाण ६० टक्क्यांच्या आसपास आहे. ठाणे खाडी पलीकडील उद्योगांमध्ये मात्र आसपासच्या खेड्यांत राहणाऱ्या कामगारांची संख्या २५ टक्क्यांच्या आसपास आहे.

बहुसंख्य कर्मचारी व कामगार रेल्वेमार्गानेच ठाण्यात येत असल्याने व जवळ जवळ तेवढेच लोक ठाण्यातून बृहन्मुंबईकडे जात असल्याने रेल्वेवर खूपच ताण पडतो. हा ताण लक्षात घेता रेल्वेची वाहतूक समाधानकारक वाटते. गर्दीच्या वेळी उपनगरी गाड्या गच्च भरून जाणे व काही लोक गाडीबाहेर लटकताना दिसणे हे दृश्य मुंबईकरांना तरी नवे नाही. तथापि, रेल्वेअभावी कामास विलंब होण्याचे प्रकार क्वचितच घडत असावेत. या प्रचंड जनसमुदायाची दुतर्फा वाहतूक सातत्याने कायम ठेवण्याबद्दल मध्य रेल्वेचे कौतुकच करावे लागेल.

ठाणे शहरातील रस्त्यांची दुर्दशा मात्र पाहवत नाही. रस्ते अस्वच्छ तर आहेतच त्यांवर जागोजागी खड्डेही पडलेले आहेत. सिमेंट कॉन्क्रीटचा किंवा डांबराचा त्यांना कधी काळी स्पर्श झाला असेल हे ओळखणे कठीण जाते. वाहनातून बसून या रस्त्यांनी जाताना जेवढे गचके बसतात तेवढे कदाचित डोंगराळ प्रदेशातच बसत असावेत.

ठाणे स्टेशन समोरील परिसर तर गचाळपणाचा नमुना समजला जावा. तिथे रस्ता नाहीच; आहेत ते फक्त लहान मोठे खड्डे; लहानशी सर येऊन गेली तरी तिथे पाण्याचे तळे साचते; विविध कंपन्यांच्या मोटारी, आपल्या कर्मचाऱ्यांची ने–आण करण्यासाठी स्टेशनकडे येतात. त्यांची निश्चित जागा नाही. त्यामुळे सकाळ–संध्याकाळ स्टेशन परिसरातून वाट काढणे कठीण जाते. सर्व वाहनांची वाहतूक 'गोखले पथ' व 'शिवाजी पथ' यावरून होते. हे मार्ग वाहनांना अपुरे पडतातच; शिवाय त्यावरील खड्ड्यांमुळे वाहनांचे अतोनात नुकसान होते.

एक्स्प्रेस हायवे व मुंबई–आग्रारोड हे अतिशय सुंदर मार्ग या परिसरातून जातात. पण या मार्गावरून पोखरणकडे जाणारे दोन मार्ग तसेच कोलशेतकडे जाणारा मार्ग दुर्दशेला येऊन पोचले आहेत. या मार्गाच्या देखरेखीचे काम ठाणे जिल्हा परिषदेने करावयाचे असते. वागळे इस्टेटमधील रस्त्यांची परवडही तशीच आहे.

ठाणे परिसरातील एस. टी. ची वाहतूक ही अपुरी व समाधानकारक आहे. औद्योगिक केंद्राकडे जाणाऱ्या गाड्यांची संख्या फारच कमी आहे. त्यामुळे सारे प्रवासी वाहून नेणे त्यांना शक्य होत नाही.

## ठाणा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन

ठाणे परिसरातील उद्योग चालकांनी 'ठाणा मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन' ही संघटना स्थापन केली आहे. जे. के. केमिकल्स लि. चे श्री. ए. एस. कपूर या संघटनेचे अध्यक्ष आहेत. ठाण्यातील उद्योगांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने ही संघटना सातत्याने प्रयत्न करीत असते. औद्योगिक परिसरातील रस्त्यांचा प्रश्न धसास लावण्यासाठी या संस्थेने बरेच प्रयत्न केले आहेत.

ठाणे परिसरातील १५–२० मैलांच्या परिसरातील उद्योगाकडे जाणारे सारे कामगार ठाणे रेल्वे स्टेशनात येतात. उद्योगाकडे त्यांची वाहतूक ठाणे शहरातूनच होते. त्याचा ताण रस्त्यांवर पडतो. म्हणून मुलुंड–ठाणे दरम्यान कोपरी पुलाजवळ 'एक स्टेशन' किंवा 'फ्लॅग स्टेशन' उभारावे, अशी संघनेची मागणी आहे. या उद्योगाकडे येणाऱ्या कच्च्या मालाची व त्यात तयार होणाऱ्या मालाची वाहतूक रेल्वेनेच करावी लागते. त्यासाठीही 'कोपरी पुला'जवळ 'माल–

धक्का ' असावा असे त्यांचे म्हणणे आहे.

महाराष्ट्र शासनाने अलीकडेच लागू केलेल्या वीज कपातीची झळही या भागातील उद्योगांना लागली असून वागळे इस्टेटमधील काही उद्योग तर वीज कनेक्शन तोडल्यामुळे बंदही पडले आहेत. ही संघटना त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहे.

उद्योग म्हटला की, अडचणी येणारच ! त्यांना तोंड देऊन मार्ग काढावा लागतो. महाराष्ट्राच्या इतर भागातील, विशेषतः जिथे साधी रस्त्याची सोयहि नीट नाही, अशा मागासलेल्या भागातील उद्योगापेक्षा, ठाणे परिसरातील उद्योग कितीतरी सुदैवी आहेत. मुंबईजवळ असलेल्या त्यांच्या समस्यांची तड विनाविलंब लागू शकते.

असा आहे हा ठाण्याचा सुसंपन्न औद्योगिक परिसर ! त्याच्या सीमारेषा सतत विस्तारत आहेत. वागळे इस्टेटमध्ये अद्याप किती तरी क्षेत्र उद्योगासाठी राखून ठेवण्यात आलेले आहे. पोखरणकडे, खोडबंदरकडे व खाडीच्या पलीकडे आणखी नवेनवे उद्योग आकार घेत आहेत. दिसामाजी या क्षेत्राचे रूप असेच पालटत जाणार आहे. □

---

# आजची कामगार चळवळ

सूर्यकांत वढावकर

कामगार चळवळीविषयी समाजातील सर्वच थरांत आज गैरसमज असल्याचे आढळून येते. त्याला अनेक कारणे आहेत. या चळवळीत काम करणारे कार्यकर्तेही पुष्कळ प्रमाणात याला जबाबदार आहेत. युनियन्सकडे असलेली प्रचारयंत्रणा कमकुवत आहे. किंबहुना प्रचारयंत्रणाच नाही असे म्हटले तर त्यांत अतिशयोक्ती होणार नाही. वर्तमानपत्रांतून संप, मोर्चे, दगडफेक यालाच प्रसिद्धी मिळते. पण या चळवळीत चालू असलेल्या विधायक कार्याला प्रसिद्धी मिळत नाही. कारण वर्तमानपत्रवाल्यांना चटकदार बातम्या लागतात. आजच्या कामगार चळवळीत दोष नाहीत असे नाही. काही कार्यकर्ते बेजबाबदार आहेत, यात शंकाच नाही. पण त्याचबरोबर अनेक चांगल्या गोष्टी, अनेक चांगल्या प्रथा जबाबदार कामगार पुढाऱ्यांमुळेच निर्माण झाल्या आहेत, हे विसरता येणार नाही. आपल्या देशात धर्म, जाती, प्रांतीयवाद यांचा पगडा काही कमी नाही. पण भारतीय कामगार चळवळ मात्र या सर्वांपासून अलग राहिली आहे. भारतीयांना अभिमान वाटावा अशी ही गोष्ट आहे. त्याचे श्रेय कामगार पुढाऱ्यांना दिलेच पाहिजे. कामगार चळवळीतील दोषांवर पांघरूण घालण्याचा माझा हेतू नाही; पण त्याचबरोबर युनियन्सच्या वतीने चालू असलेल्या सहकारी सोसायट्यांचे कार्य, कामगार शिक्षणाचे कार्य, सांस्कृतिक कार्य वगैरे कार्याचे मोल काही कमी नाही. कामगार वर्गात हक्काबरोबर कर्तव्याचीही जाणीव करून देण्यात युनियन्सचे कार्यकर्ते मागे नाहीत.

कामगार चळवळीच्या प्रगतीवर राष्ट्राची प्रगती अवलंबून आहे, असं मला वाटतं. लोकशाहीवर आधारलेली व विधायक कार्याचे कंकण बांधलेली कामगार चळवळ वाढली पाहिजे; प्रबळ अशा कामगार चळवळीचा अंकुश भांडवलदार वर्गावर व सरकारी यंत्रणेवर पाहिजे; तरच कल्याणकारी कायद्याची अंमलबजावणी होऊन त्याचा फायदा गरिबांना मिळेल. कामगार चळवळीला इतके महत्त्व असल्यामुळेच या चळवळीतील आजच्या उणीवांचा विचार झाला पाहिजे.

कामगार वर्गाच्या हितसंबंधांचे रक्षण करणे व त्यांची सर्वांगीण उन्नती करणे हा कामगार चळवळीचा मुख्य उद्देश. त्याकरिता कामगार चळवळही खऱ्या अर्थाने स्वतंत्र (फ्री ट्रेड युनियन) राहिली पाहिजे. स्वतंत्र कामगार चळवळ म्हणजे काय ? तर ती (१) मालकांच्या (२) सरकारच्या (३) पक्षाच्या (४) व व्यक्तीच्या दडपणांपासून "स्वतंत्र" असली पाहिजे व तिचे कार्य केवळ कामगारांच्या इच्छेप्रमाणे व लोकशाही पद्धतीने चालले पाहिजे.

आजच्या कामगार संघटनांचा विचार केला तर त्या खऱ्या अर्थाने ' स्वतंत्र ' आहेत, असे म्हणता येणार नाही. स्वतंत्र कामगार चळवळीच्या नावाने काही व्यक्ती काम करतात, त्या युनियन्सही स्वतंत्र नसून व्यक्तीच्या बटीक बनल्या आहेत. व कामगार चळवळीला सर्वांत अधिक घातक ठरल्या आहेत.

वेतनवाढ, नोकरीची शाश्वती, कामांच्या तासांवर मर्यादा, सामाजिक सुरक्षा आणि कामगारांचे समाजातील स्थान, याकरिता जागरूकतेने कार्य करणे हे कामगार कार्यकर्त्यांचे कर्तव्य ! तथापि या व्यापक दृष्टीने काम करणारे कार्यकर्ते अभावानेच आढळतात. आज कामगार चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल. (अ) केवळ स्वार्थाकरिता युनियन्समध्ये काम करणारे कार्यकर्ते, (ब) पक्षीय हिताकरिता काम करणारे कार्यकर्ते, व (क) कामगार चळवळीकरिता काम करणारे कार्यकर्ते.

वरीलपैकी पहिल्या गटातील कार्यकर्त्यांविषयी काहीही न लिहिणेच योग्य. दुसऱ्या गटातील कार्यकर्त्यांनी कितीही प्रामाणिकपणे काम केले तरी ते स्वतःच्या नावाकरिताच काम करीत असल्यामुळे ते कामगार चळवळीच्या हिताचे ठरत नाही, अशा युनियन्समध्ये लोकशाही अभावानेच आढळते. तिसऱ्या गटातील कार्यकर्ते हे आपल्या पक्षाच्या हिताकरिता प्रामाणिकपणे कामगार चळवळीत काम करतात. आपल्या देशातील कामगार चळवळीचा इतिहास पाहिल्यास निरनिराळ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांमुळेच कामगार चळवळीचा पाया रचला गेला असून, कामगार चळवळ ते ऋण विसरू शकणार नाही. तथापि अतिरेकी पक्षीय दृष्टिकोनामुळे कामगार चळवळीत फाटाफूट झाली असून, त्यामुळे कामगारांचे नुकसान झाले आहे.

म्हणूनच केवळ कामगार चळवळ वाढावी, या व्यापक दृष्टीने काम करणारे चौथ्या गटातील कार्यकर्ते पोषक असून अशांची संख्या वाढणे आवश्यक आहे. त्यामुळेच कामगार चळवळ सुदृढ होईल व पर्यायाने औद्योगिक

संबंध सुधारून देशाचे हित होईल.'

### कामगार चळवळीतील आव्हाने

आजच्या कामगार चळवळीच्या फाटाफुटीचे स्वरूप कसे आहे, त्याचा उल्लेख वर आला आहे. आज कामगार चळवळीपुढे अनेक आव्हाने उभी असून ती समर्थपणे स्वीकारावयाची असतील तर भारतीय पातळीवर कामगारांची एकमेव मध्यवर्ती संघटना निर्माण झाली पाहिजे. तोपर्यंत कामगारांनी निदान, सुरुवातीला व्यापक प्रश्नावर एकत्रित येण्यास आपल्या युनियन्सना भाग पाडले पाहिजे. त्यामुळे परस्परात विश्वास निर्माण होऊन त्यातूनच कामगार-ऐक्याचे स्वप्न साकार होईल.

### असंघटित व संघटित कामगार

संघटित कामगारांनी आपापल्या संघटनांच्या जीवावर आपली काहीशी प्रगती करून घेतली असली तरी आपल्या देशातील लक्षावधी कामगार व शेतमजूर अद्यापि असंघटित आहेत. संघटित कमगारांनी त्यांना संघटित करण्याची जबाबदारी उचलली पाहिजे. त्यांच्याकरिता आर्थिक मदतही जमा केली पाहिजे. कामगार असंघटितच राहिले तर त्याचा परिणाम संघटित कामगारांच्या मागण्यांवर होतो, असा अनुभव आहे.

### कामगार वर्ग व समता

कामगार वर्ग हा क्रान्तीचा अग्रदूत आहे, असे समजले जाते. त्याचे प्रत्यन्तर आजच्या कामगार चळवळीत येत नाही. आर्थिक समाजवादाचे तत्त्वज्ञान कामगार बोलतो व भांडवलशाहीवर प्रहार करतो. पण त्याच पोटतिडकीने सामाजिक समतेवर बोलताना व रुढिप्रिय समाजावर टीका करताना दिसत नाही. सामाजिक समतेची जबाबदारी कामगार चळवळीवर आहे, हे कामगारांनी विसरता कामा नये.

### कामगार संघटना व सहकारी चळवळ

कामगार चळवळ व सहकारी चळवळ या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कामगार संघटनांचे कार्य केवळ पगारवाढ, महागाई भत्ता, बोनस या मागण्या करणे व त्यात वाढ करून देणे इतकेच मर्यादित नाही, तर संघटनेच्या कामाचा हा एक भाग आहे. पण त्याचबरोबर सभासद व त्यांच्या कुटुंबियांच्या हिताकरिता कार्य करणे, हेही कामगार संघटनेचे काम आहे, म्हणूनच सहकारी चळवळीत कामगार संघटनांनी कार्य केले पाहिजे.

### कामगार वर्ग व राजकारण

कामगार चळवळीत पक्षीय राजकारण येऊ नये, हे खरे असले तरी कामगारांना राजकारणापासून दूर राहता येणार नाही. कामगारांच्या कारखान्यातील व बाहेरील जीवनावर त्याचा परिणाम होतो अशा अनेक प्रश्नांवर सरकार निर्णय घेते. तो निर्णय कामगारांच्या बाजूचा असेल, असा प्रभाव सरकारवर कामगार चळवळीला पाडता आला पाहिजे.

संसदेत व विधानसभेत वेगवेगळ्या प्रश्नांवर कामगार वर्गाची भूमिका निश्चित करून ती मांडणे व त्याबाबत निवडून आलेल्या सभासदांचा पाठिंबा मिळविणे या गोष्टीही कामगार संघटनांना कराव्या लागतात. कामगारांसाठी घरे बांधणे, औद्योगिक संबंधविषयक कायदे, या कामगारांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबतही युनियन्स लक्ष देत नाहीत, असा अनुभव आहे. कामगारांच्या हितासंबंधीच्या रक्षणाबरोबरच सार्वजनिक धोरण ठरविण्याच्या क्षेत्रातही कामगार संघटनांनी लक्ष दिले पाहिजे आणि म्हणूनच कामगार संघटनांना राजकारणापासून अलिप्त राहता येणार नाही.

भविष्यकाळात आर्थिक, सामाजिक व राजकीय जीवनात कामगार संघटनांना फार महत्वाचे स्थान मिळावयाचे आहे. ही सर्व आव्हाने स्वीकारलीच पाहिजेत. व त्याकरिता आवश्यक अशी प्रबळ कामगार संघटना बनविली पाहिजे. □


*With Best Compliments From :*

# MACHINE WELL

**Founders, Machinists Engineers**
**Contractors, Importers, Exporters**

Address : 265, Maulana Shaukatali Road,
Grant Road Corner, Bombay 400 008,

*Telephone : 333108,* *Grams : DINSHAWCO*

# बटाटा वेफर्स—एक उत्कृष्ट उद्योग

वामन राजाराम देसाई

महाराष्ट्रात विपुल प्रमाणात कच्चा माल मिळत असतानासुद्धा आपल्या लोकांचे ह्या धंद्याकडे का लक्ष वेधले जात नाही, याचेच आश्चर्य वाटत आहे! इतर कोणत्याही धंद्यात मिळत नाही, एवढा ह्या धंद्यात नफा मिळतो. तयार मालाला बाजार चांगला मिळतो. आपल्या महाराष्ट्रीयन तरुणांनी ह्या धंद्यात उतरावें, ह्या दृष्टिकोनातून माहिती ह्या लेखात सादर करीत आहोत.

वेफर्स बनविण्याकरिता कोल्ड स्टोअरेजमधला बटाटा सोडून कोणताही बटाटा चालतो. वेफर्स तळण्याकरिता सर्वसाधारण ४ फूट व्यासाची व १ ते १॥ फूट खोल कढई वापरतात. तांबड्या मातीने बांधलेल्या भट्टीत जळण म्हणून जळाऊ लाकडे अगर दगडी कोळसा वापरतात. वेफर्सना नेहमी जास्त उष्णता मिळेल, अशी व्यवस्था केल्यास, वेफर्स अतिशय उत्तम तयार होतात. वरील प्रकारच्या कढईस २५० ते ३०० रु. पर्यंत खर्च येतो.

वेफर्स तयार करताना प्रथम कच्च्या बटाटयाची साले काढली जातात. 'पिलर' नावाचे मशिन १ मिनिटाला ३ किलो बटाटयाची साले काढण्याचे काम करीत असते. पिलरवर साले काढणे अति स्वस्त पडून सालाव्यतिरिक्त बटाटयाच्या आतील भागास काहीही इजा न होता काम केले जाते. पिलर मशिन २३० व्होल्टवर, म्हणजेच आपण घरात वापरतो, त्या विजेवर ½ हॉर्स पॉवरचे मोटारीवर चालते. लहान मशिन तर टेबलाच्या आकाराचे असते. (३६×२०, उंची ३०) त्यामुळे थोड्या जागेत हे मशिन बसविता येते. मशिन संपूर्ण ॲटोमॅटिक व मजबूत बनविलेले असल्याकारणाने अशिक्षित माणसांकडून सुद्धा काम करून घेता येते. एवढेच काय, पण बायकासुद्धा सहज व सुलभतेने ह्या मशिनवर काम करू शकतात. साले काढून झाल्यावर बटाटा ५ ते ७ मिनिटे पाण्यात (थंड) बुडवून ठेवावा.

साल काढलेल्या बटाटयाचे काप (स्लाईस) काढण्याकरिता 'स्लायसर' नावाचे मशिन वापरतात. स्लायसरवर आपणास पाहिजे त्या जाडीचे काप होतील, अशी त्या मशिनवर व्यवस्था केलेली असते. काप मोठ्या टबात पाणी घेऊन, त्यात भिजत ठेवावे लागतात. ५ मिनिटे थंड पाण्यात काप भिजल्यानंतर कापामधून (सत्त्व) आरारूट बाहेर पडतो. टबात हात घालून फिरविल्यास, त्या कापामधील सर्व आरारूट निघून जातो. नंतर 'ड्रायर'च्या पॉटमध्ये सर्व काप (स्लाईस) काढून, स्लाईसमधील पाणी 'सेंट्रिफ्यूगल' पद्धतीने काढण्याकरिता पिलर मशिनमध्ये व्यवस्था केलेली असते. त्यात फक्त ड्रायरचा पॉट ठेवावयाचा व मशिन चालू करावयाचे की २ मिनिटांत ६ किलोचे पाणी निघून जाते. मशिन बंद करून, स्लाईस बाहेर काढून, तळावयास घ्या. तळताना जेवढी जास्त उष्णता देता येईल, तेवढी द्या. म्हणजे २ मिनिटांत तळून होत जाईल. वेफर्सना चव येण्याकरिता मिठाचे पाणी मारण्याची पद्धत आहे.

कढईत वेफर्स तळून झाल्यानंतर बाहेर काढताना, मिठाचे पाणी टाकून, म्हणजेच फक्त कढईत मिठाचे पाणी हाताने शिंपडून, झाऱ्याने कढईतील वेफर्स हलवावयाचे व मग बाहेर काढावयाचे. २०० ग्रॅम मीठ (खडे) व १ लिटर पाणी ह्या प्रमाणात मिठाचे पाणी तयार करून, ते वापरावयाचे असते.

वेफर्स तळून बाहेर काढल्यानंतर, मसाला वेफर्स करावयाचे असल्यास, तांबड्या तिखटाची पावडर (सुकी) त्यावर (चवीप्रमाणे) शिंपडावयाची असते. वेफर्स हाताने वर–खाली केल्यावर, त्या सर्व वेफर्सना पावडर लागते. नंतर वेफर्स थंड झाल्यावर कागदाच्या अगर प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून ठेवावे.

१५ ग्रॅम, १०० ग्रॅम, १५० ग्रॅमच्या पुड्या सुंदर प्रिंट बटर पेपरच्या अगर प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून वर सील बंद करून ड्रायफ्रूटच्या दुकानात, हॉटेलात, सिनेमा थिएटरमधून अथवा वाईन शॉपमधून विक्रीस ठेवावे. १०,००० लोकसंख्येच्या शहरात रोज सुमारे १०० किलो वेफर्स सहज विकले जातात. १०० किलो बटाटयाचे ३० किलो वेफर्स होतात. ३० किलो वेफर्स तळण्याकरिता १० किलो तेल लागते.

१०० किलो वेफर्स उत्पादनाला अंदाजे रुपये २१३ खर्च येतो. ह्या २१३ रु. उत्पादन खर्चातून तुम्हाला ३० किलो वेफर्स तयार मिळतील. वेफर्सचा हल्लीचा ठोक भाव १२ रु. किलो आहे. (किरकोळ १५ रु. किलो आहे.) १२ रु. किलोप्रमाणे ३० किलो वेफर्सचे रु. ३६० विक्री होईल. त्यातून उत्पादनखर्च २१३ रु. वजा जाता, आपणास निव्वळ नफा १४७ रु. फक्त १०० किलो बटाटयांवर प्रक्रिया केल्याने मिळत असतो. एवढा नफा दुसऱ्या कोणत्या धंद्यात आहे, तुम्हीच सांगा.

हा धंदा मध्यम प्रमाणात म्हणजे रोजचेच १०० किलो वेफर्स बनवावयाचे असल्यास १०×१० फुटाची जागा लागते. त्यात डोमेस्टिक अगर साधे २३० व्होल्ट इलेक्ट्रिकचे फिटिंग लागते. धंदा सुरू करावयाचा असल्यास खालीलप्रमाणे खर्च येतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मशिनची किंमत | ५००० रु. नं. १ | २५०० रु. नं. २ |
| २ | भट्टी बांधणे | ५० ,, | ५० ,, |
| ३ | कढई व इतर | ३०० ,, | २५० ,, |
| ४ | कच्चा माल | १००० ,, | ५०० ,, |

आपली स्वतःची जागा असेल तर, वरील खर्चात आपला धंदा व्यवस्थित चालू होतो. वेफर्सच्या मशिनरीवर चिवड्याकरिता कीस तयार करता येतो व स्लाईस उन्हात वाळत घातल्यास त्या सुकविलेल्या मालासही आज फार चांगले मार्केट आहे. हिंदुस्तानात भरपूर उन्हे ही ईश्वराची देणगीच आहे; त्याचा फायदा आपण ह्या ना त्या रूपात घेतला पाहिजे.

उन्हात बटाटयाचा किस वाळवून तयार केल्यास उपवासाकरिता त्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो व त्याची भरपूर मागणीही आहे. शेतकऱ्यांनी स्वतःचा बटाटा स्वतःच वरीलप्रमाणे मशिनवर कीस काढून, उन्हात सुकवून विकल्यास त्यांना एक अति उत्तम धंदा मिळेल.

मे. संजय स्टील बिल्डर्स ही कंपनी आपला वेफर्सचा धंदा चालू करून देईपर्यंत आपणास मदत करते. आपण त्यांच्याकडून मशिन खरेदी केल्यानंतर, आपल्याकडे येऊन मशिन चालू करून देऊन आपणास तें प्रॉडक्शन काढून देतात, शिवाय आपणास ते त्याचे शिक्षणही देतात. तसेच विक्रीबद्दलचा सल्ला, उत्पादनाबद्दल सल्ला अल्प मोबदल्यात देतात. □

# ठाण्यातील महिला आघाडी

मीना फणसे

राष्ट्रातील थोर पुरुष म्हणजे दीपस्तंभच. त्या पुरुषोत्तमांनी आपल्या कर्तृत्वाने दीपमाला प्रज्वलित केली आहे. त्या प्रकाशात मार्ग आचरून निरनिराळ्या भगिनी मंडळांनी निरनिराळ्या क्षेत्रांत आपले हात क्षितिजापर्यंत पोहोचविण्याकरिता केलेली धडपड उल्लेखनीयच आहे.

अखिल भारतीय महिला परिषदेचे दुसरे अधिवेशन भरविण्याच्या उद्देशातून १९३६ साली जन्माला आलेल्या ठाणे महिला मंडळाच्या कार्याचा आढावा घेणे आवश्यक आहे. ह्या मंडळाची स्थापना झाली कै. राजसबाई वठावकर यांच्या अध्यक्षतेखाली. १९४० सालच्या शारीरिक शिक्षण अधिवेशनात व १९४६ सालच्या महिला शिक्षण सप्ताहात सक्रीय भाग घेऊन तो यशस्वी करून दाखविला.

ठाणे तुरुंगातील कैद्यांना रात्री बौद्धिक देणे, लेदरवर्कचा वर्ग चालविणे, वाडिया हॉस्पिटलमध्ये 'कुटुंब नियोजन केंद्र' चालविणे, शिवण व भरतकामाचे डिप्लोमा वर्ग चालविणे, हरिजन वस्तीत संक्रातीचे हळदीकुंकू करणे, रेडक्रॉसकडून मिळणारे पावडरचे दूध गरीब मुलांना देणे, वेळोवेळी स्त्रियांकरिता नवीन नवीन माहितीचे वर्ग चालविणे इ. असंख्य छोट्या छोट्या पण उल्लेखनीय गोष्टी मंडळाने केल्या. पण ह्या कार्याला भरीव स्वरूप आले ते मात्र १९७४ साली मंडळाच्या शिवण क्लासला सरकारी मान्यता व ग्रँट मिळाली तेव्हापासून. हा दिवस मंडळाच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहून ठेवण्यासारखा झाला. त्यावेळचे अर्थमंत्री श्री. सी. डी. देशमुख व वेल्फेअर बोर्डाच्या चेअरमन दुर्गाबाई देशमुख यांनी मंडळास भेट दिली व इन्स्पेक्शन घेऊन मंडळाच्या कार्याची प्रशंसा केली. राष्ट्रीय बचत योजनेची एजन्सी घेऊन त्याचे कार्य पण मंडळाने आजतागायत चालू ठेवले आहे.

नवयुगात महत्त्व दिल्या जाणाऱ्या २० सूत्री व तत्सम कार्यक्रमातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट 'रक्तदान.' पण ह्या मंडळाच्या भगिनींनी खूप पूर्वीचं महाराष्ट्र ब्लड बँकेला रक्तदान करून प्रथम क्रमांक लावला. कै. डॉ. कमलाबाई प्रधान, कै. डॉ. मालतीबाई चिटणीस, डॉ. शीलाबाई भागवत, सौ. विमलाताई दिघे, सौ. इंदुकला कोरडे, सौ. इंदुमती गुप्ते, सौ. चाचणे ह्या मंडळाला मिळालेल्या भरघोस यशातील खऱ्या वाटेकरी होत. कै. डॉ. मालतीबाई चिटणीस ह्यातर मंडळाचे कार्य अविरत करीत राहिल्या व मंडळातील स्त्रियांच्या अंतःकरणात मानाचे स्थान पटकावून बसल्या. ह्या मंडळाच्या कार्याचा उच्चांक म्हणजे आज हे मंडळ स्वतःची इमारत बांधत आहे.

स्त्रिया व मुले ह्यांच्या कल्याणाचे कार्य हेच अंतिम ध्येय असलेल्या 'भगिनी समाजाची' स्थापना झाली १९४१ साली. सामुदायिक समाजकार्यात नेहमीच समाजाचा पुढाकार असतो. पानशेत प्रलय, कोयना भूकंप, दुष्काळ इ. आपत्तिकालात संस्थेने साहाय्य तर केलेच, पण युद्धआघाडीवरील जवानांकरिता खाद्यपदार्थ, दिवाळी भेटकार्डे व ब्लँकेटस् पण पाठविली होती.

संस्थेचे कायम स्वरूपाचे व विशेष उल्लेखनीय कार्य म्हणजे ठाण्यातील पाचपाखाडी विभागातील मागासलेल्या वर्गातील मुलांकरिता चालविलेली शाळा व तिला मिळविलेली सरकारमान्यता. ह्या भागात तद्वतच ह्या मंडळाने कुटुंबनियोजनाचे व साक्षरताप्रसाराचे वर्गही अखंडित चालू ठेवले आहेत.

सौ. इंदिरा साने, सौ. वैद्य, सौ. फणसे, सौ. परांजपे, सौ. सिधकर इ. स्त्रिया पूर्वीपासून व अजूनही संस्थेचे काम आस्थेने व आपुलकीने करीत आहेत. मंडळाच्या माजी अध्यक्षा श्रीमती सुशीला पानसे ह्यांच्या १२ वर्षांच्या परिश्रमाचे फळ म्हणजेच ही संस्था. त्यामुळेच गव्हर्मेंट महिला आर्थिक विकास महामंडळाच्या ठाणे शहरातील विभाग मंडळाच्या प्रमुख सदस्या म्हणून त्यांची नेमणूक केली गेली आहे.

१९४२ सालच्या युद्धाच्या धामधुमीमुळे मुंबई खाली झाली आणि कबुतरे राहात असलेल्या ठाण्याच्या चाळी माणसांनी गजबजल्या. चाळ आली की चार स्त्रियांचे एकत्र येणे व भाजी, तांदूळ निवडता निवडता तासभर गप्पा हे आलेच. पण सौ. दात्यांनी ह्या गप्पांना वेगळे वळण लावावयाचे ठरविले. काम करता करता वर्तमानपत्रांतील ठळक बातम्यांचे वाचन, त्यावर चर्चा, असं करता करताच नकळतच ह्या मंडळाचा जन्म झाला आणि बालकाचं नाव ठेवलं गेलं, 'नौपाडा हिंदू भगिनी मंडळ.'

१९४५ साली ह्या मंडळाचे बीजारोपण झाले. मंडळाने एक विशिष्ट कुंपण घालून घेतल्याने गटबाजी, वशिलेबाजी, भांडणतंटे या रोगांची कीड मंडळाला लागली नाही. १९६१ साली मंडळाचे रजिस्ट्रेशन झाले. ह्या बीजातूनच आरोग्यशाखा, ज्ञानशाखा, कुटीरोद्योग शाखा, अर्थशाखा, कलाशाखा, सांस्कृतिक शाखा इ. शाखांनी परिपूर्ण असा डेरेदार वृक्ष तयार झाला.

आरोग्यशाखेने परिस्थितीने गरीब व्यक्तींना अत्यंत अल्प मोबदल्यात उपयुक्त साहित्य पुरविण्याचे कार्य केले. त्याचबरोबर योगासनाचे वर्गही सुरू केले. तर ज्ञानशाखेने मंडळाच्या सदस्यांना विविध विषयांचे ज्ञान मिळावे म्हणून १९६२ सालपासून 'वर्षा' व्याख्यानमाला' सुरू केली, ती अव्याहत चालू आहे. ह्याच शाखेने वाचनालयही सुरू केले. आर्थिक दुरावस्थेच्या काळात सामान्यांची आर्थिक दृष्ट्या अत्यंत कुचंबणा होते. त्यादृष्टीने भगिनींना अर्थोत्पादन व्हावे म्हणून मंडळाने उद्योगशाखेच्या द्वारे पुढ्याचे खोके बनविणे, तिखट, हळद, शिकेकाईसारख्या जिनसा बनवून 'उद्योग मंदिर' सुरू केले. अर्थशाखेने मंडळाच्या गंगाजळीत भर टाकण्यासाठी स्टीलच्या वाट्या, ताटे, भांडी, इ. वस्तू ब्राह्मणसेवा संघात भाड्याने देण्यासाठी ठेवल्या. स्वतःची वास्तू ह्या निधीतून उभारण्याचा मंडळाचा मानस आहे. भगिनींना जन्मतःच कला अवगत असतात. त्यांच्यातील सुप्त क्रीडागुणांना, कलात्मकतेला वाव मिळावा म्हणून विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. आकाशवाणीवरही कार्यक्रम सादर केले जातात. जिल्हास्तरावर होणाऱ्या स्पर्धात भाग घेऊन विजयाची

ढालही त्यांनी जिंकून आणली. सांस्कृतिक शाखेने हळदीकुंकू, कीर्तने अशासारखे कार्य राष्ट्रीय सणानिमित्त आयोजित तर केलेच, पण भगिनींना राष्ट्रीय व सामाजिक कर्तव्याची जाणीव व्हावी म्हणून लोकमान्यांसारख्या राष्ट्रपुरुषाचे पुण्यस्मरणही केले जाते. ठाणे शहरातर्फे होणाऱ्या विविध सामाजिक कार्यांत पण मंडळ उत्साहाने भाग घेते. मग तो गोमंतवीर मोहन रानडे यांचा स्वागत–समारंभ असो वा परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार असो. अशा या मंडळाच्या 'वटवृक्षाच्या' छायेत आल्हाददायक विसावा घेऊन आपले जीवन सुखद करावे असे कोणाला बरे वाटणार नाही ! सौ. विमलाताई कर्वे, सौ. शांताताई अभ्यंकर, सौ. नामजोशी, सौ. जोशी, सौ. लेले, सौ. फाटक यांचा व मंडळाचा अन्योन्य साधारण संबंध आहे.

चरईतील वनिता विकास मंडळाची स्थापना झाली ती १९५८ साली. 'मूर्ती छोटी पण कीर्ती मोठी' असलेले हे मंडळ. घराच्या बाहेर पडू न शकणाऱ्या स्त्रियांना एकत्र आणून त्यांच्या सुप्त गुणांना व आवडींना वाव मिळावा, चालना मिळावी, हाच या मंडळाचा उद्देश. आर्थिक दृष्टचा अडचण असलेल्या चार महिलांना मनोरंजनाचा प्रश्नच असतो. अशाकरिताच मुख्यपणे हे मंडळ स्थापिले गेले. मंडळातील वैशिष्टच म्हणजे आर्थिक परिस्थितीवरून कुणाचेच माप मोजले जात नाही. 'सर्व एक' हीच भावना मुळाशी ठेवून कार्य केले जाते.

'रक्तदान', 'पोलिओ डोस', 'शिक्षणाचे वर्ग' प्रचलित विषयावर चर्चा, रेडिओवर सांस्कृतिक कार्यक्रम, गरीब मुलांकरिता दुधाच्या भुकटीचे दूध करून त्याचे वाटप, १९६५ सालच्या युद्धाच्या वेळी जवानांना अन्नपदार्थ पुरविणे, अशा कितीतरी सामाजिक स्तरावरील, पण राजकीय रंग नसलेल्या महत्त्वपूर्ण कार्याची जबाबदारी मंडळाने पार पाडली.

'वक्तशीरपणा' हा मंडळातील स्त्रियांचा महत्त्वाचा गुण. निरनिराळ्या मोठमोठ्या संस्थांच्या कुठल्याही व्यापक कार्यात पण ह्या मंडळाचा सदैव हात पुढे व वाटा पण मोठा. पण नावाचा हव्यास मात्र कधीच नाही.

विष्णुनगर महिला मंडळाची स्थापना करणाऱ्या सौ. मराठेंच्या सूनबाई तर म्हणतात, 'आमच्या सासूबाई म्हणजे उद्योगाची खाण.' कित्येक ऑपरेशन होऊन देखील आळस म्हणून त्यांना ठाऊक नाही. आरती करायची व तबकातील पैसे गरजू माणसाला मदत म्हणून द्यायचे.

मंडळाचा गुरुवारचा बालवर्ग म्हणजे मुंबईच्या 'चिन्मय मिशन'ची ठाण्यातील शाखा. मुलांना वळण लावणे हाच या वर्गाचा मुख्य उद्देश. गरीब मुलांच्या मदतीसाठी त्यांची केव्हाही तयारी. वेळप्रसंगी थोडी झीज सोसून, थोडासा त्रास भोगून त्यांना शिकवायचं, नोकरी लावायची व आपल्या पायावर उभं राहायला समर्थ करायचं.

समाजवादी महिला सभेची स्थापना झाली १९५९ साली. मंडळाच्या अध्यक्षा सौ. सरलाताई कुलकर्णी म्हणतात, 'सामाजिक, आर्थिक, राजकीय व कौटुंबिक पातळीवर समाजात परिवर्तन घडवून आणणे व जागृती करणे हेच आमच्या मंडळाचे ध्येय. या ध्येयाच्या पूर्तीसाठी निरनिराळ्या योजना आम्ही आखल्या व त्यात यशस्वीही झालो. मंडळाने आधुनिक संसारशास्त्राचे शिक्षण देणारे गृहिणी वर्ग चालविणे, तसेच मागासलेल्या व दलित वर्गांतील लोकांची शिबिरे घेऊन त्याद्वारे त्यांना प्रचलित वस्तुस्थितीची जाणीवही करून दिली. अनाथ व अपंगांना कुटुंबकल्याणाकरिता मदत करणे. गरिबांना शिक्षणाच्या मार्गात येणाऱ्या पैशाच्या अडचणी सोडविणे अशीही कामे वारंवार केली जातात. आता तर ३१ ता. पासून ९ ता. पर्यंत त्यांनी महिलांसाठी एक शिबीर भरविले आहे. शिबिराचे वैशिष्टच म्हणजे निरनिराळ्या तज्ज्ञांची त्या त्या विषयावरील व्याख्याने व त्याचा महिलांना होणारा लाभ. त्यांचा हा उपक्रम तर खूपच स्तुत्य वाटला.

हनुमान मंडळाच्या अध्यक्षा सौ. विजयाताई साठे यांनी मॉंटेसरी ते सातवीपर्यंत शाळा चालविली. सुखदा सोसायटीच्या कार्यकर्त्या सौ. बेलुखार यांची संघटक व धाडसी वृत्ती दांडगी यात शंका नाही. गरजू महिलांना उद्योग मिळावा, त्यांची सांस्कृतिक व आर्थिक उन्नती व्हावी म्हणून सारखी धडपड चाललेली असते त्यांची. स्वतःच्या जबाबदारीवर त्या बालमंदिर चालवून मागासवर्गीय मुलांना वळण लावण्याचे कार्यही करीत असतात. ठाणे जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या म्हणून महिला–वर्षात त्यांचा जिल्हा पातळीवर सत्कार झाला तो उगीच नाही.

आणखी महत्वाची व उल्लेखनीय कार्य पार पाडणारी फार पूर्वीपासून कार्य करीत आलेली व आजतागायत अखंड ज्याच्या कार्याचा ओघ सामाजिक उन्नती, महिलांची प्रगती ह्यासाठी चाललेला असतो, अशी मंडळे म्हणजे 'महिला आर्थिक विकास मंडळ' व 'महिला मंडळ.' मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुनंदाताई पाटील यांनी मच्छरदाण्या व बॅचेस तयार करवून घेण्यासारखे कार्य केले, तर 'महिला आर्थिक विकास मंडळा'च्या चेअरमन सौ. विमलाताई रांगणेकर व त्यांच्या कार्याला ओळखत नसणारी एकही महिला ठाण्यात आढळणे कठीण. त्यांची झेपच मुळी उंच. पुरुषाच्या खांद्याला खांदा मिळवून किंबहुना त्यावरचंही एक पाऊल टाकण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा. अनेक मंडळांचा पाया घालून द्यायचा, त्यांना मार्गदर्शन करायचं, मजबूत बनवायचं व दुसऱ्या कार्याकडे वळायचं असा सततचा कार्यक्रम चालू असतो.

अगदी अलीकडे म्हणजे १९७०–७१ सालानंतर स्थापन झालेल्या मंडळांनी पण जुन्या मंडळांच्या प्रमाणेच भरघोस असं कार्य केलं आहे.

१९७१ साली भंडार आळी ह्या विभागात तिळगुळाची देवाणघेवाण करतानाच 'होतकरू महिला मंडळाचा' उदय झाला. रेशनसारख्या सार्वजनिक बाबीपासून तर वैयक्तिक उन्नतीपर्यंतच्या सर्व गोष्टींवर त्या मंडळाने भर दिला. ह्या विभागातील गरजू महिलांना ग्रामोद्योग जीवनात पाठवून छोटे-मोठे उद्योग मिळवून दिले. श्रीमती मृणाल गोरे यांच्या 'भाववाढ विरोधी मोर्चा' ह्या कालमान्य चळवळीत हिरीरीने भाग घेतला. प्रत्येक व्यक्तीतील न्यूनगंडाची भावना घालवून टाकण्यासाठी निरनिराळ्या स्पर्धा, आनंद-बाजारसारख्या गोष्टी आयोजित करून उत्तेजनाकरिता बक्षिसे पण दिली गेली. मंडळाची भरभराट होण्याकरिता मंडळातील भगिनी नेहमीच एकोप्याने व सहकार्याने कार्य करतात. सौ. प्रभाताई चिटणीस व सौ. नीलिमा म्हात्रे या प्रामुख्याने मंडळाचे कार्य करतात.

'सखी–शेजारणी' मंडळाची स्थापना गेल्या ३–४ वर्षांत झाली असली तरी अत्यंत यशस्वीरीत्या ह्या मंडळाचे कार्यक्रम होतात. मंडळाच्या अध्यक्षा सौ. भागवत ह्या आहेत. त्या विभागातील महिलांनी महिन्यातून एकदा एकत्र येऊन विचाराची देवाण-घेवाण करावी, हाचमंडळाचा उद्देश. 'घेयळी' विभागातील हे पहिलेच 'महिला मंडळ'. 'हल्लीचे शिक्षण' या विषयावर पालकांनी प्रश्न लिहून पाठविले व माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापकांनी प्रत्यक्ष येऊन त्या प्रश्नांची उत्तरात्मक चर्चा केली. 'कुटुंब कल्याण' या विषयावर सौ. आशाताई भेंडे यांचे तर 'सिनेसृष्टीचा इतिहास' यावर रणजित बुधकर यांचे मंडळाच्या स्नेहसंमेलनात व्याख्यान झाले. घरगुती विषयापासून तर T. V. सारख्या अत्यंत आधुनिक साधनावर निबंध व वक्तृत्व-स्पर्धा ठेवल्या जातात.

महिला मंडळांचा मुख्य उद्देश असतो की, महिलेचा व पर्यायाने राष्ट्राचा विकास करणे. परंतु राष्ट्रविकासाआधी महत्त्वाची गोष्ट असेल तर राष्ट्र स्वतंत्र असणे, ज्यासाठी टिळक–सावरकर प्रभृतींनी शब्दात टिपता न येण्यासारखा त्याग केला व त्याचे फळ त्यांना मिळाले. पण त्याहूनही मोठा त्याग पुढच्या सर्व पिढ्यांना सातत्याने करावयाचा आहे, तो ते स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी. त्यासाठी शत्रू आपल्याकडे वाकड्या नजरेने बघणार नाही, इतकी सुसज्जता राष्ट्राची सदासर्वकाळ राहिली पाहिजे. सध्याच्या औद्योगिक युगात लष्करातील सैनिकांनी जेवढी तयारी ठेवावयाची तेवढीच किंबहुना त्याहून जास्त तयारी आपल्याला म्हणजेच लक्ष्यकेंद्र असलेल्या शहरांतील नागरिकांना ठेवावयाची आहे.

ही सुसज्जता राखण्यासाठी ठिकठिकाणी नागरी संरक्षण दले स्थापन केली आहेत. दले स्थापन करण्याचे काम जरी सरकारने केले असले तरी स्वयंस्फूर्तीने दलात येऊन संघटनेत मजबुती आणण्याचे व संघटना टिकविण्याचे कार्य करायचे आहे ते आपल्यालाचं. बॉम्ब-हल्ला व त्यामुळे घडून येणारे परिणाम ह्याची झळ स्त्री व पुरुष दोघांना सारखीच लागणार, म्हणून त्यासाठी लागणारे शिक्षण हे पुरुषाइतकेच किंबहुना स्त्रीला जास्त आवश्यक आहे. तांत्रिक ज्ञान व ताकद ह्यांत पुरुषाच्या तुलनेने स्त्री कमी पडत असल्याने तिला संरक्षणाचे तंत्र अवगत असणे आवश्यक आहे.

आणि विशेष म्हणजे वरील बहुतेक सर्व मंडळांतील स्त्रियांनी काळाची गरज ओळखून नागरी संरक्षणाचे कोर्स पूर्ण केलेले आहेत. ह्यात प्रामुख्याने स्त्रियांचा वाटा असलेल्या प्रथमोपचार, समाजकल्याण, सुटका इत्यादी विभागांत ठाण्यातील महिला पुढाकार घेतात. १९७६च्या एप्रिलमध्ये झालेल्या 'अग्निशमन-दिनाच्या दिवशी.' नागरी संरक्षणातील महिलांनी उत्कृष्टरीत्या प्रात्यक्षिके करून दाखविली. नागरी संरक्षणाचा नुसताच कोर्स पूर्ण करून भागत नाही, तर वेळोवेळी त्याचा सराव असणे अत्यंत आवश्यक आहे, अशी जाणीव असल्याने ठाण्यात दर महिन्याला होणाऱ्या मेळाव्यात महिला नेहमीच भाग घेऊन आपल्या कार्याचा सराव ठेवतात.

नागरी संरक्षणाचा नुसताच आणीबाणीच्या काळात उपयोग नसून रोज होणारे अपघात, दुर्घटना इ. वेळी पण त्याचा उपयोग होतो. निरनिराळा क्रीडामहोत्सव, यात्रा इ. वेळी प्रथमोपचार केंद्रे उघडून रुग्णांना प्रथमोपचार देणे व येणाऱ्या मंडळींना फराळाच्या पुड्यांचा पुरवठा करण्याचे कार्यही नागरी संरक्षणातील महिलांनी करून दाखविले आहे. ठाणे जिल्ह्यातील नागरी संरक्षण संघटनेत शे. ६० टक्के महिला आहेत. यावरून इतर चळवळी, सामाजिक व आर्थिक कार्यांबरोबरच संरक्षण विभागातही महिलाच आघाडीवर आहेत, याचा यापेक्षा आणखी कोणता पुरावा असू शकेल.

काही नाटककारांनी 'अति विशाल महिला मंडळ' असे मंडळांचे सामान्यीकरण करून प्रतिमा डागाळली आहे. पण वरील मंडळाच्या कार्याचा विचार करता ठाण्यातील मंडळे त्याला अपवादच ठरतील. महिला मंडळ ही नव्या सामाजिक जीवनाची गरज आहे. आमची मंडळे स्त्री-कर्तृत्वाच्या दिवसांत स्त्रीला व्यापक क्षेत्राकडे नेणाऱ्या प्रशिक्षण शाळा आहेत. मंडळांमुळे आमच्या स्त्रियांत आत्मविश्वास वाढला आहे, धीटपणा आला आहे, संघशक्तीचे सामर्थ्य आले आहे. स्त्री-जीवनाच्या प्रश्नांकडे आम्हाला बघायचंय, आमचे प्रश्न आम्हालाच सोडवायला शिकायचंय. मनोविनोदन, करमणूक ही जशी आमच्या शारीरिक, मानसिक स्वास्थ्याकरिता आवश्यक आहेत, तसंच आमचं सामाजिक जीवन आम्हाला निरोगी करायचंय. आमच्यात शक्ती थोडी कमी असली तरी युक्ती जास्त आहे, हे आम्हाला सिद्ध करायचंय आणि आमची ही सारी स्वप्नं साकार करण्यासाठी आम्ही ध्यास घेतलाय. Female शब्दांतील Fe काढला आणि Woman शब्दांतील Wo काढला तर Male आणि Man शब्दांना काही अर्थ नाही. आम्हीच त्यांचे आधारस्तंभ आहोत, हे आम्ही आमच्या कार्याने दाखवले आहे. □


**अल्प भांडवलात उत्कृष्ट धंदा**

बटाटा वेफर्स बनवून फावल्या वेळात रोज रु. ४०–५० कमवा.

धंद्याच्या सर्व माहितीसाठी व मशिनरीसाठी संपर्क साधा–

**संजय स्टील बिल्डर्स**

**नं. ३, पोस्ट ऑफिस बिल्डिंग, मंगला हायस्कूलजवळ**

**ठाणे (पूर्व) ४०० ६०३**

ह्याखेरीज महिलांचा त्रास वाचविणाऱ्या मशिन्सही उपलब्ध

१. चपातीचे पीठ बनविणारा हँड–मिक्सर

२. हातानी चालवायचे चपाती यंत्र

# स्वरपुष्पांची धुंद उधळण चारुशीला बेलसरे

डॉ. र. म. शेजवलकर

ऑर्केस्ट्रा म्हटलं की माझ्या अंगावर भयानक काटाच उभा राहतो. कारण या वाद्यवृंदात सर्व वादक आपापली वाद्ये मिळवून घेण्याऐवजी फटकून वागण्याकडेच जास्त लक्ष देतात. त्यात गायक-गायिका म्हणजे कहर असतो. बहुधा प्रतिकिशोर अथवा प्रतिमुकेश आणि गायिका या बहुधा प्रतिलताच असतात. या सर्वांचा एकत्रितपणे जो गोंधळ चालतो तो 'ऑर्केस्ट्रा'— मधूनमधून पिटातल्या पब्लिकसाठी मिमिक्री नावाचा पांचटपणाही असतो. मी अजूनपर्यंत जेवढे म्हणून वाद्यवृंद पाहिलेत त्यामधल्या सर्वच्या सर्व प्रतिलतांचे आवाज चढत्या क्रमाने विरुद्ध टोकाचे होते. एक दिवस मात्र एका प्रतिलतेने मला अस्वस्थ केले. जेथे जेथे म्हणून लताबाईंच्या गाण्यावर वर्चस्व दिसून येते त्या जागा अगदी १०० टक्के तशाच्या तशा त्या प्रतिलतेने घेतल्या—रसिक बलमा, भेटीलागी जीवा-गाणी ऐकताना डोळे बंद केल्यास गाणे नक्की कोण म्हणते आहे, याचा संभ्रम व्हावा इतका तंतोतंत स्वर होता. तो — त्या कार्यक्रमानंतर मी तृप्त झालो. आणि मुद्दाम त्या प्रतिलतेची मुलाखत घेतली.

कु. चारुशीला बेलसरे — वय १७–१८ वर्षे, सावळी — ठेंगणी मूर्ती — हसरा चेहरा — या सर्वांमधून प्रतिलतेचे समीकरण जुळवणे सकृद्दर्शनी अशक्य वाटले — पण त्यासाठी कानाचे माध्यम वापरल्यानंतर मात्र या प्रतिलतेची ओळख पटली. वयाच्या सुरुवातीपासून ही दैवी देणगी बाळगत चारुशीलाने आजपर्यंतचा सुरांचा प्रवास केला. वाटेतले अनेक बेसूर पथ्यासारखे दूर सारले. मूळची पुण्याची ही स्वरलता डोंबिवलीमध्ये बहरू लागली आणि ठाण्यामध्ये सध्या ती जास्त जोम धरू लागली आहे. ठाण्याचे वैशिष्ट्य मुळी 'वेड्यांबद्दल' आहे; यात कुणी नाटकाचे वेडे असते, कुणी संगीताचे, कुणी चित्रकलेचे, कुणी काही तर कुणी काही — अनेकजण तर या वेड्यांच्या वेडांचे कौतुक करणारे वेडे आहेत. चारुशीला ही अशीच जन्मतः संगीतवेडी — तिच्या 'सायीला' तिचे आईवडीलही ! कारण वडील तबलापटू आणि आई संगीतविशारद ! एवढी सुरेख साथ मिळाल्यावर चारुशीलाचे संगीत रंगू लागले तर त्याला मणिकांचन योगाशिवाय दुसरे कोठचे नाव द्यायचे ? वयाच्या ६ व्या वर्षापासून चारुशीलाने गायला सुरुवात केली; आणि अनेक प्रगतीचे टप्पे ओलांडत ओलांडत आज एका मान्यवर जागी ती उभी आहे.

सुगम संगीताची जास्त आवड - पुढे हळूहळू शास्त्रीय संगीताचीही गोडी लागली. अर्थात ही फक्त गाण्यापुरती मर्यादित होती. इतके दिवस शास्त्रीय संगीताची नुसतीच आवड होती. आता त्याला श्री. अभ्यंकर यांच्या मार्गदर्शनाची जोडही मिळाली आहे. त्याअगोदर श्री. वसंतराव कुळकर्णी यांचे मार्गदर्शन होते. सुरांची आणि स्वरांची दैवी देणगी विधात्याने इतकी काही मुक्तहस्ते हिच्यावर उधळली आहे की, तिच्या मार्गदर्शकांनासुद्धा तिच्यावर फारसे श्रेय घ्यावे लागत नसतील — स्वरांतल्या गोडव्याने तर नुसत्या ऐकण्यामुळे मधुमेह व्हावा ! स्वर-ताल-लय-शब्दोच्चार या सर्वांचा नैसर्गिक मिलाफ चारुशीलाच्या गाण्यात आहे; भावपूर्ण स्वरांची शब्दफेक, लयकारीची अचूक जाण यांची अप्रतिम साथ तिच्या गाण्याला आहे. समरसता हा तर तिच्या गाण्याचा स्थायीभाव आहे. 'मध्यसप्तकातील काळी चार' पासून तारसप्तकातील षड्जापर्यंत विनासायास सूर खेळतात. गायनातील समरसता दोन्ही तीरांवर सारखीच जाणवते.

वयाच्या १० व्या वर्षी बालमोहन मंदिर येथे झालेल्या तिच्या जाहीर कार्यक्रमात हृदयनाथ मंगेशकरांनी 'बाललता' ही पदवी दिली. त्यानंतरच्या प्रत्येक कार्यक्रमाची घोडदौड कीर्तीची शिखरे काबीज करणारी ठरली. दिल्लीपासून गल्लीपर्यंत प्रत्येक संगीतप्रेमीच्या हृदयात तिने घर केली. आकाशवाणी, दूरचित्रवाणी, सिनेसृष्टी या सर्वांत तिची झपाट्याने प्रगती होत चालली. हिराबाई बडोदेकर, सुधीर फडके, राम कदम, गजाननराव जोशी, गजाननराव वाटवे, व्ही. शांताराम इ. अनेकांच्या शुभेच्छा, सहकार्य वेळोवेळी मिळाले. सुधीर फडक्यांनी 'कार्तिकी' चित्रपटासाठी पार्श्वगायिका म्हणून निवडले; राम कदम यांनी — चंदनाची चोळी, पाचरंगाची पांच पाखरे, बाईने केला सरपंच खुळा या चित्रपटांत पार्श्वगायनाची संधी दिली. आणि या संधीचा पूर्ण फायदा चारुशीलाने घेतला.

गायनातही, फार थोड्या ठिकाणी आढळणारी, विविधता तिने सतत ठेवली. नुसते सिनेसंगीत म्हणजे गाणे नव्हे हे दुर्दैवाने आजच्या अनेक गायिकांच्या लक्षात येऊ शकत नाही, किंवा लक्षात येऊनही भयानक तडजोड या ठिकाणी स्वीकारावी लागते. चारुशीलाने सुगम संगीत विभाग जेवढ्या लीलया हाताळला (किंवा 'स्वराळला' म्हणू हवं तर.), तेवढाच सिनेसंगीत विभाग, तेवढेच नाट्यसंगीत. भक्तिरामायण नावाचा नवा प्रकारही तेवढाच कुशलपणे. आणि आता तर यापेक्षाही तिचे कर्तृत्व दिसले ते तिने स्वतःच दिग्दर्शन केलेल्या आणि गायलेल्या 'गीत मीलन' कार्यक्रमामध्ये. राधाकृष्णाच्या द्वैत-अद्वैतावरील रसाळ काव्यामध्ये (कवी — श्री. पंचवाघ.) तिने भर घातली ती आपल्या अचूक संगीतदिग्दर्शनाने आणि नेहमीच्या मधूर स्वराने ! प्रत्येक गीताची इतकेच नव्हे तर त्यातसुद्धा काही कडव्यांची प्रत्येकी वेगळी चाल बांधणे हे सोपे काम नाही. या कामाचे कौतुकही अनेक ठिकाणी, अनेक वर्तमानपत्रांतून, साप्ताहिकांतून झाले. आणि ते साहजिकच होते. एरवी नेहमी वाद्यवृंदात गाणारी कुणी व्यक्ती असे धाडस करणे निःसंशय कौतुकास्पद होते.

चारुशीलाने तीन संगीतप्रकारांचे टप्पे यशस्वीपणे ओलांडले. सुरुवातीचे 'सुगम संगीत', दुसरे 'लता—कल और आज' या वाद्यवृंदातले तिचे गायन आणि आता तिसरे 'गीत—मीलन.' हे तीनही प्रकार केवळ १७–१८ व्या वर्षी हाताळणे ही सोपी गोष्ट नाही. आणि मला सर्वांत जास्त कौतुक याच गोष्टीचे वाटले. तिने नुसतेच सुगम संगीतावर अथवा 'सिनेगीतांवर' समाधान मानले असते तर फारसे विशेष वाटले नसते. व्यवहाराच्या दृष्टीनेही फारसे चूक नव्हते. पण संगीतात नवेनवे प्रयोग करून पाहणे यात खरे कसब दिसून येते. याचबरोबर तिने, तिच्या आईवडिलांनी शिक्षणाकडेही लक्ष दिले आहे. ही गोष्टही कौतुकास्पद आहे. शास्त्रीय संगीतही तिने सुरू केले आहे. आणि माझी खात्री आहे की एक दिवस ती याही प्रकारात काहीतरी वेगळे करून दाखवील; आणि या संगीतप्रकारामुळे तिच्या इतर कार्यक्रमांनाही वेगळेच महत्त्व प्राप्त होईल. □

हृदयनाथ मंगेशकरांनी

'प्रतिलता'

म्हणून गौरवलेली —

वसंत देसाई, सी. रामचंद्र

ह्यांनी प्रशंसिलेली —

व्ही. शांताराम, सुशीलकुमार शिंदे

आदींच्या कौतुकास, प्रोत्साहनास पात्र झालेली —

नवोदित पण सुविख्यात गायिका

# चारुशीला बेलसरे



## हिचे तीन रसिले कार्यक्रम

☆ लता—कल और आज

☆ सुगम संगीत

☆ गीत मिलन

अधिक चौकशी :— घंटाळी सहनिवास,
ठाणे ४०० ६०२.

## इये मिसाचिये नगरी

पृष्ठ ४–ब वरून

आम्ही सहभागी आहोत.

तात्पर्य बॅ. विठ्ठलराव गाडगीळांनी मुंबईत मोरारजीभाईंनी मुद्दे पाडले, ही थाप मारायला नको होती. 'जशी गाय तसे वासरू' अशी म्हण आहे. बॅ. विठ्ठलराव गाडगीळ यापुढच्या निवडणुकीच्या भाषणांतून जर अशाच थापा मारू लागले तर कै. काकासाहेब गाडगीळही थापा मारणारे असावेत, हा समज वाढीस लागण्याचा धोका संभवतो ! कै. काकासाहेब गाडगीळ प्रतिष्ठा–वाढवण्याचे कार्य बॅरिस्टर-साहेबांना जमत नसेल तर ते इतर कुणी करील, पण निदान अशी 'वंश–सातत्य' या निकषावर होऊ शकणारी वडिलांची अप्रतिष्ठा तरी पुत्राने टाळावी.

काकाऽऽ 'याला' वाचवा !

□

### □ पैल तो गे 'Cow' कोकताहे !

विधान परिषदेचे सभापती वि. स. पागे हे परवा मुंबईला बोलले. ते म्हणाले,

'पुनः आणीबाणी आणणार का ?' असा प्रश्न विरोधी पक्ष जनतेला विचारीत आहे. या विरोधकांना कॉंग्रेसजनांनी निर्धाराने सांगावे की, तुम्ही पुनः जनजीवन विस्कळीत करणार का ? तसेच जर होणार असेल तर; पुनः आणीबाणी जरूर येईल.'

श्री. पागे म्हणतात तसा प्रश्न कुणी विचारीत असेल, असे आम्हाला वाटत नाही. कारण आणीबाणी गेलेलीच नसल्याने ती पुनः आणण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही ! श्री. पागेमहोदयांना आणीबाणी रद्द झाल्याची सुवार्ता कधी कळली ? आम्हा पामरांना ती अजून कळलेली नाही. तेव्हा आणीबाणी आहेच. आणीबाणी रद्द झाली असती तर कारागृहात खितपत पडलेल्या निरपराध्यांनी सरकारला कोर्टात खेचून एव्हाना सरकारच्या बुद्धीचे तीन–तेरा नसते का केले ? काही लोकांना, म्हणजे जनजीवन विस्कळीत करू पाहणाऱ्यांनाच तूर्त पॅरोलवर सोडलेले आहे. ज्यांना काही दिवस जरी सोडले, तरी 'गाय–वासरे' उधळतील, असा धोका सरकारला वाटतो, त्या रा. स्व. संघीयांना सरकारने सोडलेले नाही. त्यांना पकडताना सरकारने कारण दिले की, 'कबूल करीत नसले तरी ती राजकीय संघटनाच आहे व ती जनसंघाचे काम करते.' गुबुगुबु ! आता इंदिराजी म्हणतात की, 'रा. स्व. संघावरील बंदी उठवत नाही. कारण ती काही राजकीय संघटना नाही !' गुबु गुबू ! ते असो. तुरुंगातून सुटलेले सर्व राजबंदी जाहीर सभांत सांगत आहेत की, २० मार्चनंतर शिथिल केलेली आणीबाणी पुनः पूर्ववत करून, आम्हाला तुरुंगात डांबण्यात येणार आहे, याची आम्हाला कल्पना आहे. दुर्गाबाई भागवतांनी पुण्याच्या अनेक सभांतून ही गोष्ट हजारो श्रोत्यांना कळवलेली आहे. त्या पुढे असेही म्हणाल्या –

'गाय–वासरू हे हिंदू धर्मात मंगल चिन्ह मानले जाते, पण ही गाय मारकी आहे आणि तिचे वासरू अपरिपक्व आणि उद्दाम आहे ! जनावराला मत द्यायचे की 'माणसाला' तुम्हीच विचार करून ठरवा.

पवित्र गोमातेला शिथिल आणीबाणीतून तुरुंगाबाहेर आलेल्या दुर्गाबाई 'जनावर' म्हणतात, हे ऐकून मुळातली मारकी गाय अधिक शिंगे रोखल्याशिवाय राहील काय ? यात गाईची काय बरे चूक ? गाय संतापली आहे, शिंगे रोखून उभी आहे, पुढचा 'शकून' आजच सांगते आहे. गाईचे बलदंड गुराखी दंडुके आपटून इशारे देत आहेत, तिकडे जनजीवन विस्कळित करणाऱ्यांनी दुर्लक्ष करू नये. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत आम्ही एकच सांगतो–

पैल तो गे Cow कोकताहे
शकून गे बाये, सांगताहे !
हुऽ हुड गे Cow
तुझे सोन्याने मढवीन 'भाऊ'
'कोंडवाडी' आता मजला
कोण घालताहे ?
पैल तो गे Cow कोकताहे ??

□

## चक्रम् चक्री गिरकी तिसरी

दीर्घस्मृति विश्वनाथ.

निवडणुकांची दंगल रंगायला लागली बरं का !

पण पूर्वीसारखी पेच टाकणारी भाषणे आणि उत्तरा–प्रत्युत्तरांच्या फैरी आता झडत नाहीत. सत्तावनच्या निवडणुकीतली अत्रे – चव्हाणांची जुगलबंदी आठवते का ? तेव्हा संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न होता आणि 'मुंबईसह संयुक्तमहाराष्ट्र झालाच पाहिजे' अशी विरोधी पक्षांची घोषणा होती. तेव्हा चव्हाण– म्हणजे यशवंतराव बरं का – म्हणाले, 'संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे हे म्हणणे ठीक आहे. झालाच पाहिजे –असं कशाला ? 'त्या 'च' ने मने दुखावतात.' तेव्हा आचार्य अत्रे दुसऱ्या दिवशी भाषणात म्हणाले, 'त्या 'च' त तर खरा खटका आहे. चव्हाणांनी त्यांच्या नावातला 'च' काढून टाकावा बरं, म्हणजे त्यांची खरी किंमत लोकांना कळेल आणि 'च' ची किंमत त्यांना !'

एक्काहत्तरच्या निवडणुकीत विठ्ठलराव गाडगीळ आणि जगन्नाथराव जोशी यांचा कलगी–तुरा असाच रंगून गेला. विठ्ठलराव म्हणाले होते, 'जनसंघात फक्त एक अटलजी, बाकी सारे झटलजी.' तेव्हा जगन्नाथराव म्हणाले, 'कांग्रेसमध्ये तरी काय, एक गाय, बाकी सारे बछडे; एक बाय, बाकी सारे...' जगन्नाथरावांनी वाक्य पुरे केले नाही, पण काय ते सगळ्यांना कळले होते. परदेशी निवडणुकांतसुद्धा असे फटाके उडत असतील नाही ?

तर ! इंग्लंडचा एक जुना पंतप्रधान लॉइड जॉर्ज तर अशा नळे-चंद्रज्योती शिलगावण्यासाठी फार प्रसिद्ध होता. तो एका भाषणात म्हणत होता 'There must be home-rule in wales, home-rule in Scotland...' तेव्हा एक ऐकणारा ओरडून

म्हणाला, ' Let there be home-rule in hell. ' लॉईड जॉर्ज ताबडतोब म्हणाला, ' Of course ! Let each one speak for one's own country ! '.

पण यंदाच्या निवडणुकीत अशी काही आतषबाजी पाहायला, मिळेल असे वाटत नाही.

का बरं ?

आपला बाहेरख्यालीपणा लपविण्यासाठी गरिबाच्या मुलीशी लग्न करायचं; तिला अन्नाला लावल्याचे उपकार केल्याची शेखी मिरवायची आणि वर तिला पातिव्रत्याचा उपदेश करायचा, असं शहाजोग वर्तन करणारे शेठसावकार अव्वल इंग्रजीत असत. आपल्या राजकर्त्यांचे विरोधी पक्षाशी वर्तन तसंच आहे.

ते कसं ?

पाहा कसं ते. कार्यकर्त्यांना तुरुंगात डांबायचं, वर्तमानपत्रांवर निर्बंध घालायचे, न्यायालयांचे अधिकार कमी करायचे; हा सर्व लोकशाहीविरोधी कारभार लपविण्यासाठी विरोधी पक्ष कमतानद झाले आहेत असं पाहून निवडणुका घ्यायच्या; विरोधी पक्षांना निवडणूक लढविण्याची संधी दिल्याची शेखी मिरवायची आणि शेवटी आता तरी वर्तन सुधारा नाही तर आणीबाणीचा गळफास आवळेल अशी धमकी द्यायची ! अशा स्थितीत निवडणुका खेळीमेळीने होणार कशा ? आणि कडवट व दहशतीच्या वातावरणात झालेल्या निवडणुकात कोट्या-प्रतिकोट्यांच्या फैरी झडणार कशा ? गोळी घालण्याच्या लायकीच्या विरोधी पक्षांना आम्ही निवडणुका लढवायला देत आहोत, अशी उर्मट भाषा बोलणाऱ्यांनी लोकशाही निष्ठेचा टेंभा मिरवावा ही उन्मत्तांची शिरजोरी तरी आहे किंवा धूर्तांचे कपट तरी आहे. परवाचे शंकररावांचे भाषण ऐकलेत ना ?

परवाच्या शनिवारवाड्याच्या सभेत सगळ्यांनीच ताळ सोडला होता असे म्हटले पाहिजे. यशवंतरावांच्या नेतृत्वाला सुरुंग लावल्यापासून शंकरररावांची जबाबदारी वाढली आहे. अहो, माणसानं लक्ष तरी कुठे कुठे ठेवायचं ? बाईंचा सासुरवास, संजयचं बारीक लक्ष, रजनी पटेलांचे टोमणे, वसंतरावदादांचे धुमसते निखारे, या सगळ्या गोष्टी सांभाळायच्या आणि वर काँग्रेसच्या निवडणूक प्रचाराचे जू मानेवर बाळगायचे! शिवलीलामृताची कितीही पारायणे केली तरी समाधान वाटेल का अशा स्थितीत ? गेले असतील चार अधिक आगळे शब्द तोंडातून. मागून केली ना त्यांनी सारवासारव ?

पण शंकरराव काय म्हणाले, माहीत आहे ना ? ते म्हणाले, ' विरोधक म्हणतात, ' आम्हाला तुरुंगात घातले. ' बेशक तुरुंगात घालू. दुसऱ्या देशात गोळ्याच घातल्या गेल्या असत्या. ' म्हणजे, लोकांना विनाचौकशी बंदीत टाकावे लागले याची काडीइतकी खंत यांना वाटत नाही. मी म्हणतो, भले विरोधकांची चूक होती असे धरून चालू, तरी जे काही करण्याची पाळी आपल्यावर आली त्याची रुखरुख किंवा त्याबद्दल उद्वेग वाटावा की नाही ? बापाने मुलाला मुलाच्या भल्यासाठी मारले तरी मारावे लागले याची हळहळ बापांना वाटतेच ना ? पण काँग्रेसवाले विरोधकांना वैरीच समजत असतील आणि त्यांची पाळेमुळे खणून टाकण्यातच आपल्या राज्यकारभाराची इतिकर्तव्यता मानत असतील, तर शंकररावांच्या भाषणातला विचार त्यांच्या भावनेशी सुसंगतच म्हटला पाहिजे. अशा पक्षालाही ' निवडणुका खेळण्याचा ' उपदेश करणाऱ्या विनोबांच्या सर्वोदयी चिकाटीचे मात्र कौतुक वाटते. ' खळांची व्यंकटी सांडो ' असे मागणाऱ्या ज्ञानदेवांची परंपराच त्यांनी चालवली.

पण काँग्रेसवाले शत्रुत्व तरी कोणाकोणाशी करणार आहेत ? त्यांच्या शत्रूंची संख्या दर दिवशी वाढतच आहे. परवापर्यंत कम्युनिस्ट त्यांचे भाउबंद होते. बाईंच्या एका भाषणासरशी मोहरा फिरला. कम्युनिस्टांच्या गेल्या पस्तीस वर्षांतल्या कुकृत्यांची कहाणी रच. ण्यात समाचारच्या संशोधकांच्या डोळ्यांची राखुंडी झाली. कालपर्यंत जगजीवनरामजी मान्यवर पुढारी होते. खुद्द बाईंनी त्यांचे नाव राष्ट्रपतिपदासाठी सुचवले होते., काँग्रेसपक्ष ७१ च्या निवडणुकीत सौभाग्यवतीने कपाळावर कुंकू मिरवावे त्याप्रमाणे त्यांचे नाव आपल्या नावात गुंफून मिरवत होता. आज असे ठरले की, त्यांची काँग्रेसनिष्ठा फक्त स्किन-डीप होती. विजयालक्ष्मी पंडितांना तर केवढी प्रतिष्ठा होती. नेहरू वारल्यावर त्यांच्या मतदार संघात त्यांच्या वारस म्हणून विजयालक्ष्मींना काँग्रेसने उभे केले होते– इंदिराबाईंना नाही. पण आता पुण्याचा ' केसरी ' म्हणतो की, त्या मत्सरग्रस्त व्यक्ती आहेत.

' केसरी 'ची गोष्टच सोडा हो. काँग्रेसच्या गोठ्यात बांधले गेल्यापासून ' केसरी 'चे बेलवांगे झाले आहे. परवाच्या सभेत जयंतरावांनी रामाच्या ' मर्यादा पुरुषोत्तम ' त्याबद्दल केलेले चुकीचे भाष्य तुमच्या ध्यानात आलेच असेल.

नाही. काय म्हणाले जयंतराव ?

धारियांना उद्देशून जयंतराव म्हणाले, " कार्यकर्त्याने महत्त्वाकांक्षी असावे. पण त्यालाही मर्यादा असतात. प्रभू रामचंद्रसुद्धा मर्यादा पुरुपोत्तम होते. म्हणजे जयंतरावांना म्हणायचं होतं की, रामाच्या पुरुपोत्तम त्वालाही मर्यादा होत्या: जणू काही मर्यादित असायला रामाचं पौरुष म्हणजे केसरीतून पाजलेला दहावीच्या संस्कृतचा घोटच होता! वास्तविक राम हा मर्यादारक्षक-म्हणजे समाजातील शिष्टाचारांचे रक्षण करणारा– पुरुषोत्तम होता. असा ' मर्यादा पुरुषोत्तमा 'चा अर्थ आहे.

शंकररावांनी गरिबांविषयी कोण कळवळा दाखवला. ते म्हणाले, 'इथे मी गरिबाला झोपडी कधी मिळेल, जमिनीचा तुकडा कसा मिळेल याची काळजी करतो आहे आणि तिकडे जनतापक्षवाले मालमत्तेचा अधिकार नाहीसा करून गरिबांची मालमत्ता हिरावून घेणार आहेत ! '

एकूणसत्तर साली मुंबईला भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात यशवंतरावांनी मावळत्या सूर्याला साक्ष ठेवून समाजवादाची शपथ घेतली. त्यावेळी केलेल्या भाषणात यशवंतरावांनी मालमत्तेचा मूलभूत हक्क आणि कायदेशीर हक्क यात भेद केला होता आणि मालमत्तेचा मूलभूत हक्क रद्द करण्यास हरकत नसावी, असे दर्शविले होते. त्यावेळी वसंतरावांचे मुख्यमंत्रिपद आपल्याला कसे मिळेल, या चिंतेत शंकररावजी मग्न होते. त्यामुळे यशवंतरावांचे व्याख्यान त्यांना खटकले नाही.

किंवा आता ते यशवंतरावांना आपले नेते मानत नसल्याने यशवंतरावांची व्याख्याने विसरून गेले असतील.

माणूस मंत्री झाला की, त्याला मालमत्ता

सुचायला लागते. आपल्या वसंतराव नाइकांनी पुसदला राहून करता यावा म्हणून पुण्याजवळ मळा घेतला; वसंतरावदादांनी ' मराठी माणसाने मुंबईत वतनवाडी करावी ', असे सांगितलेच होते. तेव्हा शंकररावांना मालमत्तेचे आकर्षण असावे हे ठीक आहे. पण हक्काचा हा कळवळा त्यांना कधीपासून आला ?

तर काय ! आणीबाणी लागू केल्यावर एकामागून एक, सगळे मूलभूत हक्क रद्द करण्यात आले. ' अ 'ला पकडायच्या ऐवजी पोलिसांनी ' ब 'ला पकडले तर कोर्टाकडे दाद मागण्याचा अधिकार सुद्धा रद्द करण्यात आला. आपले अॅडव्होकेट जनरल निरेन डे यांनी सुप्रीम कोर्टात सांगितले की, चुकीने पकडलेच काय पण गोळी घालून ठार केले तरी देखील कोर्टात जाता येणार नाही. ' आता प्रत्यक्षात असे होणार नाही हे खरे, पण तत्त्वत: माणसाला जीविताचा सुद्धा अधिकार आता उरला नाही, हे डेंच्या म्हणण्यावरून स्पष्ट आहे आणि अशा स्थितीत शंकरराव मालमत्तेच्या हक्कासाठी उभे राहतात म्हणजे विनोद आहे की नाही ?

बरं ! थोरात काय म्हणाले ?

हा लढा लोकशाही की स्वैराचार असा आहे.

हो. पण काँग्रेसवाले प्रत्येक लोकशाही चळवळीला स्वैराचार समजतात आणि स्वतःच्या बेलवाम कारभाराची लोकशाहीचा आदर्श म्हणून भलावण करतात त्याला काय करणार ? प्रत्येक समंजस माणसाच्या दृष्टीने ही गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट आहे की, गेल्या आठ वर्षांत काँग्रेस पक्षातली मोकळी चर्चा नष्ट झाली, नंतर न्यायालयांची कवचकुंडलं कातरली गेली, संसदसदस्यांचे स्वातंत्र्य गेले आणि वर्तमानपत्रांवर सेन्सॉरची मगरमिठी बसून माणूस आणि मुस्की बांधलेला बैल यात फरक उरला नाही. त्यामुळे सध्याच्या निवडणुका न राहता एकाधिकारशाही आणि लोकशाही, हुकुमाशी बांधिलकी आणि मोकळी चर्चा, दहशतवाद आणि मुक्त शासन या दोन टोकांच्या तत्त्वांतली रस्सीखेच झाल्या आहेत. □

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २६।२।७७ ते ४।३।७७

### काँग्रेस–युवक काँग्रेस–अंतस्थ असंतोषाचा स्फोट

यावेळी रवी कुंभ राशीत असून मंगळ देखील त्याला येऊन भेटला आहे. रवी हा राजकारणाचा कारक ग्रह आहे तर मंगळ सत्तालोभाचा कारक ग्रह आहे. हे दोन ग्रह एकमेकांचे मित्र नाहीत, तसेच शनीबरोबर देखील त्यांचा षडाष्टक आहे. मकर राशीच्या दुसऱ्या स्थानातील या दोन ग्रहांचे अस्तित्व भारताच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाला खूपच उपकारक ठरणार आहे. पाश्चात्य जगात प्रामुख्याने अमेरिका व इंग्लंड येथे भारताच्या अनुकूल वातावरण होऊ लागणार आहे. इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण, मोरारजी देसाई, अटल बिहारी बाजपेयी, मधू लिमये, जगजीवनराम यांच्या नावाची बरीच चांगली चर्चा सुरू होणार आहे. निवडणुकीच्या यशापयशाचे अंदाज बांधले जातील. अंतर्गत राजकारणात त्याचा थोडा फार अनुकूल परिणाम होऊ लागणार आहे. निवडणुकीचे वातावरण आरोप–प्रत्यारोपांनी तापले तरी देखील आणीबाणी, संघटनेवरील बंदी, वृत्तपत्रांवरील सेन्सॉरशिप इत्यादी बंधनांना शिथिल करण्याचा विचार सरकारच्या मनात निर्माण होणार आहे. कदाचित येऊ लागेल. काँग्रेस व युवक काँग्रेस ' एकसंघ ' असल्याचा जरी निर्वाळा देण्यात आला तरी काँग्रेसच्या शत्रुस्थानी असलेले रवी–मंगळ या दोघांतील अंतर बरेच रुंद करणार आहे, असे एकंदर ग्रहमान असावे.

---

### मेष : परिश्रमाचे चीज

दुसरा चंद्र व गुरू, तसेच अकरावा रवी, दहावा मंगळ असे अनेक ग्रह यावेळी तुम्हाला अनुकूल आहेत. व्यापारी असाल किंवा व्यापार करावयाचा असेल तर, एकदम पैसा मिळण्याचा योग आहे. सोने–चांदी तेजीत राहून तुम्हाला त्यात देखील फायदा मिळू शकेल. नोकरीच्या दृष्टीने राशिस्वामी मंगळ मकर राशीत उच्चीचा, ही एकच गोष्ट तुमच्या महत्त्वाकांक्षा सफल व्हायला पुरेशी आहे. तुम्ही एकदम वरिष्ठ श्रेणीत गणले जाणार आहात. इंजिनीयर, वकील, रेव्हिन्यू खात्यातील वरिष्ठ अधिकारी यांना आठवडा फारच उत्तम आहे. पोलीस खात्यातील या राशीच्या लोकांचे परिश्रम केल्याचे चीज होणार आहे. उद्योगांच्या बाबतीत तुम्हाला नोकराचा मालक होण्याची संधी आहे. रेसकॉर्सवर नशिबाची परीक्षा पाहायला हरकत नाही. शुभ दिनांक २५–२८.

**महिलांना :** गुरूची कृपा आहे. पैशाची अडचण भासणार नाही.

**विद्यार्थ्यांना :** आळस व विस्मृती दूर होईल.

### वृषभ : बरीच अनुकूलता

केतू व गुरू बारावा होता, त्यांपैकी गुरू पहिला झाला आहे. आता केतूची अगर राहूची भीती बाळगू नका. मन प्रसन्न राहील. सात्त्विक वृत्तीचा प्रादुर्भाव होईल. विरोधकांना देखील आपुलकीने वागवाल. हा आठवडा फार वाईट नाही. फार अनुकूल आहे असे नाही. तरी पण दहावा रवी–बुध तुमची आर्थिक गरज भागवणार आहे. अनेक दिवस रेंगाळत पडलेली कामे सहज पुरी होतील जमिनीची कामे होतील. प्लॉट अगर फ्लॅट खरेदी करू शकाल. तुम्ही जर एखादा नाट्यप्रयोग वा सिनेमा–शो घेण्याचे ठरवले तर फायदा होईल. नोकरीत सारे काही अनुकूल घडणार आहे. वरिष्ठांच्या मनात सहानुभूती निर्माण होईल. त्यांच्या मनात तुमच्या कर्तृत्वाबद्दल चांगले मत होईल. आर्थिक बाजू गेल्या काही दिवसांत सुधारत आहे. त्याला वेग येईल. जुने येणे वसूल होईल. बेकारांना शुभवार्ता कळेल. पत्रव्यवहारातील लोकांना चांगले दिवस येतील. शुभ दिनांक २७–२८.

**महिलांना :** माहेरचा प्रवास घडेल. मंगलकार्यात मोठेपणा मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** सर्व अडचणींवर मात कराल.

### मिथुन : डोके शांत ठेवा

गुरू भावनेचे नियंत्रण करतो, म्हणून माणसाला स्थिर राहाण्यासाठी त्याच्या

अनुकूलतेची जरूरी आहे. पण यावेळी तुम्हाला गुरूची कृपा मिळणार नाही, कारण तो बारावा झाला आहे. म्हणूनच डोके शांत ठेवण्याची गरज भासेल. तुम्हाला अजून काही काळ तरी परिस्थिती अनुकूल येणार नाही. साडेसाती आहे. यासाठी शुक्रवारचा उपवास करून रात्री जेवण करा. कुलदैवताची मनोभावे उपासना करा म्हणजे या दिवसातून देखील तुम्ही व्यवस्थित पार पडाल. तुम्ही लेखक असाल तर यावेळी तुमची प्रतिभा आटल्यासारखी होणार आहे. त्यासाठी जी एकतानता लागते ती जरा मिळणे कठीण होणार आहे. आर्थिक परिस्थितीची काळजी सतत मन ग्रस्त ठेवील. पण प्रत्यक्ष तुम्हाला मदत होईल. प्रतिष्ठा पणाला लागणार नाही. ज्यांना उपकाराखाली तुम्ही ठेवले होते तेच तुमची मजा पाहतील. नोकरीत वरिष्ठांबरोबर मतभेद वाढवू नका. ते उगाचच बोलत राहतील, पण तिकडे दुर्लक्ष करा. कौटुंबिक सुख मात्र मिळेल. शुभ दिनांक ३-४.

महिलांना : मानसिक काळजी सोडून द्या. ईश्वरी कृपेने सारे ठीक होईल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात खूप श्रम करावे लागतील.

**कर्क : लॉटरीत लाभ**

शनी-मंगळाचा प्रतियोग आहे. त्याचप्रमाणे शनी-रवीचा षडाष्टक योग देखील सध्या आहे. तुमच्या यशाची सारी सूत्रे गुरूच्या हाती आहेत. गुरू गेल्याच आठवड्यात अकरावा झाला आहे. यावेळी तुमची क्रयशक्ती वाढणार आहे. तुम्हाला रेसमध्ये अगर लॉटरीमध्ये पैसे मिळण्याचा संभव आहे. तुमचे जन्मस्थ ग्रह जर उच्च असतील तर तुमच्या नशिबाचे वारे आता वैभवाच्या दिशेने वाहणार आहेत, यात शंका नको. निराशा, उदासीनता इत्यादी गोष्टी आता इतिहासजमा होणार आहेत. तुम्ही मनात ठरवलेल्या योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. नोकरीधंद्याची परिस्थिती बरीच समाधानकारक राहील. वाहनाचा तुम्हाला यावेळी योग दिसत आहे. शुभ दिनांक २७–१.

**महिलांना** : अपेक्षापूर्तीचा आनंद मिळणार आहे. नोकरीत मनोरथ पुरे होतील.

**विद्यार्थ्यांना** : केलेल्या अभ्यासाचे फळ मिळणार आहे.

**सिंह : यशाची चाहूल**

बारावा शनी व साडेसाती यामुळे तुम्ही अगदी घाबरून गेला होता. परंतु साडेसातीत सारे काही वाईटच घडत नाही, याचा तुमच्या बाबतीत प्रत्यय आला आहे. गेल्याच आठवड्यात गुरू दहावा अनुकूल दृष्टीत आला आहे. आता तुमच्या नशिबाचे फासे अनुकूल काळाच्या बाजूने पडणार आहेत. बाराव्या शनीची आता तुम्ही मुळीच भीती बाळगू नका. त्याचे मन देखील आता तुम्हाला अनुकूल असे झाले आहे. राशिस्वामी रवी चंद्रासमोर आहे तर मंगळ शत्रूंची सारी स्वप्ने धुळीस मिळवणार आहे. यावेळी धूर्तपणे जे जे डावपेच लढवाल ते ते यश घेऊन येणार आहेत. प्रतिष्ठा वाढणार आहे. सार्वजनिक कार्यात लोकप्रियता मिळणार आहे. राजकारणात वरचष्मा राहणार आहे. नोकरीत अधिकार वाढणार आहेत. शुभ दिनांक २८, २.

**महिलांना** : नोकरीत प्रमोशन मिळेल.

**विद्यार्थ्यांना** : शैक्षणिक श्रमाचे चीज होईल.

**कन्या : महत्त्व वाढेल**

गेल्याच आठवड्यात गुरू भाग्यस्थानी आल्यापासून तुमच्या नशिबाची प्रगतीची दारे मोकळी झाली आहेत. गुरूची कृपा म्हणजे सारी स्वप्ने व साऱ्या आशाआकांक्षा सफलतेचा एक प्रकारे उत्कर्षच होय. मनातील शंका-कुशंका काढून टाका आणि जे व्हावे असे वाटते ते मागा. नोकरीत यावेळी वारे तुमच्या बाजूने वाहणार आहेत. तुम्हाला अनुकूल असे अनेक महत्त्वाचे निर्णय लागतील. प्राप्तीत वाढ होईल. कर्जाचे ओझे कमी होऊ लागेल. दुय्यम धंदा भरभराटीला येईल. मन प्रसन्न राहील. हाती घेतलेले काम पुरे होण्यासाठी जो उत्साह हवा तो राहील. तुमचा भाव वाढेल. प्रवासाचा बेत सफल होईल. संसारात मन रमेल. तुमच्यापैकी जे विवाहाच्या प्रयत्नात असतील त्यांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक २६, २८.

**महिलांना** : सर्व प्रकारचा शारीरिक त्रास कमी होईल.

**विद्यार्थ्यांना** : मन प्रसन्न राहून अभ्यास होईल.

**तूळ : धाडस नको**

रवी कुंभ राशीत आहे, ही उत्तम गोष्ट आहे. रवी यशाची ग्वाही देतो व प्रभाव वाढवतो. मात्र जे काही तुम्ही करायचे ठरवत असाल ते याच आठवड्यात करून घ्या. आता गुरू आठवा झाला आहे. तो असावा एवढा अनुकूल नाही. जे जे मिळवायचे असेल ते झगडा करूनच मिळवावे लागेल. स्थावर इस्टेटीचा तंटा मात्र तडजोडीने मिटण्याची शक्यता आहे. वाहनखरेदीचा योग आहे. लॉटरी व रेस या मार्गाने आर्थिक बाजू भक्कम होऊ शकेल. लेखनात अडथळे येऊ शकतील. प्रतिभेचा साक्षात्कार होऊन हातून लेखन होणे कठीण आहे. सहकारी-मित्र यांच्यात व तुमच्यात थोडाफार दुरावा निर्माण होण्याचा संभव आहे. तरी पण रवी-मंगळाची अनुकूलता या




सर्वांतून तुमचे यश तुमच्या पदरात घालील. शुभदिनांक २८, २.

महिलांना : भरतकाम, विणकाम वा इतर कलाक्षेत्रांत प्रगती होईल.

विद्यार्थ्यांना : संशोधनासाठी नवे क्षेत्र लाभेल.

**वृश्चिक : स्थावराची प्राप्ती**

तिसरा मंगळ राशीचा स्वामी असून तो उच्चक्षेत्री आहे. तो तुमच्या कर्तबगारीला बहर आणणार आहे. तुम्ही ज्या क्षेत्रात काम करता तेथे झालेली कोंडी तो कमी करणार आहे. तुमच्या गुणांना वाव मिळणार आहे. तुम्ही नोकरीत सध्या ज्या स्थितीत आहात ती स्थिती निश्चितपणे बदलून चांगली येणार आहे. सार्वजनिक क्षेत्रात जे काम करीत आहेत ते लोकादरास पात्र ठरणार आहेत. बेकारांना इतके दिवस नुसतेच आश्वासन मिळत होते, पण आता प्रत्यक्ष काही तरी पदरात पडणार आहे. तुमचे स्थावराचे काम यावेळी पुरे होईल. वारसासंबंधीचे वाद निकाली निघून तुम्हाला थोडीफार स्थावराची प्राप्ती होणार आहे. राहू बारावा आहे. त्यामुळे खर्चाची नवी नवी प्रकरणे उद्‌भवली तर आश्चर्य मानू नये. परंतु पैसा मिळून खर्च होईल. गुरू अनुकूल आहे. त्यामुळे संसारात गोडवा राहील. शुभदिनांक २६, २८.

महिलांना : विवाहेच्छू कुमारिकांना बरीच अनुकूलता आहे.

विद्यार्थ्यांना : डोक्यात भडकपणा येऊ देऊ नका.

**धनू : अनुकूल काळ**

राशिस्वामी गुरू सहावा झाला आहे. तो गुप्त–शत्रुत्वातील कडवटपणा बराच कमी करणार आहे. या गुरूची तुमची दोस्ती राहीलच. उपासना किंवा अध्यात्मिक भावना यासाठी याचा व्हावा तेवढा उपयोग होणार नसला तरी इतर प्रसिद्धीच्या दृष्टीने हा गुरू तुम्हाला खूपच साहाय्यकारी होणार आहे. शिवाय गुरू–मंगळाचा त्रिकोणयोग देखील आहे. त्यामुळे परिस्थितीत अनुकूल बदल होणार आहे. नोकरीत तुमचे स्थान उंचावणार आहे. प्रतिष्ठा वाढणार आहे. मालक–वरिष्ठ अधिकारी यांच्याशी आपुलकीचे संबंध येणार आहेत. प्राप्तीत भर पडणार आहे. चालू धंद्यात बदल करून काही नवे घडवायला काळाची अनुकूलता आहे. प्रवासाचा बेत अचानक ठरेल. ऑफिसच्या खर्चाने एखादा महत्त्वाचा प्रवास होईल. दुय्यम धंद्याची स्थिती समाधानकारक राहील. सांसारिक जीवनात अनुकूल स्थित्यंतर घडेल. शुभदिनांक १–२.

महिलांना : घरगुती जीवनात प्रेम व आपुलकीचा प्रत्यय येईल.

विद्यार्थ्यांना : अभ्यासात अडथळे येणार नाहीत.

**मकर : हेतुपूर्तीचा आनंद**

राशिस्वामी चंद्रासमोर आहे, तर राशीतच मंगळ उच्चक्षेत्री असून त्याचा शनीबरोबर प्रतियोग झाला आहे. तुम्ही हुशार आहात. पण तुमची बुद्धी अनेकदा सरळ मार्ग सोडून आडमार्गाने धावत जाते. त्याला गुरूच्या बदलामुळे बराच आळा बसणार आहे. गुरू पाचवा झाला आहे. मन बदलेल. इतरांच्याबद्दल मनात आपुलकी निर्माण होईल. नोकरी-धंदा-व्यवसाय-सार्वजनिक कार्य आता नियमाच्या चौकटीत येण्याची शक्यता आहे. नोकरीत तुमच्या मागण्या सहानुभूतीने स्वीकारल्या जातील. हाती घेतलेले काम पार पडेल. मनातले हेतू पुरे होतील. प्राप्ती वाढेल. धंद्यात नवे भांडवल गुंतवू शकाल. गुंतवलेल्या भांडवलाचे चीज होईल. व्यापारवृद्धी होणार आहे. मंदीच्या वातावरणातून व्यापार बाहेर पडणार आहे. गिऱ्हाईक वाढेल. उधारीचा व्यवहार आटोक्यात येऊन पैसा वसूल होईल. तब्येत सुधारेल. शुभदिनांक २–३.

महिलांना : गुरूचा झालेला बदल तब्येतीच्या दृष्टीने बराच अनुकूल ठरेल.

विद्यार्थ्यांना : अनपेक्षित मोठे यश पदरात पडणार आहे.

**कुंभ : अडचणींवर मात**

गेल्याच आठवड्यात गुरू चौथा झाला आहे. तिसऱ्या गुरूपेक्षा काही हा गुरू फारसा लाभदायक नसला तरी देखील त्याची फळे अनुकूल मिळणार आहेत. स्थावराची प्राप्ती हे तुमचे ध्येय साध्य होईल. लोकांत प्रतिष्ठा उंचावेल. लोकप्रियता वाढेल. तुम्ही जर निवडणुकीला उभे असाल तर तुम्हाला खूपच अनुकूल आहेत. राशीत रवीसारखा राजकारणी ग्रह आहे. तो तुमच्या साऱ्या अडचणी दूर करणार आहे. आत्मविश्वास वाढणार आहे. नोकरीत बरेच स्थित्यंतर घडेल. ज्या पदाची किंवा जे तुम्हाला हवे होते, ते मिळण्याची परिस्थिती निर्माण होणार आहे. यावेळी धूर्तपणे व कौशल्याने पावले टाकलीत तर तुमचे काम सफल होणार आहे. तुमच्याभोवती गेले कित्येक दिवस अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत त्या सर्व अडचणींवर यावेळी तुम्ही मात करणार आहात. तुम्ही राजकारणात हवे ते साध्य करणार आहात. व्यापारात–शेअर्सच्या उलाढालीत मोठा लाभ पदरात पडणार आहे. अपयश, निरुत्साह आता संपला आहे. शुभदिनांक २८–२.

महिलांना : मनातील संशय दूर होऊन उत्साहाने कोणतेही कार्य पार पडेल.

विद्यार्थ्यांना : निराशा दूर होईल. अडचणी संपतील.

**मीन : लेखकांना शुभदायक**


राशिस्वामी गुरू गेल्याच आठवड्यात वृषभ या शुक्राच्या राशीत दाखल झालेला आहे. हा तिसरा गुरू हेच तुमचे यश आहे. तुमची वृत्ती रसिक आहे. अध्यात्माकडे तुमचा ओढा आहे. गुरू तुमची इच्छा पुरी करणार आहे. तुम्ही लेखक असाल तर तुमच्या लेखनाला खूपच वाव मिळणार आहे. नवे क्षेत्र उपलब्ध होणार आहे. प्रतिभा जागृत होऊन हातून परिणामकारक लेखन होईल. पत्रकारांच्या लेखणीला धार चढेल. इतर बाबतीत रवी फारसा अनुकूल नाही. राजकारणात विरोधाला तोंड द्यावे लागणार आहे. प्रतिष्ठेवर परिणाम करणाऱ्या घटना घडू शकतील. मंगळामुळे आर्थिक बाजू सावरली जाईल. काही बचत देखील होऊ शकेल. व्यापारउदीम सुधारेल. नोकरीची एकूण स्थिती समाधानकारक राहील. तरी पण कामाचा ताण बराच पडणार आहे. विश्रांतीची गरज असली तरी ती मिळणे कठीण आहे. प्रवासाचा बेत पुढे ढकलावा. शुभदिनांक २७–२.

महिलांना : संसारातील अडचणी कमी होतील. साधारण समाधान राहील.

विद्यार्थ्यांना : चळवळीपायी अभ्यासावर परिणाम होईल. ☐

# High purity industrial gases from Asiatic Oxygen–

## when you want, wherever you want



**Asiatic Oxygen Limited** bring you over 30 years of their own experience plus the know-how of their technical collaborators in the U.S.A. in every cylinder of gas delivered to save you time, labour and money.

**Advantages:**

- Asiatic Oxygen gases are moisture-free for greater efficiency in cutting and welding
- Lighter cylinders reduce handling costs
- More gas per cylinder–to avoid frequent replacement
- Prompt delivery just where you want
- Well above ISI specifications

**ASIATIC OXYGEN LIMITED**
Pokhran Road No. 1, Thane 400 606 Phone: 592261
Head Office: 8 BBD Bagh East, Calcutta 700 001
and Other Branches at Arkonam, Bangalore, Barauni, Calcutta, Durgapur, Hyderabad, Kumhari, Madras, Nagpur and Rourkela.

PIN CODE FOR FAST MAIL

Grant.2.78